## राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १७६६/२००७.

श्री. हरी दाजीबा लंजे,
रा.दांडेगांव, पो. भागडी,
ता.लाखांदूर, जि. भंडारा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एम. के. फसाटे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
प्रभारी शिक्षणाधिकारी, (माध्यमिक),
जिल्हा परिषद, भंडारा.

श्री. एम. के. फसाटे,
जनमाहिती अधिकारी तथा
उपशिक्षणाधिकारी, (माध्यमिक),
जिल्हा परिषद, भंडारा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३.७.२००८)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३.५.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये व्दितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या व्दितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३.७.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २.१.२००७ रोजी माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांच्याकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. १) मी दिलेल्या दिनांक ३१.८.१९९८, दिनांक ६.९.१९९८, दिनांक ७.९.१९९८, दिनांक ३१.८.१९९९, दिनांक ३.१.२०००, दिनांक २.२.२०००, दिनांक ६.९.२००३, दिनांक २९.१२.२००३ व दिनांक ६.१२.२००६ च्या विनंती अर्जावर काय काय कार्यवाही करण्यात आली व कोणकोणते निर्णय घेतले गेले व दिनांक १७.१०.२००६, दिनांक ८.११.२००६ अर्जावर काय निर्णय घेतले गेले व वेळोवेळी कोणकोणते आदेश पारित केले गेले याबाबतची तपशिलवार माहिती प्राप्त व्हावी.

... २

२) वरील विषयानुषंगाने मला माझे म्हणणे मांडण्याचा अधिकार आहे किंवा नाही हयाबाबतची माहिती मिळावी. ३) वरील कार्यानुसंबंधाने मला मानसिक व आर्थिक हानी झाली असावी काय ? तसेच माझे शारिरिक कुपोषण झालेले असावे काय ? हयासंबंधाने कोणकोणते अधिकारी दोषी आहेत त्यांची नांवे व पदनामे व पत्ते याबाबत माहिती मिळावी. ४) वरील सर्व संबंधाने दोषींना कशी व काय शिक्षा करता येईल व माझ्या झालेल्या सर्व प्रकाराच्या नुकसानांची कशा प्रकारे भरपाई करता येईल हयाबाबत सविस्तर तपशीलने माहिती प्राप्त व्हावी. मी प्रत्यक्ष येवून घेवून जाण्यास तयार आहे. माहिती तयार झाल्यानंतर (०७१८१) २०२०७६ हया नंबर वर कळवावे. सदरच्या माहितीच्या अनुषंगाने दिनांक ९.१.२००७ रोजी माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी अपीलकर्ता यांना आपले प्रकरण न्यायप्रविष्ठ होते त्याबाबतचा मा. न्यायालय यांचे निर्णयानुसार प्रकरण खारीज झालेले आहे. याबाबतची जाणीव या कार्यालयाचे दिनांक ८.९.२००६ अन्वये यापूर्वी आपणास कळविण्यात आलेले आहे. अनुक्रमांक २, ३ व ४ चे बाबत प्रश्नार्थक माहिती विचारणा केली असल्यामुळे केंद्रीय माहिती अधिकार, २००५ माहिती उपलब्ध करुन देण्याची तरतुद नाही. आपणाला कोणती माहिती पाहिजे आहे याबाबत शासनाने विहित केलेले शुल्क भरुन कार्यालयात उपलब्ध अभिलेखाचे छायाप्रती उपलब्ध करुन घेता येईल असे कळविण्यात आलेले दिसते. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १७.३.२००७ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, (माध्यमिक), भंडारा यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ३०.४.२००७ रोजी कळविण्यात आलेले दिसते व त्यामध्ये त्यांनी या कार्यालयाचे पत्र दिनांक ९.१.२००६ चे पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे. आपले प्रकरण न्यायप्रविष्ठ असतांना तसेच मा.न्यायालयाचे निर्णयानुसार खारीज झालेले असतांना मा. न्यायालयीन निर्णयानुसार कायद्याचा भंग झालेला नाही. तरी आपणास कायद्याचा भंग झाला असे वाटत असल्यास आपण योग्य न्यायोचित मार्गाचा अवलंब करावा असे उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी कळविलेले दिसते व त्यामुळे समाधान न झाल्याने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील अपीलकर्ता यांनी सादर केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांच्या दिनांक २.१.२००७ च्या अर्जातील मागितलेल्या माहितीच्या मुद्या क्रमांक २, ३ व ४ हे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या अर्जाप्रमाणे नाही हे दिलेले उत्तर बरोबर आहे. परंतु मुद्या

क्रमांक १ मध्ये अपीलकर्ता यांनी त्यांच्या दिनांक ३१.८.१९९८, दिनांक ६.९.१९९८, दिनांक ७.९.१९९८, दिनांक ३१.८.१९९९, दिनांक ३.१.२०००, दिनांक २.२.२०००, दिनांक ६.९.२००३, दिनांक २९.१२.२००३ व दिनांक ६.१२.२००६ च्या विनंती अर्जावर काय काय कार्यवाही झाली तसेच दिनांक १७.१०.२००६ व दिनांक ८.११.२००६ अर्जावर काय कार्यवाही झाली व कोणते निर्णय घेतले गेले व वेळोवेळी कोणकोणते आदेश पारित केले गेले याबाबतची तपशिलवार माहिती प्राप्त व्हावी अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती ही प्रश्नार्थक स्वरुपात असल्यामुळे त्या प्रश्नामध्ये कार्यवाही झाली त्याची छायाप्रत उपलब्ध करुन देणे असा होतो व त्याप्रमाणे त्यांच्या अर्जातील काय काय कार्यवाही झाली किंवा कार्यवाही झाली नाही हयाबद्यलची माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. परंतु दिनांक ८.९.२००६ च्या पत्राप्रमाणे कळविण्यात आले आहे असा असंबंध उत्तर दिलेले दिसून येते. दिनांक ८.९.२००६ चे पत्र हे जिल्हाधिकारी, भंडारा यांच्या दिनांक १८.८.२००६ च्या पत्रानुसार त्याचा अर्थ अपीलकर्ता यांनी जी विनंती अर्ज केलेला आहे. परंतु विनंती अर्जाचे कार्यवाहीच्या संदर्भात दिलेले उत्तर नाही व त्यामुळे जनमाहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात. अधिनियमाचे कलम २० प्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिलेली नसेल किंवा दिशाभूल करणारी माहिती उपलब्ध करुन दिलेली असेल तरी सुध्दा जनमाहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात. त्यामुळे अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे शास्तीस पात्र आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपीलाची सुनावणी न घेता व कारणमिमांसा निर्णय न दिल्यामुळे अधिनियमाचे तरतुदीचे उल्लंघन केलेले आहे व त्यामुळे त्यांना ताकीद देणे हे संयुक्तिक राहील. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी त्यांच्या दिनांक २.१.२००७ च्या अर्जातील मुद्या क्रमांक १ मध्ये नमुद केलेली विनंती अर्जाचे संदर्भामध्ये काय कार्यवाही झाली याबद्यल कागदपत्रांच्या छायांकित प्रती हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसाचे आंत विनामुल्य रजिस्टर पोष्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता यांच्या दिनांक २.१.२००७ च्या अर्जातील मुद्या क्रमांक १ प्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे जनमाहिती अधिकारी हे दोषी आढळून येत असल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे रुपये १०००/- ची शास्ती लादण्यात येत आहे. सदरच्या शास्तीची वसूली ही मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, भंडारा यांनी वसुल करावी.

३) प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपीलाची सुनावणी घेऊन कारणमिमांसा देणारा निर्णय दिलेला नसल्यामुळे त्यांनी अधिनियमाचे उल्लंघन केलेले असल्यामुळे त्यांना ताकीद देण्यात येत आहे.

४) सदरच्या निर्णयाची एक प्रत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, भंडारा यांना पुढील कार्यवाहीसाठी स्वतंत्रपणे पोष्टाने पाठविण्यात यावा.

५) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- ३.७.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/३६७-३७०/३.७.२००८

**राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १७६९/२००७.**

श्री. गुलाब कांत बन्सोड,
२१८, विनोबानगर,
ता. तुमसर, जि. भंडारा - ४४१ ९१२. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. बी.एस.ठाकरे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपवन संरक्षक,
भंडारा वन विभाग, भंडारा.

श्री. डी.एच.राऊत,
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक वनसंरक्षक (तेंदू)
वन विभाग, भंडारा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ४.७.२००८)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ५.६.२००७ रोजी (कार्यालयास प्राप्त दिनांक २१.६.२००७ स्टॅम्प लावून) राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ४.७.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २२.२.२००७ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा सहाय्यक वनसंरक्षक (तेंदू) वन विभाग, भंडारा यांच्याकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. १) भंडारा वन विभागातील सन २००२-०३, २००३-०४, २००४-०५, २००५-०६ मध्ये राष्ट्रीय समविकास योजने अंतर्गत बांधण्यात आलेले वनबंधारे (साकोली वनक्षेत्र, तिरोडा, अडयाळ, पवनी, भंडारा, जांभकांद्री वनक्षेत्र येथील) तसेच रोजगार हमी योजनेअंतर्गत बांधण्यात आलेले वनबंधारे यांची यादी. २) कार्यरत आदेशाची प्रत. ३) वन

परिक्षेत्राधिकारी यांना देण्यात आलेले धनादेश क्रमांक, रक्कम व दिनांक. ४) बंधारेच्या कामी खरेदी करण्यात आलेल्या बिलाची प्रत व हजेरीपत्रकाची प्रत अविलंब सादर करावी. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २०.४.२००७ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपवन संरक्षक यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. सदरच्या अपीलाचा निर्णय हा दिनांक १८.६.२००७ रोजी दिलेला दिसून येतो व त्याच पत्राप्रमाणे मुद्या क्रमांक १ ते ४ ची माहिती पुरविली व त्यानंतर दिनांक १९.३.२००८ च्या पत्राप्रमाणे मुद्या क्रमांक २, ३ व ५ ची माहिती पुरविली असा खुलासा सादर केलेला दिसून येतो व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांच्या दिनांक २२.२.२००७ च्या अर्जाप्रमाणे जनमाहिती अधिकारी यांनी दाखल केलेल्या खुलाश्याप्रमाणे तत्कालीन माहिती अधिकारी यांनी दिनांक २.३.२००७ रोजी वनक्षेत्र अधिकारी (सं) सर्व तुमसर वगळून व लेखापाल रोहयो शाखा, भंडारा यांनी सदरची माहिती उपलब्ध करुन द्यावी. उपलब्ध करुन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर करावी असे पत्र दिलेले दिसून येते. सदरच्या पत्राची प्रतिलिपी ही अपीलकर्ता यांना सुध्दा दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून प्रथम अपीलाचे निर्णयानंतर दिनांक १८.६.२००७ रोजी माहितीच्या खर्चाकरिता २५००/- भरण्याचे कळविण्यात आले व अपीलकर्ता यांनी दिनांक २५.६.२००७ रोजी बँकेत भरणा केलेला दिसून येतो. रुपये २५००/- चा भरणा केल्यानंतर सुध्दा दस्ताऐवज पुरविणारे गैरअर्जदार यांनी टाळाटाळ केली असे अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे व वर नमुद केल्याप्रमाणे दस्ताऐवजांचे पत्र दिले. तसेच दिनांक ४.४.२००८ रोजी अर्धवट, चुकीचे व दिशाभूल करणारे दस्ताऐवज माहिती अधिकारी यांचेकडून प्राप्त झाले व त्याकरिता दिनांक १६.४.२००८ रोजी त्यांना पत्र दिलेले दिसून येते. अपीलकर्ता यांनी द्वितीय अपीलाचे संदर्भात खुलासा करतांना अपीलकर्ता यांनी १) उपवनसंरक्षक यांना सेवेतून बडतर्फ करणे. २) १-९ करोडोचा अपव्यय केल्यामुळे फौजदारी गुन्हा दाखल करणे. ३) जनतेच्या रुपये १-९ करोडोची अफरातफर केल्यामुळे तुरुंगवासात पाठविणे. ४) जनतेच्या पैशाची अवैधरित्या गबन केल्यामुळे राशी वसूल करुन सरकार जमा करणे अशी विनंती केलेली दिसून येते.

४. अपीलकर्ता यांच्या अर्जाप्रमाणे माहिती निश्चितच विहित मुदतीत उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे संबंधित जनमाहिती अधिकारी तसेच माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता ज्या अधिकारी किंवा कर्मचारी यांचे सहाय्य घेतले असेल ते सर्व अधिकारी व कर्मचारी दोषी आढळून येतात. तसेच माहिती ही ३० दिवसाचे आंत उपलब्ध करुन द्यावयाची असल्यामुळे विहित मुदतीच्या नंतर उपलब्ध करुन दिलेली असल्यास अधिनियमाचे कलम ७(६) प्रमाणे ती विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी अशी तरतुद असल्यामुळे अपीलकर्ता यांना सदरची माहिती ही विनामुल्य उपलब्ध करुन देणे हे संयुक्तिक राहील. अपीलकर्ता यांच्या अपील मेमोमध्ये किंवा खुलाश्यामध्ये जी विनंती आहे ती विनंती ही माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीच्या अंतर्गत येत नसल्यामुळे सदरची विनंती मान्य करता येत नाही. अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध होईल त्या माहितीच्या आधारे त्यांनी स्वतंत्रपणे योग्य त्या सक्षम अधिकाऱ्यांकडे किंवा शासनाकडे किंवा मा. न्यायालयाकडे त्यांनी तक्रार करुन त्यांना न्याय मिळवून घेता येईल. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे विहित मुदतीत छायांकित प्रतीच्या स्वरुपात माहिती उपलब्ध करुन देणे हे अपेक्षित आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी त्यांच्या दिनांक २२.२.२००७ च्या अर्जात मागितलेली माहिती ही हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसाचे आंत व्यक्तिशः छायांकित प्रतीच्या स्वरुपात अपीलकर्ता यांना विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) सदरची माहिती घेण्याकरिता अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी यांच्याकडे हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसाचे आंत जाऊन उपलब्ध करुन घ्यावी व पोच द्यावी.

३) अपीलकर्ता यांच्या दिनांक २२.२.२००७ च्या अर्जाप्रमाणे विहित मुदतीत म्हणजे कलम ७(१) प्रमाणे ३० दिवसांच्या आंत माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे संबंधित जनमाहिती अधिकारी तसेच ज्या अधिकारी किंवा कर्मचारी यांनी संबंधित माहिती उपलब्ध करुन घेण्यासाठी सहाय्य घेतले असेल त्यांना अधिनियमांचे कलम ५(५) प्रमाणे माहिती अधिकारी समजून त्या सर्वांचे विरुध्द २५०००/- रुपयांची शास्ती लादण्यात येत आहे. सदरच्या शास्तीची वसूली ही सक्षम अधिकाऱ्यांनी प्रत्येकाची जबाबदारी निश्चित करुन वसूल करुन लेखाशिर्ष "००७०-इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)" या लेखाशिर्षात जमा करण्यात यावे.

४) अपीलकर्ता यांना माहिती ही ३० दिवसामध्ये उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे ती विनामुल्य उपलब्ध करुन देण्याकरिता अपीलकर्ता यांनी रुपये २५००/- चा केलेला भरणा त्यांना परत करण्यात यावा.

५) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**दिनांक :- ४.७.२००८**

HIREKHAN/BHUJI/३७१-३७४/४.७.२००८

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १७८९/२००७.

श्री. जगन्नाथ दयाराम रेवतकर,
रा. खर्रा, पो.गंगाझरी,
ता. जि. गोंदिया. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एन. एन. दिघोरे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तहसीलदार,
गोंदिया.

श्री. एस. एन. वैकुंठी,
जनमाहिती अधिकारी तथा
धान्य खरेदी निरिक्षक,
तहसील कार्यालय, गोंदिया. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ५.७.२००८)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ५.५.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ५.७.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २५.११.२००६ रोजी (प्राप्त दिनांक ३०.११.२००६) जनमाहिती अधिकारी तथा नझुल नायब तहसीलदार, गोंदिया यांच्याकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. शासकीय लेव्ही खरेदी बद्यल. सन २००५-२००६ व २००६-२००७. १) लेव्हीच्या तांदळाकरिता धान खरेदी सुरु केली त्या आदेशाची प्रमाणित प्रत. २) लेव्ही आर्थिक वर्षात खरेदी केली जात नसेल तर, आदेशाची प्रमाणित प्रत. ३) दर वर्षात शासकीय लेव्हीचा धान, तांदुळ, गहू घेण्याचे शासकीय परिपत्रक (जी.आर.). ४) लेव्ही खरेदीबाबत ज्या ज्या ठिकाणी गोंदिया तालुका स्तरावरील सर्व केंद्रांची माहिती. सदरची माहिती व्यक्तिशः

... २

घेणार असे नमुद केलेले आहे. परंतु विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ५.२.२००७ रोजी (प्राप्त दिनांक ६.२.२००७) तहसीलदार यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाची सुनावणी सुध्दा घेऊन दिनांक ३०.५.२००७ रोजी निर्णय दिलेला आहे. तत्पुर्वीच अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांच्या दिनांक ३०.११.२००६ च्या अर्जात मागितलेल्या माहितीच्या प्रमाणे विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नाही त्याबद्यल संबंधित जनमाहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, ते माहिती उपलब्ध करुन घेण्याकरिता तहसील कार्यालयात बऱ्याच वेळेस गेले होते. परंतु माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. त्यावर जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, दिनांक १६.३.२००७ रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, दिनांक १६.३.२००७ चे उत्तर त्यांना दिनांक १२.८.२००७ रोजी मिळाले व अपीलाचा निर्णय सुध्दा त्यांना दिनांक १०.७.२००७ रोजी देण्यात आलेला आहे.

४. विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही तहसील कार्यालयात उपलब्ध नसते. तर ती जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असते. प्रथम अपीलाचा निर्णय मात्र अपीलकर्ता यांना दिनांक १६.३.२००७ रोजी माहिती उपलब्ध करुन दिल्यामुळे प्रकरण दप्तरी दाखल केलेले आहे असे दिसून येते. यावरुन अपीलकर्ता यांना कोणत्याही प्रकारची माहिती ३० दिवसाचे आंत उपलब्ध करुन दिलेली नाही हे स्पष्ट होते. संबंधित तहसीलदार यांनी दिनांक ९.२.२००७ रोजी अव्वल कारकून, अन्न विभाग यांना माहिती उपलब्ध करुन देंण्याबद्यल पत्र दिलेले दिसून येते परंतु ते अपीलाचे संदर्भात आहे. तहसील कार्यालयात माहिती उपलब्ध नाही ही बाब विहीत मुदतीत अपीलकर्ता यांना कळविली नसल्याने संबंधित जनमाहिती अधिकारी हे शास्तीस पात्र आहेत व त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

... ३

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून संबंधित जनमाहिती अधिकारी हे दोषी आढळून येत असल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे रुपये ५०००/- शास्ती लादण्यात येत आहे. सदरच्या शास्तीची रक्कम संबंधित जनमाहिती अधिकारी यांच्या दर महिन्याचे वेतनातून वसूल करुन ती लेखाशिर्ष "००७०-इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)" या लेखाशिर्षात जमा करण्यात यावी.

२) सदरच्या निर्णयाची एक प्रत जिल्हाधिकारी, गोंदिया यांच्याकडे स्वतंत्रपणे पुढील कार्यवाहीसाठी पोष्टाने पाठविण्यात यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- ५.७.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/३७५-३७७/५.७.२००८

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १७३१/२००७.

श्री. छैय्यालाल बुधन भिवगडे,
मु. गौतमनगर, बाजपाई वार्ड,
ता. जि. गोंदिया. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सचिव,
नवयुवक शिक्षण संस्था,
कुंजीलाल पेठ, पो. भगवाननगर,
नागपूर - ४४० ०२७.

सौ. टि. सी. घोडेस्वार,
जनमाहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापिका,
मानवता पूर्व माध्यमिक शाळा, भिमनगर,
गोंदिया. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ९.७.२००८)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ४.६.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ९.७.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व माहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे वतीने श्री. थानसिंग सोमसजी गौतम, मुख्याध्यापक, मानवता हायस्कूल, बेरडीपार हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २२.३.२००७ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, मानवता पूर्व माध्यमिक शाळा यांच्याकडे दुय्यम सेवापुस्तकाची प्रमाणित प्रत मिळण्याबाबत. अर्जदाराचे सुरु नोकरी दिनांक २१.७.१९७३ पासून दिनांक ३०.११.२००३ पर्यंत सेवाकाळाचे दुय्यम सेवापुस्तकाची प्रमाणित

... २

प्रत अशी माहिती मागितली होती. सदरची माहिती नोंदणीकृत शिघ्र टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक २३.४.२००७ रोजी प्रथम अपील सचिव, नवयुवक शिक्षण संस्था, नागपूर यांच्याकडे दाखल केले व तरीही त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांच्या दिनांक २२.३.२००७ च्या अर्जाचे अनुषंगाने माहिती काय उपलब्ध करुन दिली याबद्यल जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांना विचारले असता त्यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांना दिनांक २४.३.२००७ रोजी सेवापुस्तिकेकरिता व सेवानिवृत्ती प्रकरण सादर करण्याकरिता आवश्यक कागदपत्र सादर करणेबाबत जनमाहिती अधिकारी यांनी पत्र दिले होते. त्यावर अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांनी पूर्वीच कागदपत्रे दाखल केली होती. मात्र प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सांगितले की, अपीलकर्ता यांनी शिक्षणाधिकारी यांनी समज दिल्यानंतर दिनांक ११.४.२००७ रोजी अर्जदाराचे फोटोच्या तीन तीन प्रती दिल्या. पुन्हा दिनांक १८.४.२००७ रोजी त्यांना सर्व कागदपत्रे मागितली होती. पुन्हा दिनांक ३०.५.२००७ रोजी वरील सर्व पत्रांचा संदर्भ देऊन त्यांना शाळा बदलण्याचे व शैक्षणिक पात्रतेचे मूळ प्रमाणपत्र, अपत्या संबंधी व पत्नीचे नांव, जन्मतारीख याबाबत सक्षम अधिकाऱ्याचे प्रमाणित केलेली प्रत, स्वतःचे वैद्यकीय प्रमाणपत्र इत्यादी माहिती मागितली होती. पुन्हा दिनांक ११.६.२००७ रोजी त्यांना सर्व पत्राचा संदर्भ देऊन कागदपत्रे मागितली होती. त्याप्रमाणे खालील प्रमाणे खुलासा सुध्दा सचिव तथा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दाखल केलेला आहे.

४. श्री. छय्यालाल बुधन भिवगडे हे परिचर पदावर मानवता पूर्व माध्यमिक शाळा, भिमनगर, गोंदिया येथे कार्यरत होते. सदर कर्मचाऱ्यांचे नियुक्तीस मान्यता मिळण्याबाबत प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्यामुळे सेवापुस्तक तयार झालेल्या नव्हत्या. न्यायालयीन निर्णयान्वये सेवापुस्तक तयार करण्याकरिता संबंधित शाळेच्या मुख्याध्यापिकेने दिनांक २४.३.२००७ ला मूळ प्रमाणपत्र व सेवापुस्तिकेकरिता आवश्यक कागदपत्र सादर करण्यास रितसर पत्र दिले असता श्री.भिवगडे यांनी कोणत्याही प्रकारचे कागदपत्र शाळेला सादर केले नाही. त्यामुळे सदर मुख्याध्यापिकेने त्यांना दिनांक ७.४.२००७ व दिनांक १८.४.२००७ ला पुन्हा पत्र देऊन

... ३

आवश्यक कागदपत्राची मागणी केली. परंतु श्री.भिवगडे यांनी कागदपत्र दिले नाही. त्यामुळे संबंधित कर्मचाऱ्यांची सेवापुस्तिका व सेवानिवृत्ती प्रकरण तयार होऊ शकले नाही. शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, गोंदिया यांचे निर्देशानुसार श्री.भिवगडे यांनी सेवापुस्तिका तयार करण्याकरिता व सेवानिवृत्ती प्रकरण आवश्यक कागदपत्र शालेय कार्यालयास दिल्यानंतरच त्यांची सेवापुस्तिका, सेवापुस्तिकेची दुय्यम प्रत तयार करण्यास झालेल्या उशिरास श्री.भिवगडे हे स्वतः जबाबदार आहेत. सदर कर्मचारी हेतुपुरस्पर तक्रार करुन प्रकरण लांबविण्याचा प्रयत्न करीत असतो. सेवापुस्तिका तयार झाल्यानंतर त्यांचेवर स्वाक्षरी न करता शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, गोंदिया यांचे कार्यालयात तक्रार सादर केली होती. परंतु त्यांनी प्रत्यक्ष मुलाखती अंती श्री.भिवगडे यांना समझ देऊन मूळ प्रमाणपत्र देण्यास सांगितले व सेवापुस्तिकेवर स्वाक्षरी करण्याचे निर्देश दिले. त्यानंतरच त्यांची सेवापुस्तिका तयार करता आली. सद्या त्यांची सेवापुस्तिकेची दुय्यम प्रत तयार करुन त्यांना देण्यात आलेली आहे. सदर कर्मचाऱ्यांनी मागितलेली माहिती शाळेच्या मुख्याध्यापिकेने आपल्या स्तरावर त्यांना दिलेली आहे. त्यांचे माहिती अधिकाराअंतर्गत माहिती करिता कोणतेही प्रकरण प्रलंबित नाही. करिता आपले पत्रान्वये खुलासा सादर करीत आहे. यानंतर अपीलकर्ता यांना सेवापुस्तक मिळाली याबद्यल विचारले असता त्यांनी सेवा पुस्तिका काढून दाखविली परंतु ती अपूर्ण आहे असे सांगितले आहे. त्यावर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की मा.पिठासीन अधिकारी, शाळा न्यायधिकरण, नागपूर यांनी जो निर्णय दिलेला आहे त्या निर्णयाप्रमाणे त्यांच्या सेवेच्या संदर्भामध्ये पुन्हा प्रस्ताव सादर केलेला आहे व त्याची सुनावणी सुध्दा झालेली आहे. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, सदरच्या सुनावणीस ते हजर नव्हते. यावरुन असे दिसून येते की, अपीलकर्ता यांच्या सेवापुस्तिकेची दुय्यम प्रत विहित मुदतीत उपलब्ध करुन देण्याचे संदर्भामध्ये अपीलकर्ता यांनी आवश्यक ती कागदपत्रे दाखल केलेली नसल्यामुळे त्यांना ती विहित मुदतीत उपलब्ध झाली नाही. परंतु माहिती अधिकारी यांनी त्यांना वेळोवेळी पत्र दिलेले दिसून येते. त्यावरुन माहिती देण्याची टाळाटाळ केलेली आहे असा निष्कर्ष काढता येत नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक २२.३.२००७ च्या अर्जाप्रमाणे मागितलेली दुय्यम सेवापुस्तिकेची प्रमाणित प्रत मिळालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- ९.७.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/३७८-३८१/९.७.२००८

## राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १७३२/२००७.

श्री. दिलीपकुमार हरिदास फुले,
मु. देवमुंढरी, पो. खात,
ता. मौदा, जि. नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
खंड विकास अधिकारी,
पंचायत समिती, मौदा,
जि. नागपूर.

श्री. ए. एम. भावे,
जनमाहिती अधिकारी तथा
कक्ष अधिकारी,
पंचायत समिती, मौदा,
जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ९.७.२००८)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १८.६.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ९.७.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व विद्यमान जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कागदपत्रे दाखल केलेली दिसून येतात.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ९.२.२००७ रोजी माहिती अधिकारी पंचायत समिती कार्यालय, मौदा यांच्याकडे विभागीय अध्यक्ष मा.उदासभाऊ बन्सोड यांनी केलेल्या तक्रारीचे मौका चौकशीत घेतलेल्या निर्णयाची सत्य प्रतिलिपीत नमुद केलेली माहिती व प्रतिलिपी मिळण्याबाबत. सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. विहीत मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक ३०.४.२००७ रोजी अपील प्राधिकारी, पंचायत समिती, मौदा यांच्याकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय सुध्दा झालेला नसल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

... २

३. त्यावर विद्यमान कक्ष अधिकारी तथा जनमाहिती अधिकारी यांनी राज्य माहिती आयोगाकडे खुलासा करतांना श्री. दिलीपकुमार हरिदासजी फुले यांनी दिनांक ९.२.२००७ रोजी माहितीच्या अधिकारात मागितलेली माहिती त्यांना पुरविण्यात आली नसल्याचे दिसून येत असून त्यांनी त्यावर दिनांक १८.६.२००७ रोजी अपील केले परंतु त्याबाबत सुध्दा त्यांना कार्यालयाकडून काहीही कळविण्यात आले नसल्याचे निदर्शनास येत आहे. परंतु त्यांना आवश्यक असलेली माहिती सचिव, ग्राम पंचायत, मोरगांव हयांनी दिनांक ४.६.२००७ चे पत्रान्वये दिनांक १२.६.२००७ रोजी उपलब्ध करुन दिलेली आहे असे नस्तीवरुन निदर्शनास येते. परंतु त्यांना आवश्यक असलेली माहिती सचिव, ग्रामपंचायत, मोरगांव यांनी दिनांक ४.६.२००७ च्या पत्रान्वये दिनांक १२.६.२००७ रोजी उपलब्ध करुन दिलेली आहे असे नस्तीवरुन निदर्शनास येते असा खुलासा केलेला आहे. यावरुन तत्कालीन संबंधित जनमाहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही म्हणून ते दोषी आढळून येतात व अधिनियमाचे कलम २० प्रमाणे शास्तीस पात्र आहेत. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपीलाची दखल घेतली नसल्यामुळे त्यांनी अधिनियमाच्या तरतुदीचे उल्लंघन केलेले आहे असे दिसून येते व त्यामुळे त्यांना ताकीद देणे संयुक्तिक राहील व त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## **आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून संबंधित तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांच्या दिनांक ९.२.२००७ च्या अर्जाप्रमाणे विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे ते दोषी आढळून येत असल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे रुपये ५०००/- ची शास्ती ही लादण्यात येत आहे. सदरच्या शास्तीची रक्कम ही त्यांचेकडून वसूल करण्यात येऊन ती लेखाशिर्ष "००७०-इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)" या लेखाशिर्षात जमा करण्यात यावी.

२) प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपीलाची दखल घेतली नसल्यामुळे त्यांना अधिनियमाचे कलम १९(१) चा उल्लंघन केलेले असल्यामुळे त्यांना ताकीद देण्यात येत आहे.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**दिनांक :- ९.७.२००८**

HIREKHAN/BHUJI/३८२-३८३/९.७.२००८

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १७३०/२००७.

श्रीमती रजनी वसंतराव येरावार,
शास्त्रीनगर, दाते कॉलेज मागे,
ता. जि. यवतमाळ. ..... **अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,
ता. जि. यवतमाळ.

श्री. व्ही. व्ही. चव्हाळे,
जनमाहिती अधिकारी तथा
कृषि उपसंचालक कृषि अधिकारी,
जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालय,
गार्डन रोड, ता. जि. यवतमाळ. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ९.७.२००८)**

## नि र्ण य

अपीलकर्ती यांनी दिनांक २०.७.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ९.७.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ती व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ती यांनी दिनांक १.३.२००७ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांचे कार्यालयाकडे १) अर्जदाराला शेत क्रमांक ३८६ साठी २००१-०२ साली वरील योजनेअंतर्गत २ हेक्टर मोसंबी लागवडीसाठी मंजूरी दिली होती का ? २) नसल्यास कोणत्या वर्षी दिली होती ? ३) आतापर्यंत अनुदानाची किती रक्कम किती हप्त्यात दिली ? ४) हया पूर्ण रक्कम न दिली असल्यास त्याचे कारण काय ? ५) रक्कम मिळण्यास पात्र असतांना सुध्दा रक्कम न दिल्यास त्याची जबाबदारी कोणावर निश्चित करता येईल ? विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते व त्यानंतर माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

... २

३. अपीलकर्ता यांच्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन देता आली नाही त्याबद्यल जनमाहिती अधिकारी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालय यांनी असे सांगितले की, सदरची माहिती ही तालुका कृषि अधिकारी यांचे स्तरावरील असल्यामुळे त्यांनी दिनांक ८.३.२००७ रोजी माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता माहिती अधिकारी यांच्याकडे सदर कार्यवाही करिता अशा प्रकारचे पत्र दिले होते. तसेच कृषि अधिकारी, यवतमाळ यांनी सुध्दा पत्र दिलेले होते. तसेच दिनांक ३०.३.२००७ रोजी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना सदरची माहिती उपविभागीय कृषि अधिकारी, यवतमाळ यांचेकडून अद्याप प्राप्त व्हायची आहे. सदर माहिती ही उपविभागीय कृषि अधिकारी यांचे स्तरावरील असल्यामुळे माहिती त्यांचेकडून मागवावयाची आहे. सदर माहिती प्राप्त होताच आपणास कळविण्यात येईल. दिनांक ८.३.२००७ व दिनांक १६.३.२००७ च्या पत्रानुसार पाठविलेली दिसून येते. प्रथम अपीलाचे संदर्भात सुध्दा दिनांक ११.७.२००७ रोजी माहिती अधिकारी कार्यालय जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, यवतमाळ यांनी तालुका कृषि अधिकारी, यवतमाळ यांना मागितलेली माहिती तात्काळ सादर करण्याबाबत पत्र दिलेले दिसून येते. मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये पुन्हा कृषि उपसंचालक यांनी खुलासा दाखल केलेला आहे तो खालील प्रमाणे आहे. श्रीमती रजनी वसंतराव येरावार यांनी सन २००१ ते २००६ या कालावधीतील कोळंबी या गावातील फळबाग लागवडीची माहिती मागविलेली होती. सदर माहिती ही तालुका कृषि अधिकारी, यवतमाळ यांचे कार्यालयाशी संबंधित असल्यामुळे सदर कार्यालयास व उपविभागीय कृषि अधिकारी, यवतमाळ यांना सदर माहिती उपलब्ध करुन देणेबाबत वेळोवेळी पत्रव्यवहार करण्यात आला होता. मुळातच कृषि विभागात तांत्रिक व अतांत्रिक कर्मचारी यांची अनेक पदे रिक्त असल्यामुळे तसेच पॅकेज अंतर्गत कामाचा अतिरिक्त बोजा वाढल्यामुळे सदर माहिती तालुका कृषि अधिकारी कार्यालयाकडून विलंबाने सादर करण्यात आली. त्यामुळे सदरची माहिती अर्जदारास उशिरा देण्यात आलेली आहे. तरी झालेला विलंब पुरेशा मनुष्यबळा अभावी झालेला असल्यामुळे सदर विलंब क्षमापीत करण्यात यावा.

४. वास्तविक अपीलकर्ती यांनी जी माहिती मागितली आहे ती माहिती ही तालुका स्तरावर असल्यामुळे तालुका स्तरावरील माहिती अधिकारी यांच्याकडे मागावयास पाहिजे होती. परंतु तशी ती माहिती न मागता

त्यांनी ती जिल्हा स्तरावर मागितली असल्यामुळे सदरची माहिती उपलब्ध करुन देण्यास विलंब झालेला दिसून येतो. असे असले तरी सदरचा अर्ज हा तालुका कृषि अधिकारी यांच्याकडे तरी हस्तांतरण करावयास पाहिजे किंवा माहिती ही उपलब्ध करुन द्यावयास पाहिजे त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, दिनांक ८.३.२००७ च्या पत्राप्रमाणे दिनांक २०.३.२००७ रोजी माहिती अधिकारी तालुका कृषि अधिकारी यांनी अपीलकर्ती यांना त्यापैकी काही माहिती उपलब्ध करुन दिलेली होती व त्याकरिता त्यांना दिनांक २०.३.२००७ चे पत्र दिले आहे व अपीलकर्ती यांना माहिती उपलब्ध करुन देण्यास जाणूनबुजून टाळाटाळ केलेली आहे असा निष्कर्ष काढता येत नाही व त्यानंतर संपूर्ण माहिती दिनांक ८.३.२००७ रोजी उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ती यांच्या दिनांक १.३.२००७ च्या अर्जाप्रमाणे त्यांना काही माहिती ही दिनांक २०.३.२००७ रोजी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. तसेच उर्वरित माहिती ही तालुका स्तरावरील असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्यास विलंब झालेला असला तरी त्यांना संपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- ९.७.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/३८४-३८६/९.७.२००८

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १७२७/२००७.

श्री. हेमराज जियालाल हटवार,
जुना बाजार चौक,
मु.पो.ता. गोरेगांव,
जिल्हा गोंदिया - ४४१ ८०१. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हा पुरवठा अधिकारी,
अन्न विभाग, गोंदिया.

श्री. एन. आर. वंजारी,
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी,
अन्न विभाग, गोंदिया. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ९.७.२००८)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १५.५.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ९.७.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २७.२.२००७ रोजी माहिती अधिकारी अ.का. अन्न शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, गोंदिया यांच्याकडे माझे केरोसीन लायसन्स नंबर ९७/आर/८१/परवाना पत्र मुळ दस्तऐवज, वैद्यकीय प्रमाणपत्र परत मिळणेबाबत. माहितीचा कालावधी दिनांक २०.९.२००४ ते आजपर्यंत आपले कार्यालयीन रेकॉर्ड बुक क्र. २८९१ वर दिनांक २२.९.२००४ ला नुतनीकरणाबाबत अ. का. १ मध्ये दिले आहेत ते परत मिळणेबाबत. माहिती स्वतः घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २२.३.२००७ रोजी अपीलकर्ता यांना आपण या कार्यालयास मागणी केलेले कागदपत्र या कार्यालयास उपलब्ध नसल्याबाबत

... २

आपणास या कार्यालयाचे पत्र क्रमांक कक्ष-१/अका/पुरवठा/कावी/१२५/०७, दिनांक ३.२.२००७ अन्वये कळविण्यात आले आहे. सबब आपण मागणी केलेले कागदपत्र पुरविण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. अशी माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना कळविलेले दिसून येते. अपीलकर्ता यांनी दिनांक २४.३.२००७ रोजी सदरचे पत्र प्राप्त झाल्याची नोंद आहे. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २९.३.२००७ रोजी अपीलीय अधिकारी अन्न विभाग, गोंदिया यांच्याकडे प्रथम अपील दाखल केलेले आहे. प्रथम अपील मेमोमध्ये अन्न पुरवठा विभाग यांनी गहाळ केले असे अपीलकर्ता यांनी नमुद केलेले दिसून येते. त्याप्रमाणे अपीलाचे संदर्भामध्ये वरील अपील अर्जाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, सदर प्रकरणांत आपणांस यापूर्वी दिनांक ३.२.२००७ व दिनांक २२.३.२००७ अन्वये कळविण्यात आले आहे. तरी आपण प्रकरणाचा कार्यालयात तपास घेऊन माहिती मागितल्यास माहिती देता येईल. सदरचे पत्र अपीलकर्ता यांना दिनांक २८.४.२००७ रोजी प्राप्त झाल्याची नोंद आहे. शासकीय माहिती अधिकारी श्री.एन.आर.वंजारी यांनी सदरच्या द्वितीय अपीलाचे संदर्भामध्ये खालील प्रकारचा खुलासा सादर केलेला आहे. उपरोक्त संदर्भांकित विषयाचे अनुषंगाने सादर करण्यात येते की, श्री.हेमराज जियालाल हटवार यांचे नावाने ९७/आर/८१ या क्रमांकाचा केरोसीन किरकोळ परवाना मंजूर करण्यात आला होता. या परवान्याची वैधता दिनांक ३१.१२.१९८६ पर्यंत होती. त्यानंतर परवानाधारकाने या परवान्याचे नुतनीकरण करुन घेतले नव्हते. नियमाप्रमाणे परवान्याचे नुतनीकरण दिनांक ३१.१२.१९८६ पर्यंत न करुन घेतल्यामुळे हा परवाना रद्द समजण्यात येतो. परंतु परवानाधारकाने, वैद्यकीय कारणास्तव केरोसीनची उचल न केल्यामुळे या परवान्याचे नुतनीकरण करुन देण्यात यावे या सबबीखाली जिल्हा पुरवठा अधिकारी, गोंदिया यांचेकडे दिनांक १४.९.२००४ रोजी अर्ज सादर केला व त्या अर्जासोबत सहपत्र म्हणून मूळ परवाना व वैद्यकीय प्रमाणपत्र जोडल्याचे नमूद केले आहे. त्यानंतर अर्जदाराने लोकशाही दिनानिमित्ताने मा. जिल्हाधिकारी यांचेकडे सुध्दा अर्ज केलेले आहेत. या तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हा पुरवठा अधिकारी, गोंदिया यांनी दिनांक २.१.२००७ चे पत्रानुसार अर्जदारास त्यांच्या परवान्याचे नुतनीकरण करुन देता येणार नाही असे कळविले आहे. तसेच दिनांक ३.२.२००७ चे पत्रानुसार अर्जदाराचे अर्जासोबत मूळ परवाना व मूळ वैद्यकीय प्रमाणपत्र संलग्न केला नसल्याने परत देण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. सबब त्यांचा अर्ज निकाली काढण्यात आला आहे असे

... ३

कळविले. त्यानंतर अर्जदाराने दिनांक २७.२.२००७ अन्वये माहितीच्या अधिकारात मूळ प्रमाणपत्र व वैद्यकीय प्रमाणपत्र त्यांना देण्यांत यावे याकरिता माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज सादर केला. या अर्जाबाबत दिनांक २२.३.२००७ च्या पत्रान्वये अर्जदारास उत्तर देण्यात आले. त्यानंतर अर्जदाराने प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे अपील केलेले नाही. परंतु दिनांक ३०.३.२००७ च्या पत्रान्वये अर्जदाराने परत श्री.एन.जे.उईके, नायब तहसीलदार, गोंदिया यांचेकडे माहितीचे अधिकारात अर्ज केलेला आहे. या अर्जाचे अनुषंगाने नायब तहसीलदार, गोंदिया यांनी अर्जदारास दिनांक २२.३.२००७ अन्वये उत्तर देण्यात आले असल्याचे कळविण्यात आले आहे. अर्जदारास या कार्यालयाकडून दिनांक ३.२.२००७ व दिनांक २२.३.२००७ च्या पत्रान्वये त्यांचे मूळ वैद्यकीय प्रमाणपत्र व परवाना अर्जासोबत संलग्न केले नसल्याचे कळविण्यात आलेले आहे. त्यामुळे अर्जदार श्री.हेमराज जियालाल हटवार, रा.गोरेगांव यांचा अपील अर्ज खारीज करण्यात यावा ही विनंती.

३. वरील खुलाश्याचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना जिल्हा पुरवठा अधिकारी यांचे कार्यालयातील नस्तीची पाहणी करुन सदरची कागदपत्रे उपलब्ध असतील तर ती त्यांनी उपलब्ध करुन घ्यावी असे त्यांनी सुचविले असता जनमाहिती अधिकारी सदरची नस्ती आयोगाचे निदर्शनास आणली सदरच्या नस्तीचे अवलोकन केले असता अपीलकर्ता यांच्या अर्जाचे सोबत मुळ परवान्याचे कागदपत्र दिसून येत नाही. मात्र वैद्यकीय प्रमाणपत्राची छायांकिंत प्रत दिसून येते व त्यामुळे अपीलकर्ता यांनी सदरचे वैद्यकीय प्रमाणपत्र व मुळ केरोसीन परवाना जोडलेला होता किंवा नाही याबाबत विचारले असता त्यांनी मुळ अर्ज सादर केला. मुळ अर्जामध्ये दिनांक २०.९.२००४ रोजी वैद्यकीय प्रमाणपत्र व केरोसीन परवाना संदर्भामध्ये तो स्विकारण्याचे संदर्भामध्ये खूण करुन अधोरेखित केलेले दिसून येते. परंतु आयोगाचे कार्यालयामध्ये सादर केलेल्या कागदपत्रामध्ये अधोरेखित किंवा खूण केलेले दिसून येत नाही व त्यामुळे सदरची कागदपत्रे दाखल केले होते किंवा नाही ते आज ठरविता येत नाही व नस्तीमध्ये सुध्दा उपलब्ध नसल्यामुळे अपीलकर्ता यांना मुळ परवान्याची प्रत उपलब्ध करुन देता येईल असे दिसून येत नाही. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की ते गहाळ केलेले आहे पण त्याबाबत कोणताही पुरावा आयोगाकडे सादर केलेला नसल्यामुळे तसेच त्याबाबत पूर्वीच माहिती त्यांना उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

... ४

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांना त्यांचा दिनांक २७.२.२००७ च्या अर्जाप्रमाणे विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- ९.७.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/३८७-३९०/९.७.२००८

**राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १७२८/२००७.**

श्रीमती केशरबाई फागू लांबकासे,
मु. नवाटोला (पलखेडा),
पो. तिल्ली मोहगांव, ता. गोरेगांव,
जिल्हा गोंदिया - ४४१ ८०१. ..... **अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

श्री. पि. के. क्षिरसागर,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तहसीलदार, गोरेगांव.
जिल्हा गोंदिया.

श्री. पी.एस.नंदनवार,
जनमाहिती अधिकारी तथा
नायब तहसीलदार,
गोरेगांव, गोंदिया. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ९.७.२००८)**

**नि र्ण य**

अपीलकर्ती यांनी दिनांक २२.५.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ९.७.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ती व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ती यांनी दिनांक ४.१२.२००७ रोजी माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, गोरेगांव यांच्याकडे शेरा कॉलम मध्ये असलेल्या नावांची दुरुस्ती करुन, कापून देणेबाबत फेरफार घेणेबाबत. माहितीचा कालावधी ९.१.१९८३ ते आजपर्यंत. आदिवासीच्या जमिनीवर गैरआदिवासी कुवरलाल पटले हा बळजबरीने पुन्हा कब्जा करण्याचे बेतात आहे. सदरची माहिती व्यक्तिशः उपस्थित राहून घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २२.१२.२००६ रोजी जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, गोरेगांव यांनी

... २

अपीलकर्ती यांना त्यांचे नावाची नोंद आहे ती कमी करता येत नाही असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर अपीलकर्ती यांनी दिनांक २२.१.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २५.११.२००७ रोजी पारित केलेला दिसतो. अपीलकर्ती यांनी अनेक अर्ज माहितीच्या अधिकारामध्ये केलेले आहेत व वेळोवेळी त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु अपीलकर्ती यांचे म्हणणे असे आहे की, दिनांक ३.९.२००७ रोजी "माझ्या वडिलांची शेती मौजा पलखेडा या गावी होती. माझ्या वडीलांनी ती शेती गट नं. ४९८/१ आराजी १.६९ रुपये १५००/- दिनांक १४.३.१९७४ ला विक्री केली होती. ती जमीन भय्यालाल मोतीराम पटले, रा. तिल्ली मोहगांव यांनी खरेदी केली होती. दिनांक ९.१.१९८३ ला ती जमीन आदिवासीची हलबी समाजाची आहे म्हणून भैय्यालाल पटले यांनी आम्हाला पाच पंचासमोर पंच फैसला करुन नगदी रुपये १२००/- घेऊन परत केली. फक्त आम्ही तलाठयाकडे जाऊन रेकार्डवर दुरुस्ती केली नाही. हया जमिनीवर भैय्यालालच्या मरणानंतर त्याच्या मुला बाळाचे नांव दर्ज झालेत. हया जमिनीवर आताही आमचाच कब्जा व जोत आमचीच चालू आहे. फक्त त्यांचा नांव कमी करणे आहे. सध्या गट नंबर बदलले असून सध्या चालू स्थितीत गट नंबर ४११ वर्ग ची ची जमीन हे. आर. १.६९ हे आहे. यावरुन असे दिसून येते की, अपीलकर्ती यांनी त्यांचे नावावर जमीन करुन पाहिजे आहे. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये अशा प्रकारे कारवाई करण्याचे आदेश देण्याचा अधिकार राज्य माहिती आयोगाच्या अधिकार कक्षे बाहेर आहे व त्यामुळे अपीलकर्ती यांची विनंती मान्य करता येत नाही. अपीलकर्ती यांनी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ प्रमाणे उपविभागीय अधिकारी यांना अर्ज करुन त्यांना न्याय मिळवून घेता येईल. अपीलकर्ती यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ती यांची विनंती ही माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे मान्य करता येत नसल्यामुळे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**दिनांक :- ९.७.२००८**

HIREKHAN/BHUJI/३९१-३९२/९.७.२००८

**राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १७२९/२००७.**

श्री. दिवाकर धनराज मेश्राम,
जुना बाजार चौक,
मु.पो.ता. गोरेगांव,
जिल्हा गोंदिया - ४४१ ८०१. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. के. डी. रकटमोडे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तहसीलदार,
रोजगार हमी योजना,
गोंदिया.

श्री. एस.आर.घोडके,
जनमाहिती अधिकारी तथा
शाखा अभियंता,
रोजगार हमी योजना, कक्ष क्र. १०८,
जिल्हाधिकारी कार्यालय, गोंदिया. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ९.७.२००८)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १५.५.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ९.७.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे मय्यत झालेले आहेत असा मृत्युचा दाखला जनमाहिती अधिकारी यांनी दाखल केलेला आहे. तसेच अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती सेवाखंडीत हजेरी सहाय्यक यांना शासन सेवेत समाविष्ट करणेबाबतच्या प्रक्रिये संबंधीची संपूर्ण माहिती मिळणेबाबत मागितली होती व त्याबाबतची संपूर्ण माहिती त्यांना आज पर्यंत उपलब्ध करुन देण्यात आली नाही. तशा प्रकारची कागदपत्रे दाखल केलेली आहेत. त्यामुळे सदरची अपील हे निकाली काढण्यात आले आहे.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**दिनांक :- ९.७.२००८**

HIREKHAN/BHUJI/३९३/९.७.२००८

**राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १७६२/२००७.**

श्री. छगनलाल काशीराम शरणागत,
गणित चित्रकला निदेशक,
शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, आर्वी,
जिल्हा वर्धा - ४४२ २०१. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
संचालक (प्रशिक्षण),
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,
म.रा. ३, महापालिका मार्ग, मुंबई - १.

श्री. प्र. म. वाकडे,
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक संचालक,
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय,
सिव्हील लाईन, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ११.७.२००८)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३.५.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ११.७.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहेत व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री.एस.एम.हस्ते, सहसंचालक, व्यवसाय शिक्षण, नागपूर हे हजर असून माहिती अधिकारी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २५.९.२००६ रोजी जनमाहिती अधिकारी तथा उपसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, नागपूर यांच्याकडे माहिती मागितलेली दिसून येते. (अपीलकर्ता यांनी अपील मेमोसोबत माहितीच्या अर्जाची छायांकित प्रत जोडलेली नाही) सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता

... २

यांना दिनांक २७.१०.२००६ रोजी अ ते ल या मुद्यांच्या संदर्भामध्ये माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. तसेच गेल्या १५ दिवसापासून कार्यालयीन अभिलेख सिव्हील लाईन येथील नवीन इमारतीमध्ये हलविण्याची कार्यवाही सुरु होती त्यामुळे मुद्या क्रमांक ड, ई, फ आणि ग या मुद्याबाबतची माहिती संबंधित कार्यासनाकडून प्राप्त झालेली नाही. संबंधित कार्यासनाकडून माहिती प्राप्त होताच आपल्याला पुरविण्यात येईल असे कळविलेले दिसते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी प्रथम अपील दिनांक २७.११.२००६ रोजी संचालक (प्रशिक्षण) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, म. रा., मुंबई-१ यांचेकडे दाखल केलेले दिसून येते. (प्रपत्र ब ची छायांकित प्रत अपीलकर्ता यांनी अपील मेमो सोबत दाखल केलेली दिसून येत नाही) सदरच्या अपीलाचा निर्णय हा दिनांक २९.१.२००७ रोजी देण्यात आलेला असून अपीलातील मुद्या क्रमांक ७(ड) आणि (फ) बाबत माहिती अधिकाऱ्यांनी अपीलकारास माहिती उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो व उर्वरित माहितीच्या संदर्भामध्ये जनमाहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती योग्य आहे असा ही निर्णय दिलेला दिसून येतो. प्रथम अपीलाचे निर्णयाप्रमाणे अपीलकर्ता यांना माहिती अधिकारी तथा प्रभारी सहसंचालक यांनी दिनांक ५.२.२००७ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. यावरुन अपीलकर्ता यांच्या माहितीच्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच प्रथम अपीलाचे निर्णयाप्रमाणे सुध्दा अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. विलंबाने माहिती उपलब्ध करुन देण्याचे कारण सुध्दा जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना कळविले होते व त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे कार्यवाही पूर्ण झालेली आहे. अपीलकर्ता यांचे समाधान झाले नाही याकरिता अपीलकर्ता यांनी त्यांच्या अर्जात मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, त्यांनी प्रश्नार्थक स्वरुपाची जनमाहिती अधिकारी यांना अभिप्राय विचारले आहेत. परंतु अधिनियमाचे तरतुदीप्रमाणे "माहिती" व "माहितीचा अधिकार" या व्याख्येप्रमाणे जनमाहिती अधिकारी कोणत्याही प्रकरणातील निर्णय प्रक्रियेच्या गुणवत्तेच्या संदर्भातील अभिप्राय अपेक्षित नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांच्या द्वितीय अपील मेमोमधील जी कारणे दिलेली आहेत ती त्या कारणांचा सुध्दा अधिनियमाचे तरतुदीप्रमाणे विचार करता येणार नाही. उपसंचालक हे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा अपीलकर्ता यांना संचालक यांचे कार्यालयात प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते व त्यामुळे विलंब झाला असल्यामुळेच तो अपीलकर्ता यांच्या मुळेच झाला असल्याने तरीही माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

... ३

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना त्यांचा दिनांक २५.९.२००६ च्या अर्जाप्रमाणे संपूर्ण माहिती ही उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- ११.७.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/३९४-३९६/११.७.२००८

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १७४३/२००७.

श्री. पितांबर शामजी भूरे,
सतरंजीपुरा, संताजी मठाजवळ,
नागपूर - ४४० ००८. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
संचालक तंत्र शिक्षण,
महाराष्ट्र राज्य,
३, महानगरपालिका मार्ग,
पत्र पेटी क्रमांक १९६७,
मुंबई - १.

जनमाहिती अधिकारी तथा
प्राचार्य,
श्रीमती राधिकाबाई पांडव कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग,
दिघोरी नाका, उमरेड रोड, नागपूर. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ११.७.२००८)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.५.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ११.७.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री. एम. एस. जोशी, सहसंचालक, अतांत्रिक प्रादेशिक कार्यालय, नागपूर हे हजर असून माहिती अधिकारी हे विनाअनुमतीने गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २.२.२००७ रोजी प्राचार्य तथा माहिती अधिकारी श्रीमती राधिकाबाई पांडव कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, नागपूर यांच्याकडे खालील प्रमाणे माहिती मागितली होती. १) B.E.Part I (Elt. & Telecom.) २००६-२००७ श्री.राजेश पितांबर भूरे यांचे ॲडमिशन कँसल (रद्द) करुन त्यांनी भरलेले

... २

शिक्षण शुल्क परत करण्यां विषयीचा अर्ज दिनांक २५.९.२००६, दिनांक ७.१०.२००६, दिनांक २१.११.२००६ आणि ७.१२.२००६ तसेच दिनांक २८.१२.२००६ चे अर्जानुसार अजून उत्तर किंवा शिक्षण शुल्क परत मिळाले नाही. तरी आपण यावर कोणती कार्यवाही केली ते ताबडतोब कळविण्याची कृपा करावी. २) तसेच रिक्त झालेल्या जागेवर दुसरा विद्यार्थीला प्रवेश दिला आहे काय ? जर दिला असल्यास त्याचा संपूर्ण तपशील कळवावा. वरील सविस्तर माहिती अर्जदाराला पोष्टाद्वारे ३० दिवसाचे आंत कळवावी. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.३.२००७ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी म्हणून संचालक, तंत्र शिक्षण, मुंबई यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. सदरच्या प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये दिनांक ९.५.२००७ रोजी माहिती अधिकारी तंत्र शिक्षण, म.रा. मुंबई यांनी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. सदरचे पत्र हे स्वयंस्पष्ट असून सोबत कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन यांच्या दिनांक २७.९.२००६ च्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेतील राऊंडस मधील मिळालेला प्रवेश रद्य केल्यानंतर मिळणाऱ्या शैक्षणिक शुल्क परताव्याबाबतचे पत्र सुध्दा त्यांनी माहितीकरिता उपलब्ध करुन दिलेले आहे व त्यामुळे सदरचे प्रकरणी अपीलकर्ता यांना संपूर्ण माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे प्रकरण हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर** **(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**दिनांक :- ११.७.२००८** **विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १७४९/२००७ व अपील क्रमांक १७५०/२००७.

श्री. चंद्रशेखर शांताराम बडवाईक,
अस्थायी आश्रम द्वारा वंजारी,
३५२, मुदलियार हाऊस, केशव निवास,
गांधीनगर, नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
पोलीस आयुक्त, /पोलीस उपआयुक्त,
परिमंडळ - १, नागपूर शहर, नागपूर.

श्री. एम. एम. वाढवे,
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक पोलीस आयुक्त,
सिताबर्डी विभाग, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १४.७.२००८)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २२.५.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक १४.७.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता विना अनुमतीने गैरहजर आहेत व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री. आर. आर. अवस्थी, उपआयुक्त, परिमंडळ-१ हे हजर आहेत.

२. अपील क्रमांक १७४९/२००७ मध्ये दिनांक १४.१२.२००६ रोजी व दिनांक ८.१२.२००६ चे अर्जाप्रमाणे एफ.आय.आर. ३५८ आरोपीचे जमानतीचे कागदपत्राची सत्यप्रत अर्जदारास त्वरित मिळणेकरिता आणि दिनांक ३०.११.२००६ चे तक्रारीचे अनुषंगाने जमानत रद्य करण्यासाठी काय कार्यवाही करण्यात आली याबाबत माहिती (लेखी). सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद करुन माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २६.१२.२००६ रोजी जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,

... २

सिताबर्डी/अंबाझरी विभाग, नागपूर शहर यांनी अपीलकर्ता यांना माहिती पुरविण्यासाठी अतिरिक्त शुल्क रुपये २/- चे भरणा करण्यास तसेच माहिती घेऊन जाण्यास कळविलेले दिसून येते व सदरचे पत्र अपीलकर्ता यांना दिनांक ८.१.२००७ रोजी प्राप्त झाल्याची पोच दिल्याची नोंद दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक २२.१.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय अपीलकर्ता यांना दिनांक २२.२.२००७ रोजी कळविण्यात आला असून मागितलेली माहिती त्यांना उपलब्ध करुन देण्यात यावी अशा प्रकारचा निर्णय दिलेला दिसून येतो. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना दिनांक २३.५.२००७ पर्यंत माहिती उपलब्ध झाली नसल्याने त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. सदरच्या अपीलाचे संदर्भामध्ये सहाय्यक पोलीस आयुक्त तथा माहिती अधिकारी यांनी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी खालील प्रमाणे खुलासा दाखल केलेला दिसून येतो. सादर की, विषयात नमूद द्वितीय अपील मध्ये दिनांक १७.६.२००८ रोजी होणाऱ्या सुनावणीची नोटीस या कार्यालयास दिनांक ७.६.२००८ रोजी प्राप्त झाली. उपरोक्त अपीलच्या संदर्भात तथ्य माहिती व खुलासा खालील प्रमाणे आहे. अपीलकर्ता श्री.चंद्रशेखर शांताराम बडवाईक, रा.अस्थायी आश्रम, द्वारा-वंजारी, ३५२, मुदलियार हाऊस, केशवनगर, गांधीनगर, नागपूर यांनी राज्य जनमाहिती अधिकारी, सिताबर्डी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, सिताबर्डी विभाग, नागपूर शहर यांचेकडे दिनांक १४.१२.२००६ रोजी माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत अर्ज करुन पोलीस स्टेशन, सिताबर्डी येथे त्यांचे तक्रारीवर दाखल अप.क्र. ३५८/०६, कलम ३४२, ४४८, ४२७ भा.द.वि. या गुन्हयातील आरोपीचे जमानतीचे कागदपत्राची सत्यप्रत तसेच त्यांच्या दिनांक ३०.११.२००६ चे तक्रारीचे अनुषंगाने जमानत रद्य करण्यासाठी काय कारवाई करण्यात आली याबाबत माहिती लेखी स्वरुपात मिळण्याची मागणी केली होती. त्यावर राज्य जनमाहिती अधिकारी, सिताबर्डी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, सिताबर्डी विभाग, नागपूर शहर यांचे मार्फत पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन, सिताबर्डी, नागपूर यांचे दिनांक २१.१२.२००६ रोजीचे पत्र जे माहिती अधिकाऱ्याने अर्जदारास पुरविले त्यात नमुद आहे की, उपरोक्त गुन्हा पोलीस तपासावर आहे व दोषारोपपत्र कोर्टात दाखल केले नाही, म्हणून उपरोक्त अधिनियमाचे कलम ८ अन्वये गुन्हयाचे कोणतेही कागदपत्र पुरविता येणे शक्य नाही. उपरोक्त प्राप्त माहितीवर अर्जदाराने प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उपायुक्त, परिमंडळ क्रमांक १, नागपूर शहर

... ३

यांचेकडे दिनांक २२.१.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले व त्या अपील अर्जात फिर्यादीने आरोपीच्या जमानतीचे कागदपत्राचे सत्यप्रतीची माहिती, माहिती अधिकाराअंतर्गत मिळणेकरिता अर्ज केलेला असून त्यास माहिती अधिकाराचे कलम ८ लागू नाही. कारण तो काही पोलीस चौकशीचा भाग नाही म्हणून आरोपी भालचंद्र शांताराम बडवाईक यांचे जमानतीचे कागदपत्राची सत्यप्रत तसेच फिर्यादीचे अर्जानुसार जमानत रद्द करणेकरिता काय कारवाई झाली याची माहिती मिळावी म्हणून अपील अर्जाद्वारे मागणी केली. उपरोक्त अपील दिनांक २२.१.२००७ रोजी प्राप्त झाल्यानंतर माहिती अधिकारी, सिताबर्डी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, सिताबर्डी विभाग, नागपूर यांना या कार्यालयाचे दिनांक २३.१.२००७ रोजीचे पत्राद्वारे अर्जदारास पुरविण्यात आलेल्या माहितीची छायांकित प्रत व या संबंधात केलेली कारवाई बाबतची माहिती पाठविणेबाबत कळविण्यात आले. तसेच अपीलकर्त्यास सुध्दा त्यांचे अपीलाबाबत त्यांचे म्हणणे ऐकून घेणेकरिता दिनांक ६.२.२००७ रोजी १८.०० वाजता पोलीस उपायुक्त कार्यालय, परिमंडळ क्रमांक १, नागपूर शहर येथे हजर राहण्याबाबत लेखी पत्राद्वारे सुचित करण्यात आले. उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे माहिती अधिकारी, सिताबर्डी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, सिताबर्डी विभाग, नागपूर यांनी त्यांचे दिनांक ३१.१.२००७ रोजीचे पत्रान्वये कळविले की, अर्जदाराने दिनांक १४.१२.२००६ रोजीच्या अर्जाद्वारे मागितलेली माहिती त्यांना त्यांचे कार्यालयाचे दिनांक २६.१२.२००६ रोजीचे दोन पत्रासोबत तसेच दिनांक ९.१.२००७ रोजीचे पत्रासोबत माहिती पुरविण्यात आलेली आहे व पुरविलेल्या माहितीच्या छायांकित प्रती एकूण ७ सोबत जोडून कार्यालयात सादर केले. अपीलकर्ता हे कार्यालयात हजर झाल्याने त्यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. त्यांनी समक्ष तोंडी सांगितले की, त्यांना माहिती अधिकाऱ्याकडून माहिती मिळालेली आहे. परंतु त्यांचे तक्रारीवर दाखल उपरोक्त अपराध क्रमांक ३५८/०६ या गुन्हयात आरोपीने (जो अपीलकर्ता यांचा सख्खा लहान भाऊ आहे) कोर्टातून अग्रीम जामीन प्राप्त केल्याचे त्यांना कळले आहे, तेव्हा आरोपीच्या अग्रीम जामीनाची प्रत व त्यासंबंधाने पोलीसांनी पाठविलेला अहवाल इत्यादीची प्रत त्यांना मिळालेली नाही व हे कागदपत्र फिर्यादी/अपीलकर्ता यास प्राप्त करण्यास उपरोक्त कायदयाचे कलम ८ हे लागू होत नाही सबब त्यांना उपरोक्त नमुद प्रती पुरविण्यात यावे अशी मागणी केली. यासंबंधात अपीलकर्त्यांचे म्हणणे, त्यांची मागणी व त्यांना पुरविण्यात आलेल्या माहितीचे कागदपत्रांचे अवलोकन करण्यात आले. उपरोक्त नमुद गुन्हयात याचिकाकर्ता हा फिर्यादी असल्याने त्यास आरोपीच्या जामीनास विरोध करण्याचा व त्यासंबंधाने जामीनाबाबतचे कागदपत्रांची मागणी करण्याचा

अधिकार आहे व त्यास माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ८ हे लागू नाही. सबब उपरोक्त दस्ताऐवजाच्या प्रती (जर अग्रिम जामीन आरोपीने प्राप्त केला असल्यास) याचिकाकर्त्यास प्राप्त करण्याचा कायदेशीर अधिकार आहे असे नमूद करुन त्या कागदपत्रांच्या प्रती पुरविणेबाबत माहिती अधिकारी यांना कळविण्यात आलेले आहे व त्याप्रमाणे त्यांना पोलीस स्टेशन, सिताबर्डी येथून प्रती बोलाविलेल्या असून ती घेवून जाणेबाबत अर्जदारास सुचित केल्याचे व अर्जदार त्याप्रमाणे गेल्या एक-दोन दिवसांत त्याप्रती त्यांचे कार्यालयातून प्राप्त करणार आहे असे अपीलकर्त्यास फोनवरुन संपर्क साधला असता अपीलकर्त्याने फोंनद्वारे कळविले. तेंव्हा मागितलेल्या कागदपत्रांच्या प्रती प्राप्त झाल्यानंतर या कार्यालयास कळविणेबाबत अर्जदारास समक्ष दुरध्वनीवर कळविण्यात आले व अशाप्रकारे अर्जदाराची अपील मान्य करण्यात आली. या अपील निर्णयाची प्रत अर्जदाराने स्वतः या कार्यालयात दिनांक २२.२.२००७ रोजी हजर होवून प्राप्त केली. उपरोक्त संबंधाने अपीलकर्ता श्री.चंद्रशेखर बडवाईक हे पुन्हा कार्यालयात हजर झाले व त्यांनी तोंडी सांगितले की, अपील अर्जाचे निर्णयाप्रमाणे त्यास अद्यापही जामीनाबाबतचे कागदपत्र प्राप्त झालेले नाही, म्हणून दिनांक २३.५.२००७ रोजीचे ज्ञापनाद्वारे माहिती अधिकारी, सिताबर्डी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, सिताबर्डी विभाग, नागपूर यांना उपरोक्त माहिती कां पुरविण्यात आली नाही याविषयी खुलासा मागण्यात आला तसेच निर्णयात नमुद प्रमाणे मागितलेली माहिती अर्जदाराला पुरवून पुर्तता अहवाल सादर करणेविषयी निर्देशित करण्यात आले. त्यावर माहिती अधिकारी सिताबर्डी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, नागपूर यांनी त्यांचे दिनांक ३१.५.२००७ रोजीचे पत्राद्वारे कळविले की, उपरोक्त माहिती प्राप्त होणेकामी संबंधित पोलीस निरिक्षक, सिताबर्डी यांना त्यांचे कार्यालयाचे दिनांक २१.१२.२००६, दिनांक ६.१.२००७, दिनांक २४.१.२००७ व दिनांक ३.१२.२००७ या पत्रान्वये वेळोवेळी पत्र व स्मरणपत्र देण्यात आलेले आहे, परंतु सदर प्रकरणी पोलीस निरिक्षक, सिताबर्डी यांचे कडून दिनांक २८.५.२००७ रोजी माहिती प्राप्त झाली ती प्राप्त झालेली माहिती अर्जदारास त्यांचे कार्यालयाचे दिनांक ३०.५.२००७ चे पत्रासोबत पुरविण्यात आलेली आहे व अहवालासोबत वरिष्ठ पोलीस निरिक्षक, सिताबर्डी यांचा अहवाल व सुचनापत्राची प्रत पाठविण्यात आली. या वरिष्ठ पोलीस निरिक्षक, सिताबर्डी यांचे अहवाल तसेच माहिती अधिकारी सिताबर्डी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, सिताबर्डी विभाग, नागपूर यांनी अपीलकर्ता श्री.चंद्रशेखर बडवाईक यांना पाठविलेले पत्र (सुचना पत्र) चे अवलोकन केले असता असे आढळून येते की, उपरोक्त पोलीस स्टेशन, सिताबर्डी येथे फिर्यादीचे तक्रारीवरुन

... ५

दिनांक २०.९.२००६ रोजी दाखल अपराध क्रमांक ३५८/०६ कलम ३४२, ४४८, ४२७ भा.द.वि. या गुन्हयातील आरोपी नामे भालचंद्र शांताराम बडवाईक वय ५२ वर्ष यास दिनांक २३.१०.२००६ रोजी २०.१५ वाजता अटक करुन जामीनदार मंगेश भालचंद्र बडवाईक यांचे जामीन मुचलक्यावर त्याव दिवशी म्हणजे दिनांक २३.१०.२००६ रोजी सोडण्यात आले होते. सदरहू आरोपी भालचंद्र शांताराम बडवाईक याने कोणत्याही कोर्टातून अटकपूर्व जामीन प्राप्त केलेला नव्हता. उपरोक्त प्रकरणी याठिकाणी हे तथ्य नमूद करणे ईष्ट वाटते की, आरोपीविरुध्द दाखल गुन्हा हा जामीन योग्य असल्याने त्यास अटक करुन कायदेशीर तरतूदीप्रमाणे जामीनावर मुक्त करण्यात आले होते, तसेच आरोपीने कोणत्याही कोर्टातून अटकपूर्व जामीन प्राप्त केलेला नव्हता म्हणजेच फिर्यादी/याचिकाकर्ता यास कळलेली माहिती ही चुकीची होती व त्यामुळे त्याने आरोपीच्या अग्रीम जामीनचे आदेशाची प्रत व त्यासंबंधात जामीन रद्य करण्याकरिता केलेली कारवाई व त्याकरिता पाठविलेल्या अहवालाचे प्रतीची मागणी ही चुकीच्या माहितीवरुन अवलंबून असून ती पुरविण्याची मागणी संयुक्तिक नव्हती. अर्जदारास उपरोक्त माहिती असलेले पत्र माहिती अधिकाऱ्याने दिनांक ३०.५.२००७ रोजी पुरविल्याचे दिनांक ३१.५.२००७ रोजीचे पत्राद्वारे कळविले आहे. तथापी अर्जदाराने द्वितीय अपील दिनांक २२.५.२००७ रोजी केल्याचे आढळून येते. उपरोक्त अपराध क्रमांक ३५८/०६ या गुन्हयात दिनांक २७.२.२००७ रोजी दोषारोपपत्र मा.जे.एम.एफ.सी. कोर्ट नं. २ यांचे कोर्टात आरोपी विरुध्द दाखल करण्यात आले असून त्याचा क्रि.केस नं. २५३६/०७, दिनांक २७.२.२००७ असा आहे व हा खटला सध्या न्यायप्रविष्ठ आहे. या गुन्हयासंबंधी अगर आरोपीच्या जामीनाबाबतचे कागदपत्र फिर्यादी/याचिकाकर्ता यास पाहिजे असल्यास तो मा.संबंधित कोर्टाज अर्ज करुन कायदेशीररित्या प्राप्त करु शकतो. या ठिकाणी ही बाब सुध्दा नमूद करणे आवश्यक वाटते की, अपीलकर्ता श्री.चंद्रशेखर शांताराम बडवाईक यांचा गैरअर्जदार भालचंद्र शांताराम बडवाईक वय ५२ वर्ष हा सख्खा लहान भाऊ असून या दोघा भावांचा वडिलोपार्जीत घरा विषयी वाद सुरु असून उपरोक्त घराची अद्यापपर्यंत अधिकृत वाटणी झालेली नसून या घरा संबंधाने याचिकाकर्ता तसेच त्यांचा लहान भाऊ भालचंद्र शांताराम बडवाईक हे एकमेकांचे विरुध्द पोलीस स्टेशनला सतत तक्रारी करीत असतात. श्री.चंद्रशेखर बडवाईक यांचे तक्रारीवरुन पोलीस स्टेशन सिताबर्डी येथे अपराध क्रमांक ३५८/०६ कलम ३४२, ४४८, ४२७ भा.द.वि. तसेच अपराध क्रमांक ३०९/०६ कलम ३८० भा.द.वि. हे गुन्हे दाखल झाले असून अपराध क्रमांक ३५८/०६ मध्ये आरोपी त्यांचा लहान भाऊ भालचंद्र बडवाईक यास अटक

... ६

करण्यात येवून खटला कोर्टात दाखल करण्यात आलेला आहे व तो न्यायप्रविष्ठ आहे. तसेच शांतता भंग होऊ नये म्हणून दोन्ही पक्षावर कलम १०७, ११६ जा.फौ.अन्वये प्रतिबंधक कारवाई करण्यात आलेली आहे. अर्जदार यांच्या तक्रारीवरुन वेळोवेळी कायदेशीर कारवाई करण्यात आलेली आहे. या ठिकाणी हे सुध्दा नमूद करण्यात येते की, याचिकाकर्ता श्री.चंद्रशेखर शांताराम बडवाईक यांनी त्यांचे भावा विरुध्द सुरु असलेल्या वादा संबंधाने व याबाबत त्यांनी वेळोवेळी दिलेल्या तक्रारी संबंधान आतापर्यंत एकूण ८ वेळा माहिती अधिकार अधिनियम अंतर्गत माहिती मागितलेली असून ती त्यांना पुरविण्यात आलेली आहे व प्राप्त माहितीवर त्याचे समाधान न होता त्याने प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे ८ वेळा अपील सुध्दा केलेले आहे व यासर्व अपील अर्जावर योग्य तो निर्णय देऊन अपील निकाली काढण्यात आलेल्या आहेत. हे माहिती मागितल्याचे अर्ज व त्यावर केलेल्या अपीलांची यादी यासोबत जोडलेली आहे. या व्यतिरिक्त याचिकाकर्त्यांने म्हणजे अर्जदार श्री.चंद्रशेखर शांताराम बडवाईक यांनी मा.उपमुख्यमंत्री व इतर वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांकडे वेळोवेळी अर्ज सुध्दा केलेले असून त्या अर्जाची चौकशी होऊन त्याबाबत अर्जदारास लेखी कळविण्यात आलेले आहे. यावरुन असे दिसून येते की, अपीलकर्ता यांना सदरच्या प्रकरणामध्ये माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे व त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

४. अपील क्रमांक १७५०/२००७ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक ११.१२.२००६ रोजी एफ.आय.आर. ३५८ दिनांक २०.१.२००७ चे तक्रारीबाबत फिर्यादी निर्देशित करण्यास तयार असतांना आरोपी विरुध्द पुरावे का गोळा करण्यात येत नाही. माहितीचा कालावधी दिनांक १८.९.२००६ ते आतापर्यंत अशी याबद्यलची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले दिसून येते. सदरच्या माहितीचे अर्जाचे अनुषंगाने दिनांक १२.१.२००७ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक २७.१.२००७ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये दिनांक २२.२.२००७ रोजी अपीलकर्ता यांना निर्णय कळविण्यात आलेला दिसून येतो. परंतु सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

५. द्वितीय अपीलाचे संदर्भामध्ये जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी खालील प्रमाणे खुलासा दाखल केलेला दिसून येतो. उपरोक्त संदर्भीय विषयान्वये सविनय सेवेशी सादर आहे की, विषयात नमुद द्वितीय अपील मध्ये दिनांक १७.६.२००८ रोजी होणाऱ्या सुनावणीची नोटीस या कार्यालयास दिनांक ७.६.२००८ रोजी प्राप्त झाली. उपरोक्त अपीलच्या संदर्भात खुलासा खालीलप्रमाणे सादर आहे. अर्जदार श्री. चंद्रशेखर बडवाईक यांनी दिनांक २०.९.२००६ रोजी दिलेल्या तक्रारीवरुन त्यांचा लहान भाऊ आरोपी भालचंद्र बडवाईक यांचे विरुध्द पो.स्टे.सिताबर्डी येथे अप.क्र.३५८/०६ कलम ३४२, ४४८, ४२७ भा.द.वि. अन्वये दाखल करण्यात आलेला होता. सदर गुन्हयाचा तपास करुन मा.न्यायालयात दिनांक २७.२.२००७ रोजी दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून त्याचा क्रि.केस नं. २५३६/०७ असा आहे व सदरचा खटला सध्या न्यायप्रविष्ट आहे. अपीलकर्ता चंद्रशेखर बडवाईक यांनी अपीलात उपस्थित केलेल्या मुद्याप्रमाणे अपीलकर्ता हे माहितीची नव्हे तर कारवाईची मागणी करीत आहे. जे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये अपेक्षित नाही. अपीलकर्ता यांनी क्रमांक १४५ सी.आर.पी.सी. कारवाईबाबत मागितलेल्या माहितीबाबत पो.नि.पो.स्टे. सिताबर्डी यांचे मार्फत चौकशी अधिकारी महिला पोलीस उपनिरिक्षक एस. एस. मेश्राम यांनी आपला चौकशी अहवाल सादर केला असून त्यांनी अर्जदार यांचेकडे प्रॉपर्टी संबंधी कागदपत्रांची वेळोवेळी मागणी करुनही अर्जदाराने कागदपत्र सादर केले नाही. तसेच अर्जदार व गैरअर्जदार यांचेत दोन वर्षापासून कोणत्याही भांडणाबाबत तक्रार नाही. तसेच दोघाही भावांचे प्रॉपर्टी संबंधी वाद हे दिवाणी न्यायालयात चालू असल्याने क्रमांक १४५ सी.आर.पी.सी. अन्वये कारवाई करता येत नसल्याचे आपले अहवालात नमुद केले आहे. ते पताका ग वर दर्शविण्यात आले आहे. कलम १४५ सी.आर.पी.सी. प्रमाणे कारवाई बाबत पो.नि.पो.स्टे., सिताबर्डी यांचेमार्फत चौकशी सुरु असल्याने चौकशी अंती कारवाई करणेबाबत पो.नि.पो.स्टे.सिताबर्डी हे इस्तगासा सादर करणेबाबत ठरविणार असल्याने सदरची कारवाई केव्हा सुरु होईल हे अपीलकर्ता हयास सदर प्रकरणाची चौकशी सुरु असलेबाबत लेखी कळविण्यात आले आहे. अपीलकर्ता श्री.चंद्रशेखर शांताराम बडवाईक, रा.अस्थायी आश्रय, घर नं. ३५२, केशव निवास, गांधीनगर, नागपूर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये दिलेल्या अर्जाची व त्यांना माहिती पुरविल्याची माहिती पुढीलप्रमाणे आहे. १) दिनांक ११.१२.२००६ रोजीचा अर्ज :- अर्जदार यांनी पो.स्टे.सिताबर्डी अप.क्र. ३५८/०६ मध्ये आरोपी श्री.भालचंद्र शा. बडवाईक विरुध्द पुरावे का गोळा करण्यात येत नाही याबाबतची

माहिती दिनांक ११.१२.२००६ रोजीचे अर्जान्वये जनमाहिती अधिकारी यांचेकडे करण्यात आली होती. सदरची माहिती पो.नि.पो.स्टे.सिताबर्डी यांचेकडून प्राप्त करुन अर्जदारास इकडील कार्यालयीन जा.क्र. ३८७३/०६, दिनांक १६.१२.२००६ अन्वये अर्जदारास माहिती उपलब्ध झाली असल्याने शुल्क भरणेबाबत अर्जदार यांना विहित मुदतीत लेखी कळविण्यात आले होते. अर्जदार यांनी सदरची माहिती दिनांक २६.१२.२००६ रोजी प्राप्त केली आहे. ते पताका अ वर दर्शविण्यात आले आहे. २) दिनांक ११.१२.२००६ रोजीचा दुसरा अर्ज :- अर्जदार यांनी दिनांक १.११.२००६ रोजी पोलीस आयुक्त आणि पोलीस उपआयुक्त यांना अर्जदार यांनी दिलेल्या अर्जावर काय कार्यवाही झाली याची लेखी माहिती दिनांक ११.१२.२००६ रोजी दिलेल्या दुसऱ्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी यांचेकडे मागितली होती. सदरच्या अर्जाबाबतची माहिती पो.नि.पो.स्टे.सिताबर्डी यांचेकडून प्राप्त करुन सदरचा अर्ज चौकशीस असून त्याची चौकशी ए.एस.आय.इंगळे हे करीत असल्याचे पो.नि.पो.स्टे.सिताबर्डी यांनी कळविले होते. सदरची माहिती अर्जदार यांना जा.क्र. ३८७२/०६, दिनांक १६.१२.२००६ अन्वये अर्जदारास माहिती उपलब्ध झाली असल्याने शुल्क भरणेबाबत अर्जदार यांना विहित मुदतीत लेखी कळविण्यात आले होते. अर्जदार यांनी सदरची माहिती देण्यात आली आहे. ते पताका ब वर दर्शविण्यात आले आहे. ३) दिनांक ११.१२.२००६ रोजीचा तिसरा अर्ज :- अर्जदार यांनी केस नं. १९५/०६, क. १०७, ११६(३) सी.आर.पी.सी. अंतर्गत केस चालू असतांना गैरअर्जदार अप.क्र. ३५८/०६, दिनांक २०.९.२००६ रोजी दाखल झाला आहे. त्याबाबत गैरअर्जदारावर काय कार्यवाही झाली याबाबत माहिती दिनांक ११.१२.२००६ रोजी दिलेल्या तिसऱ्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी यांचेकडे मागितली होती. सदरचा अर्जाबाबतची माहिती अर्जदार यांना जा.क्र. ११२/०७, दिनांक १२.१.२००७ अन्वये अर्जदारास माहिती उपलब्ध झाली असल्याने विहित मुदतीत लेखी कळविण्यात आले होते. अर्जदार यांना सदरची माहिती देण्यात आली आहे ते पताका क वर दर्शविण्यात आले आहे. ४) दिनांक ८.१२.२००६ व दिनांक ११.१२.२००६ रोजीचा चौथा अर्ज :- अर्जदार यांनी आरोपी भालचंद्र शा. बडवाईक याचा पुत्र मंगेश भालचंद्र बडवाईक याने अर्जदार यांचे रहाते भाग प्रथम मजल्यावर विद्युत मिटर बसविण्याचे काम करीत असतांना धमक्या देऊन अंगावर धाऊन काम करणाऱ्या लोकांना पळवून लावण्याबाबत दिनांक ३०.११.२००६ ची तक्रार एफ.आय.आर. नोंदवून सिताबर्डी पोलीस तपास का करीत नाही ? याबाबत माहिती दिनांक ११.१२.२००६ रोजी दिलेल्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी यांचेकडे मागितली होती. सदरच्या अर्जाबाबतची

माहिती अर्जदार याना जा.क्र. ३८७४/०६, दिनांक १६.१२.२००६ अन्वये अर्जदारास माहिती उपलब्ध झाली असल्याने शुल्क भरणेबाबत विहित मुदतीत लेखी कळविण्यात आले होते. अर्जदार यांना सदरची माहिती देण्यात आली आहे. ते पताका ड वर दर्शविण्यात आले आहे. ५) दिनांक ८.१२.२००६ व दिनांक ११.१२.२००६ रोजीचा पाचवा अर्ज :- अर्जदार यांनी सी.आर.पी.सी. कलम १४५ अंतर्गत ए.सी.पी. सिताबर्डी यांचेकडे दिनांक ७.१०.२००६ ला दाखल केलेल्या केसवर पो.स्टे.बर्डी कडून अहवाल का आला नाही आणि केस केव्हा सुरु होणार ? याबाबत माहिती दिनांक ११.१२.२००६ रोजी दिलेल्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी यांचेकडे मागितली होती. सदरच्या अर्जाबाबतची माहिती अर्जदार यांना जा.क्र. ३८६८/०६, दिनांक १६.१२.२००६ अन्वये अर्जदारास माहिती उपलब्ध झाली असल्याने शुल्क भरणेबाबत विहित मुदतीत लेखी कळविण्यात आले होते. अर्जदार यांना सदरची माहिती देण्यात आली आहे ते पताका इ वर दर्शविण्यात आले आहे. ६) दिनांक १४.१२.२००६ रोजीचा अर्ज :- अर्जदार यांनी मा.पोलीस उपआयुक्त, परि.क्र. १, नागपूर शहर यांना दिनांक १८.९.२००६ चे तक्रार अर्ज दिनांक १९.९.२००६ रोजी आदेश दिले होते त्याची सत्यप्रत मिळणेकरिताचा अर्ज दिनांक १४.१२.२००६ रोजी दिलेल्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी यांचेकडे मागितली होती. सदरच्या अर्जाबाबतची माहिती अर्जदार यांना जा.क्र. ९४/०७, दिनांक ९.१.२००७ अन्वये अर्जदारास माहिती उपलब्ध झाली असल्याने शुल्क भरणेबाबत विहित मुदतीत लेखी कळविण्यात आले होते. अर्जदार यांना सदरची माहिती देण्यात आली आहे ते पताका फ वर दर्शविण्यात आले आहे. अपीलकर्ता श्री.चंद्रशेखर शांताराम बडवाईक व त्यांचा सख्खा भाऊ श्री.भालचंद्र शांताराम बडवाईक यांचेत वडिलोपार्जीत घरावरुन वाद आहे. अपीलकर्ता यांनी दिनांक १६.८.२००६ रोजी दिलेल्या तक्रारीवरुन पो.स्टे.सिताबर्डी येथे अप.क्र. ३०९/०६ कलम ३८० भा.द.वि.चा दाखल करण्यात आला होता. उपरोक्त गुन्हयात तपासाअंती अ समरी दिनांक ८.१०.२००६ रोजी मंजूरीसाठी पाठविण्यांत आले आहे. एकंदरीत अर्जदार चंद्रशेखर बडवाईक यांनी जनमाहिती अधिकारी यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये मागितलेली माहिती अर्जदार यांना विहित मुदतीत पुरविण्यात आली आहे. अर्जदार हे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये माहिती मागत नसून पोलीसांनी त्यांचे अपेक्षेप्रमाणे कारवाई करावी हा त्यांचा खरा उद्येश आहे. अर्जदार हे कारवाई का करण्यात आली नाही ? केंव्हा करण्यात येईल ? तसेच तपास चौकशी व निर्णय प्रक्रियेविषयी प्रश्न उपस्थित करणे हे माहितीचा अधिकार अधिनियम अन्वये अपेक्षित नाही. अर्जदार यांनी

अधिनियमाअंतर्गत मागितलेली माहिती त्यांना वेळोवेळी विहित मुदतीत पुरविण्यात आली असल्याने अपीलकर्त्याचे अपील निकाली काढण्यास विनंती आहे.

६. प्रथम अपीलीय अधिकारी यांचा खुलासा खालील प्रमाणे आहे. अपीलकर्ता श्री.चंद्रशेखर शांताराम बडवाईक, रा. अस्थायी आश्रय, द्वारा - वंजारी, ३५२ मुदलियार हाऊस, केशवनगर, गांधीनगर, नागपूर यांनी राज्य जनमाहिती अधिकारी, सिताबर्डी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, सिताबर्डी विभाग, नागपूर शहर यांचेकडे दिनांक ८.११.२००६, दिनांक ११.१२.२००६, दिनांक १३.११.२००६ व दिनांक १२.१२.२००६ इत्यादी तारखांना माहिती अधिकार अधिनियम, २००५ अन्वये अर्ज करुन पोलीस स्टेशन, सिताबर्डी येथे त्यांचे तक्रारीवर दाखल अप.क्र. ३५८/०६ कलम ३४२, ४४८, ४२७ भा.द.वि. या गुन्हयासंबंधातील तसेच त्यांनी त्यांचा लहान भाऊ भालचंद्र शांताराम बडवाईक यांचे विरुध्द व.पो.नि. सिताबर्डी तसेच वरिष्ठ पोलीस अधिकारी यांना जे अर्ज दिलेले होते त्यासंबंधाने माहितीची मागणी केलेली होती व राज्य जनमाहिती अधिकारी, सिताबर्डी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, सिताबर्डी विभाग, नागपूर शहर यांनी अर्जदारास त्याने वेळोवेळी मागितलेली माहिती विहित मुदतीत पुरविलेली होती. परंतु प्राप्त माहितीने अपीलकर्त्यांचे समाधान न झाल्याने त्याने प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उपायुक्त, परि. क्र. १, नागपूर शहर यांचेकडे दिनांक २७.१.२००७ रोजी एकूण ५ अपील अर्ज दाखल केले होते. त्या अनुषंगाने दिनांक ३०.१.२००७ रोजीचे या कार्यालयाचे पत्रान्वये राज्य जनमाहिती अधिकारी, सिताबर्डी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, सिताबर्डी विभाग, नागपूर शहर यांचेकडून अपीलकर्त्यांस पुरविण्यात आलेल्या माहितीच्या छायांकित प्रती अभिप्रायासह कार्यालयात पाठविण्याबाबत निर्देशित करण्यात आले तसेच त्याच दिवशी म्हणजे दिनांक ३.१.२००७ रोजी अपीलकर्त्यांस त्यांचे म्हणणे समक्ष मांडणेकामी दिनांक ६.२.२००७ रोजी १८:०० वाजता या कार्यालयात हजर येणेबाबत लेखी पत्राद्वारे कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हे या कार्यालयात हजर झाले, त्यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. राज्य जनमाहिती अधिकारी, सिताबर्डी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, सिताबर्डी विभाग, नागपूर शहर श्री.वामन खरात यांनी त्यांचे दिनांक ३.२.२००७ रोजीचे पत्रासोबत अर्जदारास पुरविण्यात आलेल्या माहितीच्या प्रती सोबत जोडून पाठविल्या व पत्रात अर्जदारास दिनांक ११.१२.२००६ रोजी माहिती पुरविल्याचे नमुद केले, त्याचे अवलोकन करण्यात आले. अपीलकर्ता श्री.चंद्रशेखर शांताराम बडवाईक यांनी

प्रत्यक्ष सुनावणी दरम्यान सांगितले की, त्यांच्या तक्रारीवर पो.स्टे.सिताबर्डी येथे अप.क्र. ३५८/०६ दाखल आहे. त्या गुन्हयात कलम ४५७, ३८०, ४०३ ही कलमे लावण्यात आली नाही. त्यांच्या खोलीत असलेले सामान पोलीसांनी जप्त करुन त्यास परत केले नाही. आरोपी विरुध्द योग्य पुरावे सिताबर्डी पोलीस गोळा करीत नाही तसेच त्यांच्या मागणी प्रमाणे पोलीसांनी सदरहू वादा बाबत कलम १४५ जा.फौ.प्रमाणे स.पो.आ.सिताबर्डी विभाग यांचेकडे केस पाठविली नाही, ती पाठवावी व वरील मागण्या पुर्ण कराव्या अशी त्यांची मागणी आहे. अर्जदार श्री.चंद्रशेखर शांताराम बडवाईक यांनी दिनांक २७.१.२००७ रोजी या कार्यालयात दाखल केलेल्या ५ अपील अर्जाचे संबंधाने अर्जदाराचे म्हणणे, त्याने अपील अर्जात नमुद केलेली माहिती व अपीलाची कारणे व त्यास पुरविण्यात आलेल्या माहितीचे अवलोकन करुन दिनांक २२.२.२००७ रोजी त्यांच्या एकूण उपरोक्त नमूद पाचही अपील अर्जाबाबत निर्णय देऊन अपील फेटाळण्यात आली. अपील फेटाळण्याची कारणे व परिस्थिती या अपील निर्णयात विस्ताराने नमूद करण्यात आलेली आहे. कृपया त्याचे अवलोकन व्हावे, त्याची प्रमाणित प्रत यासोबत जोडलेली आहे. या खुलाश्यात हे नमूद करणे योग्य वाटते की, अपीलकर्ता श्री.चंद्रशेखर शांताराम बडवाईक व त्यांचा सख्खा लहान भाऊ श्री. भालचंद्र शांताराम बडवाईक यांच्यात त्यांचे वडिलोपार्जीत घरा विषयी मागील काही वर्षापासून वाद सुरु असून या वडिलोपार्जित घराची आपसात वाटणी झालेली नाही. या वडिलोपार्जित घरा बाबत व इतर काही कारणामुळे या दोन भावांत भांडण असून एकमेकांशी पटत नाही. अपीलकर्ता व त्याचा लहान भाऊ भालचंद्र बडवाईक यांनी एकमेकांचे विरुध्द पो.स्टे.सिताबर्डी येथे वेळोवेळी तक्रारी केलेल्या आहेत व वरिष्ठ पोलीस अधिकारी तसेच मा.उपमुख्यमंत्री, म.रा. मुंबई यांचेकडे सुध्दा तक्रारी केलेल्या आहेत. अपीलकर्ता श्री.चंद्रशेखर बडवाईक यांचे दिनांक १६.८.२००६ रोजी दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस स्टेशन, सिताबर्डी येथे अप.क्र. ३०९/०६ कलम ३८० भा.द.वि.चा गुन्हा दाखल करण्यात आलेला होता. उपरोक्त गुन्हयात तपासाअंती अ समरी दिनांक ८.१०.२००६ रोजी मंजूरीस्तव पाठविण्यात आलेली आहे. तसेच त्यांचे दिनांक २०.९.२००६ च्या तक्रारीवरुन त्यांचा लहान भाऊ आरोपी भालचंद्र बडवाईक यांचे विरुध्द अप.क्र. ३५८/०६ कलम ३४२, ४४८, ४२७ भा.द.वि.दाखल करण्यात आलेला होता. उपरोक्त गुन्हयात आरोपी भालचंद्र बडवाईक यांना दिनांक २३.१०.२००६ रोजी अटक करण्यात आलेली होती व त्यांचे विरुध्द मा.प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, कोर्ट नं. २, नागपूर यांचे कोर्टात दिनांक २७.२.२००७ रोजी दोषारोपपत्र दाखल करण्यात आलेले असून त्याचा क्रि.केस नं. २५३६/०७, दिनांक २७.२.२००७ असा असून

... १२

उपरोक्त खटला न्यायप्रविष्ठ आहे. अशा प्रकारे अपीलकर्ता श्री.चंद्रशेखर बडवाईक यांनी वेळोवेळी दिलेल्या तक्रारीवर दखल घेण्यात आलेली असून कायदेशीर कारवाई करण्यात आलेली आहे. तसेच गुन्हे दाखल करण्यात येऊन खटला कोर्टात दाखल करण्यात आलेला आहे. परंतु अपीलकर्त्यांचे पोलीसांनी केलेल्या कारवाईवर समाधान होत नाही व त्यामुळे त्यांनी उपरोक्त गुन्हयात कलम ४५७, ३८०, ४०३ भा.द.वि.लावण्यात यावे, त्याचे सामान जप्त करुन त्यांना परत करण्यात यावे. १४५ जा.फौ.चा खटला कोर्टात दाखल करण्यात यावा इत्यादी अनेक मागण्या वेळोवेळी अर्जाद्वारे तथा आम्हास तसेच संबंधित पोलीस अधिकाऱ्यांना भेटून केलेल्या आहेत. परंतु घराचा ताबा मिळून देणे इत्यादी काही बाबी पोलीसांचे अधिकार क्षेत्रातील नाही हे त्यांना प्रत्यक्ष भेटीत अनेक वेळा समजावून सांगण्यात आलेले आहे. त्यांनी दिलेल्या अर्जाचे चौकशीचे निष्कर्ष त्यांना वेळोवेळी लेखी तथा प्रत्यक्ष भेटीत कळविण्यात आलेले असून त्यांच्या समस्या व मागण्यांचे कायदयाच्या चौकटीत राहून निराकरण करण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. याठिकाही हेही नमूद करावयासे वाटते की, अपीलकर्ता श्री.चंद्रशेखर शांताराम बडवाईक यांनी वर नमूद गुन्हा व त्यांनी दिलेलया अर्जाचे संबंधात आतापावेतो राज्य जनमाहिती अधिकारी, सिताबर्डी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, सिताबर्डी विभाग, नागपूर शहर यांचेकडे वेळोवेळी एकूण ८ वेळा माहिती मागितलेली असून ती त्यांना पुरविण्यात आलेली आहे व पुरविण्यात आलेल्या माहितीवर त्यांचे समाधान न होता त्यांनी एकूण ८ अपील सुध्दा प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांकडे केलेले होते. त्यासर्व अपील अर्जावर निर्णय देण्यात आलेला आहे. एकंदरीत अर्जदाराने अर्जात मागितलेली माहिती तसेच प्रत्यक्ष भेटीत व अर्जात त्यांनी वेळोवेळी केलेली मागणीचे स्वरुप लक्षात घेता ते माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत माहितीची मागणी करीत नसून पोलीसांनी त्यांच्या अपेक्षेप्रमाणे कारवाई करावी हा त्यांचा खरा उद्येश आहे. माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत अभिलेखावर उपलब्ध असलेली माहिती तसेच इतर तोंडी माहिती अर्जदारास मागणी प्रमाणे लेखी स्वरुपात पुरविण्यात यावी अे अपेक्षित आहे. पुरविण्यात आलेली माहिती ही वैध आहे किंवा अवैध आहे, कारवाई कां करण्यात आली नाही व तपास, चौकशी, निर्णय प्रक्रिये विषयी प्रश्न उपस्थित करणे व त्या प्रश्नांचे उत्तर देणे हे माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत अपेक्षित नाही. तपास, चौकशी, कारवाईची वैधता, उपयुक्तता व त्यातील उणीवा इत्यादी संबंधाने संबंधित खात्याचे वरिष्ठ अधिकारी हे यावर निर्णय घेण्यास सक्षम आहेत व अपीलकर्ता हे यासंबंधाने वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांकडे दाद मागू शकतात.

अर्जदाराने उपरोक्त अधिनियमाअंतर्गत मागितलेली माहिती त्यास वेळोवेळी विहित मुदतीत पुरविण्यात आलेली असून त्यांनी वेळोवेळी केलेल्या अपीलावर संयुक्तिक व योग्य निर्णय देण्यात आलेला आहे. त्यामुळे अपीलकर्त्यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यास विनंती आहे.

७. अपीलकर्ता यांनी दिनांक ११.१२.२००६ रोजी जनमाहिती अधिकारी यांचेकडे केलेल्या अर्जात मागितलेली माहिती ही जरी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २ (च) या मधील "माहिती" या संज्ञेच्या व्याख्येत येत नसले तरी संपूर्ण एकच प्रकरणामध्ये अपीलकर्ता यांचे अनेक अर्जाचे संदर्भामध्ये जनमाहिती अधिकारी यांनी त्यांचा केलेला खुलाश्याप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपीलाचा निर्णय हा अतिशय स्वयंस्पष्ट दिलेला आहे. परंतु जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांच्याकडे अपीलकर्ता यांचे त्यांच्या या प्रकरणामध्ये त्यांना घर जागेचा कब्जा मिळवून द्यावा व त्यांच्या भावावर संपूर्ण कारवाई करावी अशी त्यांची अपेक्षा आहे. परंतु अपीलकर्ता यांचा वाद हा दोन भावामधील मालमत्तेचा वाद असल्यामुळे तो दिवाणी स्वरुपाचा आहे व त्याबाबत पोलीस यंत्रणेच्या माध्यमातून तो सोडविता येणार तरी त्यामुळे अपीलकर्ता हे वेळोवेळी माहितीचा अधिकाराचा अर्ज करीत असतात. अर्थात ही बाब मुळ खुलाश्यावरुन स्पष्ट होते व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांनी एकाच प्रकरणामध्ये अनेक अर्जाच्या माध्यमातून माहिती मागण्यासाठी प्रयत्न केलेला असल्यामुळे व अपील क्रमांक १७४९/२००७ मधील दिनांक १४.१२.२००६ चे पत्राप्रमाणे त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली असल्यामुळे त्यांचा अपील क्रमांक १७५०/२००७ मध्ये सुध्दा त्यांच्या दिनांक ११.१२.२००६ च्या अर्जाप्रमाणे व इतर अनेक अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे व त्यांचा दिवाणी स्वरुपाचा वाद हा ते पोलीस माध्यमातून सोडविण्याची अपेक्षा करीत असल्यामुळे आयोगाकडून कारवाईची अपेक्षा करीत असल्याने सदरची अपीले हे खारीज करण्यात येत आहेत.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**दिनांक :- १४.७.२००८**

HIREKHAN/BHUJI/३९९-४११/१४.७.२००८

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १५६७/२००७.

श्री. अशोक रामविलास शर्मा,
सतगुरु साई, न्यु स्वस्तिक नगर,
बडनेरा रोड, अमरावती. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
ग्रामीण पाणी पुरवठा विभाग,
जिल्हा परिषद, अमरावती.

श्री. संजय येवले,
जनमाहिती अधिकारी तथा
उपविभागीय अभियंता,
जिल्हा परिषद,
ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, अचलपूर,
जिल्हा अमरावती. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १५.७.२००८)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २८.२.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १५.७.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता यांनी दिनांक १४.७.२००८ रोजी दुपारी १३:२७ वाजता राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५.७.२००८ रोजी सुनावणीस असलेल्या त्यांच्या या अपीलाचे संदर्भामध्ये माझ्या पायावर झाडाचे खोड पडल्यामुळे मला व्यवस्थीत चालता येत नाही. डॉ. सल्ल्यानुसार मला ३-४ दिवसाची विश्रांती सांगितली आहे. तरी आपणास विनंती करतो की, मला पुढील तारीख देण्यात यावी असा फॅक्स अर्जदाराने पाठविलेला आहे. परंतु सदरच्या अर्जासोबत डॉक्टरांचे वैद्यकीय प्रमाणपत्र दाखल केलेले नाही. उत्तरवादी हजर आहेत व उत्तरवादी पैकी जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता हा काल दिनांक १४.७.२००८ रोजी जिल्हा परिषद, अमरावती ग्रामीण पाणी पुरवठा

... २

या कार्यालयात अपीलकर्ता यांना त्यांनी पाहिले होते. त्यांना ३:०० ते ३:३० वाजता त्यांना पाहिले आहे. त्यावेळेस त्यांच्या पायास कोणतीही दुखापत झालेली आहे असे त्यांना जाणवले नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांचा मुदतीचा विनंती अर्ज हा नाकारण्यात येत असून अपीलाची सुनावणी घेण्यात येत आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री. आनंद दासवन, उप कार्यकारी अभियंता हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २४.११.२००६ रोजी जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, जिल्हा परिषद, ग्रामीण पाणी पुरवठा, उपविभाग, अचलपूर यांच्याकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली होती असे दिसून येते. श्री.संजय येवले, उपविभागीय अभियंता, अचलपूर मी आपणांला रजिस्टर पोष्टद्वारे आर.एल.नं. १४५९, दिनांक २३.९.२००३ (२००३) व आर.एल.नं. १४९३, दिनांक ३.१०.२००३ ला पत्र दिले असता आपण ते रजिस्टर पत्र न घेता व न वाचता Refused करुन परत पाठविले त्याचे कारण काय ? कोणत्या नियमाखाली व कोणत्या अधिकाराचा उपयोग करुन आपण ते पत्र न घेता व न वाचता परत केलेले आहे त्याची माहिती देण्यात यावी. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १३.१२.२००६ रोजी उपविभागीय अभियंता यांनी अपीलकर्ता यांना आपण आपले अर्जात नमुद केलेल्या कालावधीचे अशा प्रकारचे पत्र या कार्यालयास आल्याची व तसे पत्र परत केल्याची कोणतीही नोंद या कार्यालयाचे अभिलेखात नसल्यामुळे सदर बाबत माहिती देणे शक्य नाही. तसेच असे काही घडल्याची बाबही स्मरणात नाही. तसेच आपण अर्जात उल्लेख केलेल्या अधिकाराबाबत/नियमाबाबत मला माहिती नाही असे कळविलेले दिसून येते. त्यावरुन अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी कार्यकारी अभियंता यांच्याकडे प्रथम अपील दिनांक २२.१२.२००६ रोजी दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ६.२.२००७ रोजी करण्यात आलेला दिसून येतो. सदरच्या निर्णयामध्ये अपीलकर्ता व उत्तरवादी यांनी दिलेला बयान व अपीलकर्ता यांनी सादर केलेली कागदपत्रे याबाबत विचार करता असे दिसून येते की, "अपीलकर्त्यांने दिनांक २३.९.२००३ व दिनांक ३.१०.२००३ रोजी अनुक्रमे आर.एल.नं. १४५९ व आर.एल.नं. १४९३ अन्वये उपविभागीय अभियंता, जिल्हा परिषद, ग्रामीण पाणी पुरवठा, उपविभाग, अचलपूर यांच्या नावे पोच पावती सह रजिस्टर पत्र पाठविले आहे व ही दोन्ही पत्रे दिनांक २६.९.२००३ व दिनांक ७.१०.२००३ रोजी संबंधित कार्यालयाकडून नाकारल्याची नोंद दोन्ही पत्रांवर स्पष्टपणे करण्यात आलेली आहे आणि त्यामुळे हि दोन्ही पत्रे

न स्विकारल्याचे स्पष्ट होते. वास्तविक पाहता शासकीय कार्यालयाकडे पत्र आल्यानंतर पत्र स्विकारली गेली पाहिजेत व प्राप्त पत्राची अर्जदारास माहिती देणे किंवा पाठविणेसंबंधीत कार्यालयाचे कर्तव्य ठरते. परंतु हया प्रकरणी असे झालेले नाही. त्यामुळे संबंधित उपविभागीय अभियंता यांनी यापुढे भविष्यात अशा घटना घडणार नाही याबाबत दक्ष राहावे व तशा सुचना त्यांनी कार्यालयात सुध्दा द्याव्यात व अपीलकर्त्यास आवश्यकता वाटत असल्यास अपीलकर्त्यांने पुनश्ःच उपविभागीय अभियंता, जिल्हा परिषद, ग्रामीण पाणी पुरवठा, अचलपूर यांना नव्याने अर्ज करावा किंवा पत्र पाठवावे व आपले प्रलंबित प्रश्नाची तड लावून घ्यावी व उपविभागीय अभियंता, अचलपूर यांनी अपीलकर्ता यांचा अर्ज किंवा पत्र नव्याने प्राप्त झाल्यास ते स्विकारुन संबंधितास माहिती तातडीने उपलब्ध करुन द्यावी किंवा आवश्यक ती कार्यवाही करुन तसे संबंधितास कळविण्यात यावे". असा निर्णय देऊन अपील निकाली काढण्यात आलेले दिसून येते. सदरच्या निर्णयाने अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे कार्यकारी अभियंता यांनी कोणत्याही प्रकारची कार्यवाही उपविभागीय अभियंता यांचे विरुध्द केली नाही म्हणून द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांनी दिनांक २४.११.२००६ च्या अर्जामध्ये ज्या दिनांक २३.९.२००३ व दिनांक ३.१०.२००३ रोजीच्या अनुक्रमे आर.एल.नं. १४५९ व आर.एल.नं.१४९३ या रजिस्टर पत्रास घेण्यास नकार दिल्याचे पत्र व पावत्या दाखल केलेल्या आहेत त्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, त्यावर Refused अशा शेऱ्यांची नोंद आहे व त्यामुळेच अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, सदरचे पत्र हे उपविभागीय अभियंता यांनाच पाठविले होते व त्यामुळे त्यांनीच ती Refused केलेले आहे व असे असतांना त्यांनी दिनांक १३.१२.२००६ रोजी खोटी व दिशाभूल करणारी माहिती दिली. वास्तविक सदरचे पत्राचे वर जरी उपविभागीय अभियंता यांना संदर्भीत केले असले तरी ती त्यांनी स्वतः नाकारली आहे अशा प्रकारचा कोणताही शेरा नाही. नाकारण्याचा शेरा पोष्टमन यांनी दिलेला आहे व त्याकरिता अपीलकर्ता यांनी दिनांक २.६.२००८ रोजीच्या सुनावणीच्या वेळेस त्यांनी पोष्टमनची साक्ष काढावा याबद्यलचे आदेश त्यांना देण्यात आले होते. कारण शासकीय कार्यालयामध्ये कोणतेही टपाल हे प्रत्यक्ष ज्या अधिकाऱ्यांना संबोधित केलेले असते तेच स्विकारतात व पोच देतात असे नाही. परंतु संबंधित पोष्टमन यांनी तशी साक्ष दिली असती तर त्यातूनच उपविभागीय अभियंता हे दोषी आहेत असा निष्कर्ष काढता आला असता. परंतु अपीलकर्ता यांनी आज

पोष्टमन यास साक्षीस न आणता त्यांच्या पायास दुखापत झाली आहे या कारणावरुन मुदत मागितली आहे. पोष्टमनच्या साक्षीबद्यल कोणताही उल्लेख त्या अर्जामध्ये नाही व त्यामुळे सदरच्या अर्जात वर नमुद केल्याप्रमाणे नाकारण्यात आला. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये जी माहिती सार्वजनिक प्राधिकरणामध्ये कागदपत्रे, अभिलेखाचे स्वरुपात उपलब्ध असेल तीच माहिती विहित मुदतीत उपलब्ध करुन देणे अपेक्षित असते. सन २००३ मध्ये अपीलकर्ता यांच्या म्हणण्याप्रमाणे जी पत्रे पाठविलेली आहेत त्या पत्राची नोंद आवक नोंद वहीत असेल तर त्याप्रमाणे उपविभागीय अभियंता यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. मुद्या राहिला तो अपीलकर्ता यांची पत्रे घेण्याचे कोणत्या अधिकारी किंवा कर्मचारी यांनी नाकारले हया बद्यलचा व हयाबद्यल प्रत्यक्ष ज्यांनी पत्र घेण्यास नाकारलेले आहे त्याची ओळख पटल्याशिवाय कोणत्याही अधिकारी किंवा कर्मचाऱ्यास जबाबदार धरता येणार नाही व तशीही ओळख पटल्यास सुध्दा अपीलकर्ता यांचा सन २००३ मधील पत्र हे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीच्या अंतर्गत नसल्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी राज्य माहिती आयोगास त्यांचे विरुध्द कोणत्याही प्रकारची कार्यवाही करता येणार नाही. त्याबद्यल स्वतंत्रपणे तक्रार सक्षम अधिकाऱ्यांकडे करुन त्याबाबत शिस्तभंगाची कार्यवाही त्या संबंधित अधिकाऱ्यांनी करणे हाच पर्याय ठरतो. तसेच अपीलकर्ता यांनी सदरचे पत्र हे Refused करण्याचे कारण काय, कोणत्या नियमाखाली व कोणत्या अधिकाराचा उपयोग करुन आपण ते पत्र न घेता, न वाचता परत करण्यात आले आहे याची माहिती द्यावी ही बाब सुध्दा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २ (च) मध्ये "माहिती" या संज्ञेच्या व्याख्येत येत नाही व स्पष्टपणे वर नमुद केल्याप्रमाणे Refused केल्याचा शेरा पोष्टमनचा असल्यामुळे त्याबाबतही कोणत्याही प्रकारची माहिती ही सार्वजनिक प्राधिकरणाच्या अभिलेखामध्ये किंवा आवक नोंदवही मध्ये देण्याचे कारणही दिसून येत नाही व त्यामुळेच सन २००३ मधील पाठविलेले पत्र कां नाकारण्यात आले याची कारणे सन २००६ मध्ये विचारणे हे विसंगत दिसून येते. वास्तविक त्याच वेळेस अपीलकर्ता यांनी वर नमुद केल्याप्रमाणे स्वतंत्रपणे तक्रार करावयास पाहिजे होती. ती मात्र केलेली दिसून येत नाही व त्यामुळे सदरच्या पत्रामध्ये केलेल्या तक्रारीचे बाबत अपीलकर्ता गंभीर आहे असे दिसून येत नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी युक्तिवादात सांगितले व त्यामुळेही अपीलकर्ता यांचे म्हणणे हे मान्य करता येण्यासारखे नाही. थोडक्यात अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी यांना त्यांच्या दिनांक २४.११.२००६ च्या माहितीच्या अर्जाप्रमाणे विहित मुदतीत म्हणजे दिनांक १३.१२.२००६

रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे व प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये सुध्दा तशाच प्रकारचा निर्णय दिलेला असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक २४.११.२००६ च्या अर्जाप्रमाणे दिनांक १३.१२.२००६ रोजी म्हणजे विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १५.७.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/४१२-४१६/१५.७.२००८

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १७५९/२००७.

श्री. शेख फिरोज शेख जाफर,
जुना बस स्टॉप, मु.पो.ता. रामटेक,
जि. नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मैंगनिज ओर (इंडिया) लिमिटेड,
मॉयल भवन, १ ए, काटोल रोड,
नागपूर - ४४० ०१३.

श्री. एल. एम. तेलंग,
जनमाहिती अधिकारी तथा
उपव्यवस्थापक, (सामान्य)
मैंगनिज ओर (इंडिया) लिमिटेड,
मॉयल भवन, १ ए, काटोल रोड,
नागपूर - ४४० ०१३. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १६.७.२००८)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २२.५.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १६.७.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २४.११.२००६ रोजी माहिती अधिकारी मैंगनिज ओर (इंडिया) लिमिटेड, नागपूर यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. पटवारी हलका नं. ३८, खसरा नं. ९४ मौजा परसोडा, रामटेक येथील माईनिंग लिजचे संमतीपत्र व आदेशाची प्रत मिळण्याबाबत. प्रथम मंजूर झालेल्या आदेशाची प्रत व नुतनीकरणे आदेशाची प्रत. १) मौजा परसोडा पटवारी हलका नं. ३८ खसरा नं. ९४/ जुना नं. ७२ या क्षेत्रावर मंजूर करण्यात आलेल्या आदेशाची प्रत व प्रथम मंजूर झालेल्या आदेशाची प्रत व

... २

नुतनीकरणाची आदेशाची प्रत. २) या क्षेत्रावरील कास्तकाराने दिलेल्या संमतीपत्र क ची झेरॉक्स प्रत मिळण्याबाबत. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १६.१२.२००६ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. सदरच्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी श्री.सी.पी.एन.पाठक, अपीलीय अधिकारी तथा संचालक उत्पादन यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २.२.२००७ रोजी दिलेला दिसून येतो. सदरच्या प्रथम अपीलाच्या निर्णयामुळे सुध्दा समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. सदरच्या द्वितीय अपीलाचे संदर्भामध्ये जनमाहिती अधिकारी मैंगनीज ओर (इंडिया) लिमिटेड, नागपूर यांनी आयोगाकडे पुढील प्रमाणे खुलासा केलेला आहे. "With reference to the above, the undersigned would like to inform you that Manganese Ore (India) Limited is a Public Sector Undertaking under the Ministry of Steel, Govt. of India, New Delhi. The Company comes under the jurisdiction of Central Act, Right to Information Act, २००५, applicable to Central Government/Central Public Sector Undertaking. Therefore the appeal, if any, should have been filed with Central Chief Information Commission and not before the State Chief Information Commission." वरील खुलाश्याचे अनुषंगाने मैंगनीज ओर (इंडिया) लिमिटेड हा केंद्र शासनाचा सार्वजनिक उपक्रम असल्यामुळे त्या सार्वजनिक प्राधिकरणाकरिता अधिनियमाच्या कलम २(१)(क) प्रमाणे "समूचित शासन" हे केंद्र शासन असल्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या निर्णया विरुध्द द्वितीय अपील हे केंद्रीय माहिती आयोगाकडे दाखल करावयास पाहिजे होते हे जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे योग्य आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांनी सदरचे अपील हे केंद्रीय सुचना आयोग, ब्लॉक नं. IV, पांचवा तल, पुराना जे.एन.यु.परिसर, नवी दिल्ली - ११० ०६७. यांचेकडे दाखल करणे संयुक्तिक राहिल व त्याकरिता सदरचे अपील हे निकाली काढण्यास पात्र आहे.

... ३

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे राज्य माहिती आयोगाच्या अधिकारितेच्या अभावी निकाली काढण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांचे निर्णया विरुध्द केंद्रीय सुचना आयोगाकडे सदरचे द्वितीय अपील दाखल करावे.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १६.७.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/४१७-४१९/१६.७.२००८

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १७५७/२००७.

श्री. राजू शंकरराव निकोसे,
मु. पो. सावरी (बिड), ता. वरोरा,
जि. चंद्रपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
संवर्ग विकास अधिकारी,
पंचायत समिती, वरोरा
चंद्रपूर.

श्री. था. च. अगळे,
जनमाहिती अधिकारी तथा
अधिक्षक,
पंचायत समिती, वरोरा,
चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १७.७.२००८)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.६.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १७.७.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व माहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या तर्फे श्री.एस.आर.काळे, पशुधन विकास अधिकारी, हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ५.२.२००७ रोजी माहिती अधिकारी, पंचायत समिती, वरोरा, जिल्हा चंद्रपूर यांच्याकडे नविन विशेष घटक योजना अंतर्गत कामाची रक्कम (विहिरीच्या) व नविन अंदाज पत्रकानुसार किती मंजूर व बाकी किती आहे हयाबद्दल माहिती. सन २००५-०६ च्या कालावधीतील माहिती खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. १) विहिर बांधकामाचे आदेश पत्र का दिले नाही हयाबद्दल माहिती. २) कुटुंबात सिंचन विहिर नसतांना सुध्दा कृषि अधिकारी (मॅडम) हयांनी वरिष्ठांना चुकीची माहिती व

... २

दिशाभूल करुन ६ महिने वेळ घालविल्याबद्यल माहिती. ३) काम वरोरा पंचायत समितीचे असतांना जबरदस्तीने पाठविल्या विषयी (चिमूर पंचायत समिती) माहिती. ४) विहीर खसली असता लेखी अर्ज देवून सुध्दा मोक्यावर तपासणीसाठी वेळेवर न आल्याबद्यल माहिती. ५) विहिरीवर उपसा साधन ऑ.इंजिन/मीटर पंप अर्ज देवून न दिल्याबद्यल माहिती. ६) विहिरीचा निधी शासनाकडून वरोरा पंचायत समितीला केंव्हा उपलब्ध झाला याबद्यल माहिती. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले दिसून येते.

३. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १४.२.२००७ रोजी आपण मागितलेली विषयांकित माहिती या कार्यालयात उपलब्ध असून प्रति प्रत २/- रुपये याप्रमाणे तसेच पोस्टल खर्च पंचायत समिती, वरोरा कार्यालयांत जमा करुन त्वरित माहिती घेऊन जावे असे माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना कळविलेले दिसून येते. सदरची माहिती अपीलकर्ता यांना दिनांक २३.२.२००७ रोजी मिळालेली दिसून येते. त्याकरिता त्यांनी रुपये १०/- भरणा केले होते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे त्यांचे समाधान न झ ााल्यामुळे त्यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक २४.४.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले आहे. सदरच्या प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये दिनांक २२.५.२००७ रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात आली असे दिसून येते व त्यामुळे ही अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

४. अपीलकर्ता यांच्या दिनांक ५.२.२००७ च्या अर्जाचे अनुषंगाने जी माहिती उपलब्ध झालेली आहे त्याबद्यल अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांनी दारिद्रय रेषे खालील प्रमाणपत्र दाखल केले होते. तरीसुध्दा त्यांचेकडून रुपये १०/- ची वसूली करुन त्यांना एकच कागद उपलब्ध करुन दिलेला आहे. त्यावर जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, त्यांनी दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र हे त्यांचे वडिलांचे जोडले होते त्यामध्ये त्यांचे नांव नाही त्याकरिता त्यांनी त्यांच्या रेशनकॉर्डची छायांकिंत प्रत मागितली होती ती त्यांनी दिली नाही त्यामुळे त्यांचेकडून रुपये १०/- वसूल करण्यात आले होते. प्रथम अपीलाचे संदर्भात माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे व त्यावर अपीलकर्ता यांनी शपथपत्र दाखल केलेले आहे. ते खालील प्रमाणे आहे मी माहिती कायदयाअंतर्गत माहिती मिळवण्याकरिता अर्ज केला असता जनमाहिती अधिकारी व अपीलीय अधिकारी यांचेकडून माहिती अपूर्ण, खोटी व दिशाभूल करणारी आढळल्यास मी आपणाकडे अपील अर्ज

केला आहे. त्यामधील माहिती खोटी असल्याचे आढळल्यास मी त्यास पात्र राहिल. आमचे कुटुंबात सिंचन विहिर नसून सुध्दा कृषि अधिकारी कारेकार यांनी वरिष्ठांना चुकीची माहिती देऊन ६ महिने वेळ घालविला व बुध्दीपुरस्पर टाळाटाळी करत आर्थिक नुकसान केले व अर्ज करुन ऑईल इंजिन/मोटार पंप देण्यात आला नाही व ३ वर्षात माझे आर्थिक नुकसान ३०००००/-रुपयांचे झाले आहे काय वरोरा पंचायत समितीचे असतांनी जबरदस्तीने ४ विहिरी व अनुदानाची रक्कम चिमूर पंचायत समितीमध्ये पाठविण्यात आले होते. वरिष्ठ अधिकाऱ्यांने कुणाचेही ऐकले नाही करिता मी आपणाकडे अर्ज करीत आहे. माझे नांव बी.पी.एल. यादीत समाविष्ट असून जनमाहिती अधिकारी यांनी जाणूनबुजून फी आकारली हयाकरिता शपथपत्र करीत आहे. त्याच प्रमाणे जनमाहिती अधिकारी यांनी सुध्दा खुलासा दाखल केलेला आहे तो खालील प्रमाणे आहे. १) उपरोक्त संदर्भीय विषयाचे अनुषंगाने विनंती याप्रमाणे आहे की, श्री.राजू शंकरराव निकोसे, मु.पो.सावरी (बिड), तालुका वरोरा, जिल्हा चंद्रपूर यांनी पंचायत समिती, वरोरा कार्यालयात माहितीच्या अधिकारा अंतर्गत प्रथम अर्जावर दिनांक ५.२.२००७ ही दिनांक नमुद केलेली आहे. परंतु सदर अर्ज माझ्याकडे दिनांक ७.२.२००७ ला प्राप्त झालेला आहे. अर्ज प्राप्त झालेला आहे. अर्ज प्राप्त झाल्यानंतर सदर अर्जावर पाहणी करुन अर्ज माहिती मागविणेस्तव कु.एन.जी.कारेकार, कृषी अधिकारी (विघयो), पंचायत समिती, वरोरा यांचेशी संबंधित असल्यामुळे पत्र क्रमांक पंसव/२८४/०७, दिनांक ७.२.२००७ अन्वये माहिती प्राप्त करुन घेणेस्तव त्यांचेकडे पाठविले. त्यांचेकडून अर्जासंबंधाने माहिती दिनांक ८.२.२००७ ला प्राप्त झाली व त्या अनुषंगाने श्री.राजू शंकरराव निकोसे यांना पंचायत समिती, वरोरा कार्यालयाचे पत्र क्रमांक पंसव/स्था-१/३४८/०७, दिनांक १४.२.२००७ अन्वये माहिती घेऊन जाणेस्तव पत्र देण्यांत आले. त्यांना दिनांक २३.३.२००७ ला कु.एन.जी.कारेकार, कृषी अधिकारी (विघयो) यांनी दिलेली माहिती पुरविण्यांत आली व माहिती दिल्यानंतर त्यांची स्वाक्षरी घेण्यांत आली. २) अर्ज क्रमांक २ हा पंचायत समिती कार्यालयास अर्जदाराने प्रत्यक्षात दिनांक ३.९.२००७ ला सादर केल्यानंतर अर्जाची पाहणी करुन पत्र क्रमांक पंसव/३१/०७, दिनांक ६.९.२००७ अन्वये कृषी अधिकारी (विघयो), पंचायत समिती, वरोरा यांचेकडे दिनांक ६.९.२००७ ला पंचायत समितीचे डाकद्वारा पाठविण्यांत आले. कृषि अधिकारी (विघयो), कु.एन.जी.कारेकार यांचेकडून दिनांक १८.९.२००७ ला माहिती प्राप्त झाली व अर्जदार दिनांक २४.९.२००७ ला प्रत्यक्षात कार्यालयात माहिती घेणेस्तव हजर झाले असता त्यांना दिनांक २४.९.२००७ ला कु.एन.जी.कारेकार, कृषी अधिकारी (विघयो)

यांचेकडून प्राप्त झालेली माहिती पुरविण्यांत आली. तरी महोदयांना विनंती करण्यांत येते की, माझेकडून अर्जदाराचे दोन्ही प्राप्त अर्जावर कार्यवाही करण्यांबाबत विलंब केलेला नाही व कु.एन.जी.कारेकार, कृषी अधिकारी (विघयो) यांचेकडून प्राप्त झालेली माहिती मुदतीच्या आंत पुरविलेली आहे. श्री.राजू शंकरराव निकोसे, मु.पो.सावरी (बिड) हे पंचायत समिती, वरोरा कार्यालयात आल्यानंतर सहानुभुतीपूर्वक न वागता असभ्यपणाची वर्तणुक करीत असतात. दस्ताऐवजावर स्वाक्षरी करणेस्तव विनंती केली असताना सुध्दा ते स्वाक्षरी करण्यास नकार देतात. प्रसंगी कर्मचाऱ्यांवर हात उगारण्यासारखे प्रकार सुध्दा करीत असतात. त्यामुळे त्यांना सहानुभुतीपुर्वक माहिती देणे अथवा माहिती दाखविणे करिता अडचणी निर्माण होत असतात. रेकॉर्ड फाडण्याचा सुध्दा प्रयत्न करीत असतात. त्यामुळे त्यांची तक्रार पोलीस स्टेशन, वरोऱ्याला सुध्दा देण्यांत आलेली आहे. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी जो खुलासा दाखल केलेला आहे त्या खुलाश्या सोबत श्री. राजू शंकरराव निकोसे यांचे बाबतीत तारखेवार सादर करावयाचे खुलाश्यातील सहपत्र सादर केलेले आहे व एकूण २८ सहपत्र दाखल केलेले आहेत. त्यात कु.एन.जी.कारेकार यांना अपीलकर्ता यांनी ज्या धमक्या दिलेल्या आहेत त्याबद्यल पोलीस स्टेशनमध्ये केलेल्या पोलीस तक्रारची प्रत दिलेली आहे. असे असुन सुध्दा अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही व कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांचेशीही योग्य रितीने वागणूक करीत नाही त्यावर कृषि अधिकारी कु.एन.जी.कारेकार यांना लिहिलेले पत्र सुध्दा त्यांनी दाखविले. सदरच्या पत्राची भाषा ही असभ्य असून शासकीय पत्रव्यवहारामध्ये सदरच्या पत्राचा काहीही संबंध येत नसला तरी अपीलकर्ता यांनी अशा प्रकारचे पत्र लिहिल्याचे मान्य केले आहे. अपीलकर्ता यांनी कु.एन.जी.कारेकार यांना प्रेमपत्रांच्या स्वरुपात अश्लील पत्रे दिलेली दिसून येतात. ही कु.एन.जी.कारेकार यांनी आयोगाचे निदर्शनास आणली व त्याच पत्रांच्याबाबत पोलीस तक्रार केलेली आहे. याकरिता मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांनी सदरच्या प्रकरणामध्ये स्वतंत्रपणे निपक्षपातीपणे चौकशी करणे संयुक्तिक राहील. मात्र अपीलकर्ता यांना वेळोवेळी माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांना वेळोवेळी माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांनी अपीलकर्ता यांच्या संपूर्ण प्रकरणामध्ये वर नमुद केलेल्या सर्व कागदपत्राच्या संदर्भामध्ये व कु.एन.जी.कारेकार यांच्या तक्रारीच्या संदर्भामध्ये चौकशी करुन तसा चौकशी अहवाल आयोगाकडे ३ महिन्याचे आंत सादर करावा व तसेच चौकशी अहवालाच्या निष्कर्षानुसार योग्य ती कार्यवाही करावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १७.७.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १७७४/२००७.**

श्री. वसंत गोविंदराव बोंदरे,
८/१८/९, कोराडी कॉलनी, ता. कामठी,
जि. नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. डी. के. बेदरकर,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,
गोलबाजार, ता. कामठी,
जि. नागपूर.

श्री. सुनिल वाघ,
जनमाहिती अधिकारी तथा
सचिव, के.टी.पी.एस.एम्प्लॉईज क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटी,
कोराडी, ता. कामठी, जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १७.७.२००८)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २५.५.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १७.७.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत. तसेच श्री. राजू ढोबळे उत्तरवादीचे वकील हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २२.८.२००६ अध्यक्ष/सचिव, के.टी.पी.एस.एम्प्लॉईज क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटी, कोराडी, ता. कामठी, जि. नागपूर यांच्याकडे १) संस्थेच्या २८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेतील ठराव. २) २००३ च्या हस्ताक्षर तज्ञाचा तपासणी अहवाल. असा माहितीचा विषय देऊन आवश्यक माहितीचे वर्णन १) दिनांक १०.८.२००३ संस्थेच्या २८ व्या वार्षिक आमसभेचे सविस्तर टिपणीसहीत ठराव क्रमांक ९(८) व इतर सत्यप्रती मिळणेबाबत. २) केस क्रमांक १५७/०४ चे संदर्भात हस्ताक्षर तज्ञाचा २००३

... २

च्या तपासणी अहवालाची सत्यप्रती मिळणेबाबत. ३) आमसभेचे दिनांक १०.८.२००३ व दिनांक २०.६.२००४ चे मिनिट्स ऑफ मिटींगची सत्यप्रती टिपणीसहीत माहितीच्या अधिकारांतर्गत मागितलेली असून माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले दिसून येतो. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक ४.९.२००६ रोजी व्यवस्थापक, के.टी.पी.एस.एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि. यांनी अपीलकर्ता यांना आपण सदर अर्जामध्ये निर्देशित केलेल्या क्र. ३(६) अंतर्गत ज्यासाठी माहिती आवश्यक आहे त्या प्रयोजनामध्ये आपल्या ३ आवर्ती ठेवीच्या पैशाची अफरातफर झाली होती त्याचे निवारण करणेबाबत असे नोंदले आहे. परंतु महोदय, या अनुषंगाने आपण संस्थेविरोधात मा.अतिरिक्त जिल्हा ग्राहक तक्रार निवारण न्यायमंच, नागपूर येथे केस क्र. १५७/०४ अन्वये दावा दाखल केला होता. सदर दाव्याचे अनुषंगाने त्यासंबंधीचे सर्व कागदपत्र संस्थेने मा. न्यायालयात दाखल केले होते सदर कागदपत्रांची एक प्रत आपणालाही मा.अतिरिक्त जिल्हा ग्राहक तक्रार निवारण न्यायमंच, नागपूर यांचेमार्फत मिळालेली आहे. मा.अतिरिक्त जिल्हा ग्राहक तक्रार निवारण न्यायमंच, नागपूर यांनी संस्थेविरोधातला आपला दावा क्रमांक १५७/०४, दिनांक ८.७.२००५ चे आदेशानुसार खारीज केलेला आहे. त्यामुळे आपल्या दिनांक २२.८.२००६ चे अर्जातील मागणी फेटाळण्यात येत आहे. सदर निर्णयाचे विरोधात आपणांस अपिलात जायचे असल्यास अपिलेट अधिकारी मा.सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, गोलबाजार, कामठी, जि. नागपूर यांचेकडे सदर पत्र मिळाल्यापासून ३० दिवसांचे आंत अपील दाखल करता येईल याची नोंद घ्यावी असे कळविलेले दिसून येते. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी दिनांक ४.१२.२००६ रोजी सहाय्यक निबंधक सहकारी संस्था यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचे निर्णय संदर्भात दिनांक ३.१.२००७ रोजी निर्णय दिलेला दिसून येतो. श्री.बोंदरे हयांनी मागितलेली कागदपत्रे त्यांचेकडून आवश्यक शुल्क भरुन तात्काळ पुरवावे व ती कागदपत्रे आपणाकडे उपलब्ध नाहीत त्यांचे सविस्तर उत्तर कारणमिमांसेसह त्यांना देवून सदर पत्राची प्रत हया कार्यालयांस सादर करावी. विहित कालावधीत कागदपत्रे न पुरविल्यांस अथवा समर्पक उत्तर न दिल्यास माहितीचा अधिकाराअंतर्गत होणाऱ्या कार्यवाहीस संस्थेचे संचालक मंडळ व व्यवस्थापक जबाबदार राहील हयांची नोंद घ्यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. सदरच्या निर्णयाप्रमाणे दिनांक १८.१.२००७ रोजी संस्थेचे सचिव यांनी दिनांक १०.८.२००३ व दिनांक २०.६.२००४ च्या आमसभेचे इतिवृत्ताची सत्यप्रत संबंधित माहिती मागविण्यासाठी मा.सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, कामठी यांनी दिनांक २९.१२.२००६ रोजी दिलेल्या निर्देशानुसार आपणांस असे

... ३

कळविण्यात येते की, आपल्याला पुरविण्यासाठी वरील माहिती तयार आहे. आपणांस ही माहिती पुरविण्यासाठी अतिरिक्त शुल्क रुपये ३८१/- आपण या कार्यालयाकडे दिनांक २४.१.२००७ किंवा तत्पूर्वी प्रदान करावे व माहिती घेऊन जावी असे कळविलेले दिसून येते. पुन्हा दिनांक २४.१.२००७ रोजी अपीलकर्ता यांनी त्यांना शुल्क रुपये ३८१/- चा भरणा दिनांक २०.१.२००७ रोजी केलेला असल्यामुळे दिनांक २४.१.२००७ रोजी आपणांस संस्थेच्या दिनांक १०.८.२००३ चे आमसभेच्या इतिवृत्तांताचे ५२ पेजेसच्या झेरॉक्स प्रती व दिनांक २०.६.२००४ चे आमसभेच्या इतिवृत्तांताचे ७५ पेजेसच्या झेरॉक्स प्रती पुरविण्यात येत आहेत. आपण संदर्भीय पत्र क्रमांक १ नुसार सन २००३ च्या हस्ताक्षर तज्ञाच्या तपासणी अहवालाची मागणी केली होती. परंतु असा कुठलाही अहवाल संस्थेकडे उपलब्ध नाही असे त्यांना कळविले गेले होते. त्यावर दिनांक ६.२.२००७ रोजी अपीलकर्ता यांनी संस्थेचे सचिव यांना स्मरणपत्र दिलेले दिसून येते व त्या स्मरणपत्रामध्ये हस्ताक्षर तज्ञाचा अहवालाचे संदर्भात माहिती दिलेली दिसून येते. दिनांक २७.२.२००७ रोजी पुन्हा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था यांनी संस्थेचे सचिव यांनी हस्ताक्षर तज्ञाचा अहवाल प्राप्त करुन देण्याचे आदेश दिलेले दिसून येतात. दिनांक २८.३.२००७ रोजी संस्थेकडून सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, कामठी यांनी हस्ताक्षर तज्ञांचा तपासणी अहवाल संस्थेने आधिच दावा क्रमांक १५७/०४ अंतर्गत मा.अतिरिक्त जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच, नागपूर येथे सादर केला असल्याने व त्याची प्रत संस्थेकडे उपलब्ध नसल्याने तो त्यांनी मा. न्यायालयांतून घ्यावा संस्थेकडे सदरहु अहवाल उपलब्ध नाही. असे कळविले दिसून येते. तत्पुर्वी अपीलकर्ता यांनी पुन्हा दिनांक २६.२.२००७ रोजी सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, कामठी यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. परंतु सदरच्या प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये कोणत्याही प्रकारचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. परंतु अपीलकर्ता यांनी हस्ताक्षर तज्ञांचा अहवाल प्राप्त झाल्या नसल्याने त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. द्वितीय अपीलामध्ये २००३ च्या हस्ताक्षर तज्ञांचा तपासणी तपशील मिळवून द्यावा अशी विनंती केलेली दिसून येते.

३. सदरच्या अपीलाचे संदर्भामध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक १७.७.२००८ रोजी खुलासा दाखल केलेला आहे. तसेच उत्तरवादी यांनी सुध्दा त्यांचे वकीलांचे माध्यमातून खुलासा दिनांक ११.६.२००८ रोजी दाखल केलेला आहे. अपीलकर्ता यांनी त्यांच्या दिनांक २२.८.२००६ च्या अर्जातील मुद्या क्रमांक १ व ३ ची माहिती

उपलब्ध झालेली आहे असे त्यांनी मान्य केले व वर नमुद केल्याप्रमाणे ते सिध्द होते. परंतु मुद्दा क्रमांक २ च्या संदर्भामध्ये त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही असे त्यांचे म्हणणे आहे. त्याकरिता त्यांनी आयोगाचे निदर्शनास दिनांक १०.८.२००३ व दिनांक २०.६.२००४ च्या आमसभेचे इतिवृत्त निदर्शनास आणले. सदरच्या दोन्ही संस्थेच्या बैठकीमध्ये हस्ताक्षर तज्ञांकडे सदरचे प्रकरण पाठवा असा निर्णय झालेला दिसून येतो व त्यानंतरच हस्ताक्षर तज्ञांकडे कागदपत्रे पाठविले आहे असे उत्तरवादी यांचे वकीलांचे म्हणणे आहे व हस्ताक्षर तज्ञांचा अहवाल हा आयोगाचे निदर्शनास आणल्याप्रमाणे दिनांक ९.५.२००५ असा आहे असे दिसून येते. अपीलकर्ता यांनी सुध्दा श्री.उल्हास आठले यांच्या दिनांक ९.५.२००५ च्या अहवालाची प्रत सादर केलेली आहे. सदरच्या अहवालाच्या प्रतीचे अवलोकन केले असता कोणत्या तारखेला संस्थेने श्री.उल्हास आठले यांच्याकडे कागदपत्रे पाठविले हे दिसून येत नाही पण हस्ताक्षर तज्ञांनी दिनांक ९.५.२००५ रोजी अहवाल दिलेला दिसून येतो. याचा अर्थ २००३ मध्ये हस्ताक्षर तज्ञांचा अहवाल नाही. परंतु दिनांक २०.६.२००४ च्या मिनिट्समध्ये अहवाल प्राप्त झाला असा उल्लेख असल्यामुळे श्री.उल्हास आठले यांचा अहवाल कोणत्या प्रकरणी वर नमुद केल्याप्रमाणे संस्थेस पाठविल्याचा उल्लेख दिसून येत नाही व अपीलकर्ता यांच्या दाखल केलेल्या खुलाश्यामध्ये सुध्दा त्यांचे म्हणणे असे आहे की दोन भिन्न अहवाल आहेत व त्यामुळे हस्ताक्षर तंज्ञ श्री.उल्हास आठले यांनी दोन अहवाल संस्थेस दिले होते काय याबद्यल त्यांची साक्ष काढणे किंवा शपथपत्राचे माध्यमातून पूरावा हा आवश्यक वाटतो. त्याकरिता सदरचा निर्णय स्थगित ठेवण्यात येईल. पुढील तारीख २.९.२००८ रोजी दुपारी २.०० वाजता देण्यात येत आहे. त्याकरिता हस्ताक्षर तज्ञ श्री.उल्हास आठले यांना अधिनियमाचे कलम १८ व १९ प्रमाणे दिवानी प्रक्रिया संधी १९(८)(५) अन्वये दाव्याची चौकशी करतांना दिवानी न्यायालयाकडे जे अधिकार निहित करण्यात आलेले आहेत त्याप्रमाणे ३(ग) प्रमाणे शपथपत्रावर साक्षीपुरावा घेणे. ३(ङ) साक्षीदाराची किंवा दस्तऐवजाची तपासणी करण्याकरिता समन्स काढणे या अधिकारान्वये शपथपत्र दाखल करण्याचे अनुषंगाने नोटीस काढणे आवश्यक आहे व त्याप्रमाणे नोटीस काढून सदरच्या निर्णयाची प्रत त्यास जोडून श्री.उल्हास आठले, ७, ईस्ट हायकोर्ट रोड, न्यु रामदासपेठ, काचीपूरा, नागपूर- ४४० ०१० या पत्त्यांवर पाठवावी.

**नागपूर**

**दिनांक :- १७.७.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/४२५-४२८/१७.७.२००८

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १७८१/२००७.

श्री. रुपचंद भगवानजी ढोले,
प्लॉट नं. ७२४, आर्शिवादनगर,
हुडकेश्वर रोड, नागपूर - ४४० ०२४. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. अजय रामटेके,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अप्पर आयुक्त,
नागपूर महानगरपालिका,
नागपूर.

श्री. एस. एस. हस्तक,
जनमाहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
नागपूर महानगरपालिका, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १८.७.२००८)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २३.५.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १८.७.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १७.३.२००६ रोजी माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग, महानगरपालिका, नागपूर यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. I) Subject matter of Information :- Water bill not claimed as per meter readiing + Rate of charges claimed in water bill consumer No.१३०४९०, meter No. ५४५९३३. II) The period of which the Information required :- २७.११.१९९६ to २८.२.२००६

... २

III) Discription of the Information required :- Required correct biil as per meter reading and also the rate of charges claimed in the arrears bill. IV) Whethere Information is required by post or in person :- By speed post. V) Purpose for which the Information is required :- By speed post. To know at what rate the water charges have been claimed by the N.M.C. Water works Deptt. Nagpur in bill No. ६०३९७९, dated २.३.२००६ because inspite of my repeated request dated २२.३.२००१, २६.९.२००१, ७.२.२००२, २८.३.२००३, ९.३.२००४, २९.७.२००४, १३.८.२००४, ८.११.२००४, ३.९.२००५, ९.११.२००५ and the complaint filed before Consumer Forum Nagpur. No. ३४६/०३ decided २१.१.२००४ and M.A. No. ४०/२००५ decided on १४.१०.२००५ the water work Deptt. has failed to give me any kind of Information till date nor inclined to correct the bill but found to be claimed the bills stereotypely without correcting the bill. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १२.४.२००६ रोजी खालील प्रमाणे माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली दिसून येते. दिनांक २३.८.१९९६ ते २८.२.२००६ पर्यंतचे पाण्याचे देयकाबदलची माहिती खालीलप्रमाणे. १) दिनांक २७.११.१९९६ ते दिनांक ३१.८.२००० पर्यंत मिटर वाचन घेण्यायोग्य स्थितीत न ठेवल्यामुळे देयक पाणीपट्टी दराचे मुल्यांकन आणि वसुली उपविधीतील तरतुदीनुसार देयक देण्यात आले आहे. २) दिनांक ३१.८.२००० ते दिनांक १६.२.२००१ वर देयक प्रत्यक्ष वाचन/मिनिममवर देण्यात आले आहे. ३) दिनांक १६.२.२००१ ते दिनांक ९.३.२००१ या कालावधीचे देयक कंझुमर कोर्टच्या दिनांक २१.१.२००४ चा आदेशानुसार देण्यात आले आहे. दिनांक ९.३.२००१ चा पुढील देयक प्रत्यक्ष वाचन/मिनिममवर देण्यात आले आहे. ४) वरील सर्व देयक महाराष्ट्र शासनाने ३० ऑगष्ट २००० ला वाढविलेल्या खालील दराने देयक देण्यात आले आहे. (अ) पहिले १० युनिट ३/- रुपये प्रति युनिट, १० ते ३० युनिट ३.५० रुपये प्रति युनिट, ३० युनिटचा पुढे ४/- रुपये प्रति युनिट. ५) देयक हे प्रत्यक्ष वाचन किंवा मिनिमम या तत्वावर देण्यात आले आहे. अपीलकर्ता यास सदरच्या उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे त्यांनी पुन्हा माहिती अधिकारी यांचेकडे २७.४.२००६ रोजी साधा अर्ज केलेला दिसून येतो. पुन्हा दिनांक १२.६.२००६ रोजी अर्ज केलेला आहे. परंतु त्यावर १०/- रुपयांचा स्टॅम्प लावला नाही.

... ३

त्याप्रमाणे दिनांक १०.७.२००७ रोजी त्यांना रुपये ४२/- हे माहिती पुरविण्यासाठी शुल्क व पोस्टल चार्जेस करिता भरणा करण्यास कळविण्यात आले आहे. पुन्हा अपीलकर्ता यांनी दिनांक १४.११.२००६ रोजी माहितीच्या अधिकारात अर्ज दाखल केलेला दिसून येतो. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १२.१२.२००६ रोजी माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक ९.१.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले आहे. प्रथम अपीलाचे मुद्यांमध्ये त्यांनी वर नमुद केलेले तीनही अर्जाचे संदर्भामध्ये एकत्रित अशी मागणी केलेली दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २८.५.२००७ रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांना माहिती प्राप्त झालेली आहे या कारणास्तव अपील निकाली काढण्यात आलेले आहे. तत्पुर्वी अपीलकर्ता यांना दिनांक १६.३.२००७ रोजी माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते व त्याबाबतची त्यांनी कोणत्याही प्रकारची खुलासा केलेला दिसून येत नाही व अपील निकाली काढण्यात आलेले आहे. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांच्या दिनांक १७.३.२००६ च्या अर्जातील माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, त्यांच्या पाण्याच्या देयकाचे संदर्भामध्ये त्यांची तक्रार दिसून येते. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे व ग्राहक मंचाचे निर्णयाप्रमाणे पाणी पुरवठा विभागाने सदरच्या देयकाचे संदर्भामध्ये दुरुस्त देयक उपलब्ध करुन दिले नाही अशी त्यांची मागणी आहे. दिनांक १२.४.२००६ च्या उत्तराचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, दिनांक २७.११.१९९६ पासून ३१.८.२००० पर्यंत मीटर वाचन घेण्यायोग्य स्थितीत न ठेवल्यामुळे देयक पाणीपट्टी दराचे मुल्यांकन आणि वसुली उपविधीतील तरतुदीनुसार केले आहे. नंतरच त्यांच्या देयकाचे संदर्भामध्ये प्रत्यक्ष वाचन/मिनिममवर देण्यात आले आहे. वरील सर्व देयक महाराष्ट्र शासनाने ३० ऑगष्ट २००० ला वाढविलेल्या दराप्रमाणे देयक देण्यात आले. देयक हे प्रत्यक्ष वाचन किंवा मिनिमम या तत्वावर देण्यात आले आहे असे पुन्हा नमुद केलेले आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी प्रमाणे सार्वजनिक प्राधिकरणामध्ये माहिती ज्या साहित्याचे स्वरुपात उपलब्ध असते उदा.:- अभिलेख, दस्तऐवज, कागदपत्रे, टिप्पणी इत्यादीच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे. कोणत्याही प्रकरणात निर्णय प्रक्रियेच्या संदर्भामध्ये कार्यवाही करुन मिळणे अपेक्षित नाही व त्यामुळे अमलात असलेले नियम व

अपीलकर्ता यांना मिळालेली देयके त्यांची स्वत: त्यांनी पडताळणी करुन स्वतंत्रपणे अधिनियमातील नियमाचे किंवा उपविधीच्या तरतुदीप्रमाणे सक्षम अधिकाऱ्यांकडे तक्रार करुन न्याय मिळवून घेणे अशा प्रकारच्या कार्यवाहीची पध्दत अवलंबिल्यानंतर जरी त्या तक्रारीस न्याय झाला नसेल तर त्याबाबत माहिती मात्र उपलब्ध होऊ शकते. प्रत्यक्ष कोणत्याही निर्णय प्रक्रियेच्या संदर्भात कार्यवाहीचे आदेश देणे हे अपेक्षित नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांना त्यांच्या देयकाचे संदर्भामध्ये जी तक्रार केली आहे त्या तक्रारीचे निराकरण हे राज्य माहिती आयोगाचे अधिकार कक्षे बाहेर आहे. तसेच अपीलकर्ता यांनी एकूण माहितीचे अर्ज दाखल केलेले आहे व त्या तीनही माहितीच्या अर्जाचे संदर्भामध्ये त्यांना वेळोवेळी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या अपील मेमोमध्ये त्यांनी "१) Why the water works dept. had levied the water bill on average basis when the meter was well working ? २) Why the water charges of Rs. ९१७/- which was paid during the १९९६ to २००० on average billing should not been adjusted against the current bill ? ३) Why it was not informed during the period of nine years (१९९६-२००५) on any occasion regarding meter installation is not on readable place." या तिनही प्रश्नाचे उत्तर वर नमुद केल्याप्रमाणे माहिती या संज्ञेच्या व्याख्येत येत नसल्यामुळे व अपीलकर्ता यांना वेळोवेळी माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांनी दिनांक १७.३.२००६ च्या अर्जाप्रमाणे विहित मुदतीत माहिती उपलब्ध झालेली आहे. तसेच त्यांच्या इतर अर्जाचे संदर्भात सुध्दा विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता यांनी स्वतंत्रपणे संबंधित अधिनियमा अंतर्गत सक्षम अधिकाऱ्याकडे स्वतंत्रपणे तक्रार करुन त्यांना न्याय मिळवून घेता येईल.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**दिनांक :- १८.७.२००८**

HIREKHAN/BHUJI/४२९-४३२/१८.७.२००८

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १७९२/२००७.

श्री. रामराव भुराजी ठाकरे,
प्लॉट नं. १२, राधाकृष्ण मंदीराच्या पाठीमागे,
हुडकेश्वर रोड, पो. म्हाळगीनगर
नागपूर - ४४० ०३४. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. अजय रामटेके,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अप्पर आयुक्त,
नागपूर महानगरपालिका,
नागपूर.

श्री. संजय कटयारमल,
जनमाहिती अधिकारी तथा
कर निर्धारक,
नागपूर महानगरपालिका, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १९.७.२००८)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १०.५.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १९.७.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता विनाअनुमतीने गैरहजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ७.१२.२००६ रोजी आयुक्त, महानगरपालिका, सिव्हील लाईन, नागपूर यांच्याकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. १) उपरोक्त देयकात सन १९९९ ते २००६ या वर्षाचा सरसकट आकार/कर दाखविल्यामुळे मला त्याची वर्गीकृत उकल होत नसल्यामुळे वर्षे-निहाय व कर निहाय प्रत्येक वर्षासाठीचे विस्तृत वर्गीकरण करुन माहिती देण्यात यावी. २) २००६ ते २००७ चा कर हा

... २

समानतेच्या धोरण व कायद्यानुसार लावण्यात आला आहे काय ? तसेच गरीब कल्याण गृह निर्माण सहकारी संस्था अंतर्गत असलेल्या सर्व करदात्या समवेत भुखंड क्षेत्रफळ व बांधकाम क्षेत्रफळ यासह त्याच फार्मुल्यानुसार व प्रमाणे अर्जदारांचे घरावर कर आकारणी झाली आहे काय ? किंवा काही भेदभाव तफावत आहे काय ? ३) कर आकारणीकरिता आपणाद्वारे घराचा स्केच घेण्यात आला आहे. तेंव्हा माझ्या घराचा स्केच व प्रत्यक्ष बांधकामाचे मोजमाप यात काही तफावत आहे काय ? याविषयी आपल्या अधिकाऱ्याने जाणून घेतले आहे काय ? त्याच्या अभिप्रायसह चौकशी अहवाल, त्यांचे नांव व पदनाम व चौकशीचा दिनांक देण्यात यावा. तसेच आपल्या यंत्रणेने माझ्या घराचा जो स्केच घेतलेला आहे त्याची प्रमाणित छायांकित प्रत देण्यात यावी. ४) इतर संस्थेच्या मोजमापाप्रमाणे आपणही घराचे मोजमाप करता काय ? किंवा याकरिता आपले वेगळी पध्दत व वेगळा मापदंड आहे काय ? असल्यास सविस्तर योग्य समजण्यायोगी व नेमका अर्थबोध होणारी विस्तृत माहिती देण्यात यावी. ५) अधिकाऱ्याच्या स्वाक्षरीखाली नाव व दिनांक लिहिण्याकरिता महाराष्ट्र शासनाने परिपत्रक संकीर्ण २००५/५६६/प्रक३०/२००५/१८, दिनांक १६ जून, २००५ द्वारे प्रत्येक कार्यालयातून निर्गमित होणाऱ्या पत्रावर जो अधिकारी स्वाक्षरी करतो तेंव्हा त्याच्या स्वाक्षरीखाली कंसामध्ये त्याच्या नावाचे आद्याक्षरे संक्षेपाने नमुद करणे बंधनकारक केले आहे व असे असतांनाही आपल्या पत्राद्वारे माझेशी केलेल्या पत्र व्यवहारातून हि बाब हद्यपार का केली गेली ? उपरोक्त पत्राची प्रत आपणाकडे नसल्यास त्याची एक प्रत मला मागितल्यास बिना पैश्याने निशुल्क व तत्परतेने आपणास उपलब्ध करुन देण्यात येईल. कृपया यांची नोंद घ्यावी. ६) उपरोक्त संदर्भीय कर निर्धारण देयकाची (थकबाकीसह) छायाप्रत सोबत जोडली असून त्यामध्ये १९९९ ते २००६ पर्यंतच्या रुपये ७,४९०/- ची थकबाकी असल्याचे अंकीत केले आहे. परंतु याद्वारे स्पष्ट व अर्थबोध होत नसल्यामुळे व अर्जदाराला कर निर्धारण तथा आकारणीबाबत ज्ञान नसल्यामुळे आपण उपरोक्त रक्कमेचे प्रतिवर्षाप्रमाणे वर्गीकृत करुन माहिती घ्यावी. ७) उपरोक्त देयकात मलजल कर हा एकमुस्त स्वरुपात वर्ष १९९९ ते २००६ पर्यंत रुपये १९२८/- आकारण्यात आला आहे. त्याचे प्रतिवर्ष वार्षिक परिगणन स्पष्ट करुन माहिती देण्यात यावी. ८) आमचे परिसरात नागपूर सुधार प्रन्यासने मागील वर्षी ५७२ ले आऊट नियमितीकरण अंतर्गत मलजल वाहिका टाकलेली आहे व ती अध्याप पावेतो चार्ज झाली नाही व ज्याअर्थी परिसरातील मलवाहिका कार्यान्वीतच नाही तेंव्हा मलजलकर आकारणी कोणत्या नियमाच्या तरतुदीनुसार उचित ठरते ? याबद्यल नियमाच्या कारणा पुरत्या तरतुदीसह उचित व अर्थबोध होणारी माहिती

देण्यात यावी. ९) वरील बार्बीमुळे मलजलकर आकारणी पासून अर्जदारास सवलत का मिळू शकत नाही ? १०) अर्जदार करदाता या मलवाहिकेचा वापर करतो असे आपण कोणत्या आधारावर गृहित धरले ? माहिती देण्यात यावी. ११) अर्जदाराचे संडासाची जोडणी सदरहु मलवाहिकेस जोडली आहे हे आपण कसे जाणून घेतले कृपया माहिती देण्यात यावी. १२) विद्यमान मलवाहिका जी अद्याप पावेतो च्यार्ज झाली नाही ही मलवाहिका जमिनीच्या समतल आहे ? किंवा जमिनीपासून किती फुट उंच आहे ? माहिती देण्यात यावी. १३) अर्जदार करदाता आपल्या घरातील संडासाची जोडणी उक्त मलवाहिकेसोबत कां जोडू शकला नाही ? याची आपण मोका पाहणी केली आहे काय ? केली असल्यास काय निष्पन्न झाले कृपया माहिती देण्यात यावी. १४) पाणीकर हा रुपये १३७३/- आकारुन तो १९९९ ते २००६ पर्यंतचा असल्याचे दर्शविले आहे. अर्जदाराने २००३ पासून आपले कार्यालयाकडून नळ जोडणी घेतली असून त्याचा भरणा आपले कार्यालयात नियमित होत असतांना पाणी कर एकमुस्त कसा व कोणत्या आधारे आकारण्यात आला ? तो नेमका कोणत्या कालावधीचा आहे व त्याचा तेव्हाचा दर कोणता ? १५) (अ) सामान्य कर ३०१६/- आकारला आहे तेंव्हा या कराचे प्रती वर्षाप्रमाणे वर्गीकरण करुन माहिती देण्यात यावी व याचा नियमानुसार दर कोणता ? (ब) सामान्य कर आकारणीचे मुलतत्वे व गुणसुत्रे स्पष्ट करुन सांगण्यात यावे. १६) शिक्षण कर रुपये ८४८/- आकारलेला आहे तेंव्हा याबाबतही कर आकारणी मुलतत्वे व गुणसुत्रे तथा वर्गीकरण प्रती वर्षाप्रमाणे करुन अर्थबोध होणारी माहिती देण्यात यावी. १७) अर्जदार करदात्याला वरीलप्रमाणे वर्ष १९९९ ते २००६ व २००६ ते ३१.३.२००७ प्रमाणे आकारणी केलेला कर मनपा नागपूर यांचे नियमानुसार संपूर्णतः उचित व योग्य असल्याचे व त्यामध्ये कोणतीही विसंगती नसल्याचे आपणाकडून प्रमाणित टिपणी प्रमाणपत्र स्वरुपात अर्जदारास माहिती देण्यात यावी व त्यात नियमांचा क्रमांक व संदर्भ देण्यात यावा व या नियमाच्या तरतुदीच्या छायाप्रती या प्रकरणाचा पाठपुरावा करण्यास्तव किमतीवर देण्यात याव्यात. सदरची माहिती विहीत मुदतीत उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक १२.१.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. त्यानंतर सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १६.१.२००७ रोजी कर निर्धारक तथा माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय विहित मुदतीत झाले नसल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते व त्यानंतर सदरच्या प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये १५.५.२००७ रोजी देण्यात आलेली दिसून येते.

३. अपीलकर्ता यांनी दिनांक ७.१२.२००६ रोजी जरी अर्ज केला असला तरी तो अर्ज दिनांक ११.१२.२००६ रोजी जनमाहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झालेला असल्यामुळे सदरची माहिती दिनांक १६.१.२००७ रोजी उपलब्ध करुन देण्यात आली आहे. तसेच अपीलकर्ता यास पूर्वी १६.१.२००७ रोजी सुध्दा अशाच प्रकारची माहिती मागून अर्ज आलेला असल्यामुळे त्यांना दिनांक ५.१२.२००६ रोजी आपण मागितलेल्या माहितीचे प्रमाण बरेच मोठे असून ही एकत्रितपणे गोळा करुन दिल्यास या कार्यालयाचे बरेचसे मनुष्यबळ व वेळ खर्ची पडणार आहे. आपण व्यक्तिशः कार्यालयात येऊन माहितीचे अवलोकन करावे व अति महत्वाच्या कागदपत्रांची प्रत शुल्क भरुन प्राप्त करुन घ्यावे असे कळविलेले दिसून येते. तरीही अपीलकर्ता यांनी सदरचा माहितीचा अर्ज करुन त्यात पुन्हा प्रश्नार्थक व व्यापक प्रमाणात माहिती मागितलेली आहे व त्यामुळे मागील अर्ज व ही माहिती उपलब्ध करुन देण्यास विलंब झाला आहे असे माहिती अधिकारी यांनी सांगितले. प्रथम अपीलाचे संदर्भात सुध्दा अपीलकर्ता यांचे एकूण ३ अर्ज असल्यामुळे त्या तीनही अर्जाचे संदर्भामध्ये सुनावणी घेऊन एकच निर्णय हा दिनांक १५.५.२००७ रोजी दिलेला आहे असे प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे आहे. त्यावर अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता तसेच त्यांचा दिनांक ५.१.२००७, दिनांक ९.१.२००७ व दिनांक १२.१.२००७ च्या अर्जाचे एकत्रित अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपीलकर्ता यांनी एकाच विषयाबाबत प्रश्नार्थक संदर्भामध्ये सर्व अर्जामध्ये माहिती मागितलेली दिसून येते. अपीलकर्ता यांनी सर्व अर्जामध्ये मागितलेल्या माहितीच्या संदर्भात कर निर्धारक यांनी यांनी खुलासा दाखल केलेला दिसतो. तो खालील प्रमाणे आहे. अर्जदार श्री.रामराव भुराजी ठाकरे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ नियम ३ प्रमाणे दिनांक १५.११.१००६ ला अर्ज सादर केला असता त्यामध्ये त्यांनी १६ प्रश्नांची माहिती मागितलेली आहे. या अनुषंगाने त्यांना कार्यालयीन पत्र क्रमांक ५२९, दिनांक ५.१२.२००६ अन्वये माहिती ही विस्तृत प्रमाणात असून मनुष्यबळ कमी असल्यामुळे निरीक्षण घेण्याबाबत कळविले होते. त्यांना दिनांक २२.११.२००६ ला नस्तीचे निरीक्षण देण्यात आलेले आहे. दिनांक ११.१२.२००६ ला त्यांनी पुनःश्च माहितीचा अधिकारात पत्र पाठवून १७ प्रश्नांची माहिती मागितलेली होती. परंतु त्यांना माहिती ही व्यक्तिशः पाहिजे किंवा पोस्टाद्वारे पाहिजे हे त्यांनी अर्जात नमूद केलेले नाही. या पत्राच्या अनुषंगाने त्यांना कार्यालयीन पत्र क्रमांक ६२७, दिनांक १६.१.२००७ अन्वये पोस्टाद्वारे माहिती पुरविलेली आहे. अर्जदारानी अपील अर्जात विचारलेल्या मुद्यांबाबत १) मुद्या क्रमांक १ : अर्जदारानी दिनांक

७.१२.२००६ जरी अर्ज केलेला असला तरी तो कार्यालयास दिनांक ११.१२.२००६ ला प्राप्त झालेला आहे. अर्जदाराचे अर्ज जेव्हा जेव्हा प्राप्त झाले तेव्हा त्यांच्या सोबत पत्रव्यवहार केला असता त्यांनी काही वेळेस पत्र घेण्यास नकार सुध्दा दिलेला आहे. त्याचप्रमाणे त्यांनी अर्जात माहिती कोणत्या प्रकारे पाठवावी हे नमूद न केल्यामुळे आणि मागितलेली माहिती ही विस्तृत प्रमाणात असल्यामुळे आणि बऱ्याच मोठया प्रमाणात मनुष्यबळ खर्च करावा लागल्याने माहिती गोळा करण्यास उशिर झाला. २) मुद्या क्रमांक २ : अर्जदारानी मुद्या क्रमांक २ मध्ये घेतलेला आक्षेप चुकीचा असून त्यांना पुरविण्यात आलेली माहिती ही वर्षनिहाय देण्यात आलेली आहे. त्यामुळे ती बरोबर असून आक्षेप चुकीचा आहे. ३) मुद्या क्रमांक ३ : अर्जात घराचा स्केचची प्रत न दिल्याचे नमूद केलेले आहे. परंतु कार्यालयीन पत्र क्रमांक ५९८/एडी, दिनांक ४.१.२००७ अन्वये त्यांना आवश्यक त्या कागदपत्रांकरिता रुपये २/- प्रति शुल्क भरण्याबाबत कळविले आहे. परंतु त्यांनी शुल्क न भरल्यामुळे प्रत देण्यात आलेली नाही. ४) मुद्या क्रमांक ४ : या मुद्यात त्यांनी नमूद केलेल्या बाबींचा बोध होत नाही. ५) मुद्या क्रमांक ५ : या मुद्यात नमूद केलेले आहे की मलजल वाहिनी ले आऊट मध्ये टाकलेली नसतांनाही त्यांच्याकडून मलजल कर जाणून बुजून वसुल करण्यात आलेला आहे, हे म्हणणे चुकीचे आहे. कारण म.न.पा. अधिनियम प्रमाणे नागपूर शहरांची हद्यीत येणाऱ्या सर्व मालमत्ता करावर मलजलकर आकारण्यात येते. ६) मुद्या क्रमांक ६ : या मुद्यात नमूद केल्याप्रमाणे कर आकारणी गुण सुत्राबाबत कर आकारणी पुस्तिकेमध्ये संपूर्ण माहिती देण्यात आलेली असून, ही पुस्तिका कोणत्या वर्षी प्रकाशित केलेली आहे याबाबत सुध्दा पुस्तिकामध्ये माहिती असून रुपये १५/- शुल्क भरुन कार्यालयातून प्राप्त करता येईल. ७) या मुद्यात नमूद केल्याप्रमाणे अति आवश्यक कागदपत्रांकरिता काय शुल्क आहे याबाबत कार्यालयीन पत्र क्रमांक ५९८/एडी, दिनांक २१.१.२००७ आणि पत्र क्रमांक ७६५/एडी, दिनांक २२.३.२००७ अन्वये त्यांना कळविलेले आहे करिता हा आक्षेप चुकीचा आहे. अर्जदारानी आपल्या अर्जात माहिती कशा प्रकारे (व्यक्तिशः/पोस्टाद्वारे) देण्यात यावी याबाबत उल्लेख केलेला नाही. त्यांना पत्र क्रमांक ५९८/एडी, दिनांक ४.१.२००७ आणि पत्र क्रमांक ७६५/एडी, दिनांक २२.३.२००७ अन्वये पाहिजे असलेल्या आवश्यक कागदपत्राकरिता रक्कम भरण्याबाबत कळविले असतांनाही आणि त्यांनी रकमेचा भरणा केलेला नसतांनाही त्यांना माहिती पोस्टाद्वारे पुरविण्यात आली. तेंव्हा अर्जदाराचे म्हणणे की, त्यांनी माहिती देण्याबाबत टाळाटाळ करण्यात आली हे त्यांचे म्हणणे संयुक्तिक वाटत नाही. यावरुन अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे ती वर नमुद केल्या

प्रमाणे प्रश्नार्थक माध्यमातून जनमाहिती अधिकारी यांचे अभिप्राय येतील अशा प्रकारची माहिती मागितली आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ खाली "माहिती" या संज्ञेची व्याख्या दिलेली आहे. माहिती याचा अर्थ सार्वजनिक प्राधिकरणामध्ये ज्या साहित्याचे स्वरुपात उदा.:- अभिलेख, दस्तऐवज, कागदपत्रे, परिपत्रके, टिप्पणी इत्यादी स्वरुपात उपलब्ध असलेल्या माहितीची छायांकित प्रती घेण्याचा माहितीचा अधिकार आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांना जी विश्लेषणात्मक माहिती मागितलेली आहे ती अधिनियमाचे तरतुदीशी सुसंगत नाही असे असले तरी जनमाहिती अधिकारी यांनी त्यांच्या तीनही अर्जाचे संदर्भामध्ये (जी माहिती त्यांच्या तीनही अर्जामध्ये एकाच विषयाबाबत असून पुनरावृत्ती सुध्दा झालेली असल्यामुळे) उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो व त्यामुळे माहिती ही उपलब्ध करुन देण्याची टाळाटाळ झाली आहे असा निष्कर्ष काढता येत नाही. राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या अपील मेमोमध्ये ७ मुद्दे अपीलकर्ता यांनी उपस्थित केलेले आहेत. मुद्या क्रमांक १ प्रमाणे माहितीस विलंब कां झाला यांची कारणे माहिती अधिकारी यांनी युक्तीवादात सांगितले. मुद्या क्रमांक २ च्या संदर्भामध्ये अपीलकर्ता त्याच वेळी समान आराजीचे, समान बांधकाम क्षेत्रफळाचे घर क्रमांक ३५०४/१०७, वार्ड क्रमांक २० अर्जदाराचे ले आऊट मधील घराला रुपये ४२६०/- कर आकारणी केलेली आहे. या दोन्ही बाबी विरोधाभास करणाऱ्या आहेत. याकरिता दोन्ही त्यांच्या पावत्याच्या छायाप्रती आपले जोडलेल्या आहेत. परंतु अशा प्रकारची तुलनात्मक माहिती ही अधिनियमाचे तरतुदी प्रमाणे सुसंगत नाही. तरी केसच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांनी खर्चाचा भरणा करावा असे पत्र त्यांना दिनांक ४.१.२००७ रोजी कळविण्यात आलेले दिसून येते. मुद्या क्रमांक ५ मलजल वाहिनी संदर्भामध्ये नियमावलीमध्ये जे नियम असतील त्याबद्यलची माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. तसेच मुद्या क्रमांक ६ प्रमाणे छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. विवरणपत्र व नियमावलीची किंमत घालून दिलेली नसली तरी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ४(१) प्रमाणे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६ प्रमाणे माहिती उपलब्ध करुन घेण्यास जो खर्च येणार असेल त्या खर्चाच्या भरणा हा अर्जदारास करणे बंधनकारक आहे व त्यामुळे मुद्या क्रमांक ७ मध्ये अपीलकर्ता यांचे म्हणणे हे योग्य नाही. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या मुद्दा क्रमांक ५ व ६ च्या संदर्भामध्ये नियमांच्या छायांकित प्रती ३, ५ व ६ च्या स्केच व नियमांची छायांकित प्रती हा निर्णय मिळाल्या पासून १० दिवसाचे आंत अपीलकर्ता यांना विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १९.७.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/४३३-४३९/१९.७.२००८

**राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १९३०/२००७.**

कु. विद्या एम. अवथरे,
प्लॉट नं. ९५,
बॅनर्जी -ले-आऊट,
पो. भगवाननगर,
नागपूर - ४४० ०२७. **..... अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहसंचालक, उच्च शिक्षण,
नागपूर विभाग, जुने मॉरीस कॉलेज ईमारत परिसर,
नागपूर.

जनमाहिती अधिकारी तथा
प्राचार्य,
एल.ए.डी. आणि श्रीमती आर.पी.महाविद्यालय,
शंकरनगर, नागपूर. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १९.७.२००८)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ती यांनी दिनांक ९.१.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपील मेमोमध्ये टिप म्हणून मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांना दिनांक ११.९.२००६ रोजी दिले. परंतु आता पर्यंत कार्यवाही झाली नाही असे नमुद केलेले असल्यामुळे दिनांक ११.९.२००६ रोजी मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचेकडे दिलेले परंतु राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ, नागपूर यांचे कार्यालयाकडे हस्तांतर केलेले दिनांक ११.९.२००६ च्या अपील क्रमांक ४४/२००७ चे दिनांक २०.४.२००७ रोजी निर्णय झाला आहे. दोन्ही प्रकरणातील माहितीचा अर्ज प्रपत्र-अ दिनांक ३.७.२००६ व दिनांक १५.७.२००६ तसेच प्रथम अपील अर्ज दिनांक २६.८.२००६ मधील माहिती एकच असल्याचे दिसून येत असल्यामुळे सदरचे अपील हे पुन्हा सुनावणीस घेणे हे विधीमत होणार नसल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

**नागपूर** **(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**दिनांक :- १९.७.२००८** **विदर्भ क्षेत्र, नागपूर.**
HIREKHAN/BHUJI/४४०/१९.७.२००८

**राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १९३०/२००७.**

श्री. पी. बी. जाधव,
५, दत्ता कॉलोनी, गोरक्षण रोड,
पो. गांधीनगर, अकोला - ४४४ ००४. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

जनमाहिती अधिकारी तथा
Chief Conservator of Forest,
नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १९.७.२००८)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १७.४.२००८ रोजी उपसचिव, राज्य माहिती आयोग यांना कळविलेले दिसून येते की, आम्ही पाठविलेले श्री.एस.व्ही.जोशी, मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचेकडील अपील आम्ही आमचे पत्र दिनांक ८.११.२००६ प्रमाणे (Chief Conservator of Forest, नागपूर यांचे संबंधी) परत घेतले आहे. तरी आपले कार्यालयात याबद्यल नोंद घेण्यात आल्याचे दिसून येत नाही. कदाचित सदरचे पत्र आपले मुंबई कार्यालयात गहाळ झाल्याचे दिसते. आमचे पत्राची दिनांक ८.११.२००६ चे एक झेरॉक्स नक्कल पाठवित आहे. वर संदर्भीय आपले पत्रासोबत पाठविलेले कागदपत्र ही या सोबत परत करण्यात येत आहे. पोच पावती पाठविण्याचे सौजन्य अपेक्षित. आपले आयुक्तालयाचे अपीलाचे निपटाऱ्यात एक ने वाढ झाली. असे त्यांनी कळविलेले असल्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे. अपीलकर्ता यांना निर्णयाची प्रत पाठवावी.

**नागपूर**

**दिनांक :- १९.७.२००८**
HIREKHAN/BHUJI/४४१/१९.७.२००८

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १९३३/२००७.**

श्री. गिरीश सेता,
शिवाजी चौक,
ता. दारव्हा, जि. यवतमाळ - ४४५ २०२. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपआयुक्त (महसूल),
आयुक्त कार्यालय, अमरावती.

जनमाहिती अधिकारी तथा
तहसीलदार,
दारव्हा, जि. यवतमाळ - ४४५ २०२. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १९.७.२००८)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता श्री. गिरीश सेता यांच्या दिनांक २७.६.२००८ च्या पत्रानुसार त्यांनी दाखल केलेले द्वितीय अपील दिनांक २५.५.२००७ मागे घेत आहे. करिता खारीज करण्यात यावे अशी विनंती केली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**नागपूर** **(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**दिनांक :- १९.७.२००८** **विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/४४२/१९.७.२००८

**राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १७९६/२००७.**

श्री. विकास गणपतराव शेंडे,
नागरी बँक कॉलनी,
राष्ट्रभाषा प्रचार समितीच्या मागे,
हिंदनगर, वर्धा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
पोलीस उपायुक्त,
परिमंडळ क्रमांक - १,
नागपूर शहर, नागपूर.

श्री. के. के. इठोळे,
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक पोलीस आयुक्त,
अजनी विभाग,
नागपूर शहर, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २१.७.२००८)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १८.५.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २१.७.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री.आर.आर.अवस्थी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ४.१०.२००६ रोजी सन १९९६ ते आजपर्यंत त्यांचे विरुध्द प्राणघातक हल्ला, अकायदेशीर काम, पोलीस तपासातील त्रुटी परिशिष्टात दिल्याप्रमाणे १६ मुद्ये उपस्थित करुन शासकीय माहिती अधिकारी तथा गृहमंत्रालय, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-३२ यांच्याकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. १) वरील विषयावर माहितीचा अधिकार, २००२ अंतर्गत माहिती पोलीस आयुक्त,

... २

नागपूर शहर, नागपूर कडून माहिती मागितली होती. माहिती अपूरी दिली तसेच अपीलाचा निर्णय अजून दिला नाही स्पष्ट कारण द्यावे. २) याबद्यल पोलीस महासंचालक, गृहमंत्रालय यांना निवेदन देवून कचऱ्यात गेले. कारण निवेदनाप्रमाणे कारवाई नाही. कारणे द्यावी. ३) दिनांक २५.५.१९९६ व दिनांक २९.५.१९९६ च्या प्राणघातक हल्ल्याची तक्रार कारणासहीत करुन त्याबद्यल केस कोर्टात दाखल करण्यासाठी दिनांक २८.२.१९९८ पर्यंत वेळ कां लागला. प्रकरण इतके क्लिष्ट होते काय ? ४) गुन्हे अन्वेषण शाखेने, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर व नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाकडून बयाण घेतले काय ? न घेतल्यास कारणे द्यावी. ५) वरील प्रकरणाबद्यल विद्यानगरी गृहनिर्माण सोसायटी, मानेवाडा, ४४, एम.आय.जी. गाळेधारक यांच्याशी असून त्याचे बयान घेतले काय ? सोसायटीला कोणता अधिकार आहे माझ्याबद्यल गृहनिर्माण मंडळात तक्रार करण्याचा जर सोसायटीने वरील कॉलनी हस्तांतरीत म्हाडाकडून केली असेल तर गृहनिर्माण मंडळाच्या फसवेगिरीला मदत करणे होय. नागपूर बिल्डींग बॉयलॉज व नागपूर बांधकाम कायद्याप्रमाणे अजूनपर्यंत आक्युपेशन सर्टिफिकेट व कम्प्लीटेशन सर्टीफिकेट म्हाडाने घेतलेले नाही. म्हणजे नियमाप्रमाणे वरील बांधकाम बेकायदेशीर होते व त्यास सोसायटी व म्हाडा दोघेही जबाबदार आहे. त्यामुळे म्हाडाने मला फसविले आहे. याबद्यल पोलीसांनी फौजदारी गुन्हा कां लावला नाही. वरील आर्थिक फसवेगिरी होते. इंडियन पीनल कोड प्रमाणे पोलीसांनी स्पष्टता द्यावी. ६) नागपूर सुधार प्रन्यासने वारंवार अनधिकृत बांधकाम काढण्यासाठी पोलीस फोर्स मागितला याबद्यल माहितीचा अधिकार २००२ अंतर्गत नागपूर सुधार प्रन्यासने कॉपीज दिल्या. याबद्यल पोलीसांनी फोर्स कां दिला नाही. जर नागपूर सुधार प्रन्यासची पत्रे खोटी असेल तर त्यांच्यावर गुन्हेगारी खटला चालवावा. ७) नागपूर म्हाडाने अनधिकृत बांधकाम बांधण्यास मदत केली तसेच संयुक्त कारवाईच्या नागपूर सुधार प्रन्यासच्या पत्रास दुजोरा दिला नाही. यावरुन दोनही कार्यालये एकमेकांवर दोष देऊन अकायदेशीर व्यवहार करीत आहे. ८) याबद्यल मी माझ्या तक्रारीमध्ये स्पष्ट उल्लेख करुन मला संरक्षण कां देण्यात आले नाही. पोलीसांनी बाब स्पष्ट करावी. ९) केस नं. ६८/९८ मध्ये पोलीसांनी केलेले सर्व आरोप न्यायालयाने नामंजूर करुन सर्व आरोपी सुटले याबद्यल राज्य सरकार अपीलमध्ये गेले काय ? न गेल्यास कारणे द्यावी. १०) अपीलमध्ये न गेल्यास (१) पोलीसांचा तपास बोगस होता. (२) सरकारी वकील तरबेज नव्हते हे सिध्द होते याबद्यल गृहमंत्रालयाने स्पष्टता द्यावी. ११) माझ्या घराची तोडफोड, माझ्या जीवावर तसेच पूर्ण कुटुंबास भयभीत वातावरण याबद्यल पोलीस तपास का केला

नाही. १२) जर न्यायधिशांवर चप्पल फेकणे यावर सजा होऊ शकते व माझ्या पूर्ण कुटुंबास वेठीस धरणाऱ्या लोकांना, म्हाडा, सुधार प्रन्यासला काहीच होऊ नये याबद्यल गृहसचिव यांनी तपास करुन अहवाल द्यावा. १३) ६८/९८ या प्रकरणात फसवेगिरी, हाऊस ट्रेसपासिंग, अटेम्प टू मर्डर, गैरकायदेशीर बाबीस प्रोत्साहन इत्यादी गुन्हे कलम कां लावण्यात आले नाही. स्पष्टीकरण द्यावे. १४) माझ्या स्वतःच्या घरात राहण्याचे अधिकार पोलीस देऊ शकले नाही. माझा मुलभूत हक्काचे संरक्षण पोलीस करु शकले नाही यावर गृहमंत्रालयाने अहवाल द्यावा. १५) १९९६ पासून आर्जपर्यंत होणारे आर्थिक, मानसिक नुकसान कोण देणार स्पष्टता मंत्रालयाने द्यावे. १६) मंत्रालयाने संबंधित विभागाकडून, नागपूर पोलीस आयुक्त, पोलीस महासंचालकाकडून अहवाल बोलावून त्याप्रमाणे वरील मुद्यांवर स्पष्ट अहवाल द्यावा. हा भारतीय नागरिक या नात्याने माझा हक्क असून नागरिकांचे हक्क संरक्षण करणे पोलीसांचे/शासनाचे काम आहे. माहिती देणे शासनास भारतीय राज्यघटनेप्रमाणे बंधनकारक आहे. गृहमंत्रालयाने याबद्यल कृपया मुद्येसुद माहिती द्यावी. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २१.११.२००६ रोजी सहाय्यक पोलीस आयुक्त तथा शासकीय माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना माहिती पुरविण्यासाठी अतिरिक्त शुल्क ८/- रुपये तसेच स्पीड पोष्टाचा खर्च वेगळा प्रदान करुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे कळविलेले दिसून येते व त्याप्रमाणे त्यांना दिनांक २९.११.२००६ रोजी माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली दिसून येते. सदरच्या उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ५.१२.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केल्याचे दिसून येते. सदरचे अपील दिनांक २४.१.२००७ रोजी प्राप्त झाले असल्यामुळे सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दिनांक १४.२.२००७ रोजी फेटाळण्यात आले असे दिसून येते. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. द्वितीय अपील करण्याचे कारणे खालील प्रमाणे १० मुद्ये दिलेले आहेत. १) अपीली निर्णय क्र. पो.उप.आ./परि-१/नाग/वाचक/०७-६४७ कार्यालय पोलीस उपायुक्त, परिमंडळ क्रमांक-१, नागपूर शहर दिनांक १४.२.२००७ मला दिनांक ९.४.२००७ ला देण्यात आले. यामुळे पोलीस स्टेशन, अजनी, नागपूर जावक क्रमांक ४४९/०७, दिनांक २६.२.२००७ उशिरा कां देण्यात आले याबद्यल चौकशीचे आदेश द्यावे. २) अपीलीय अधिकाऱ्यांनी अपीली निर्णय देतांना अपीलीत दिलेल्या परिशिष्टाप्रमाणे निर्णय न देता दस्तावेज यांचा विचार न करता दिलेला निर्णय व कायद्यानुसार पारदर्शकता तसेच अकौऊंटबिलीटीचा अभाव आहे. ३) स्वतःच्या घरात राहणे

... ४

त्या घरावर हमला करणारे कोण याचा तपास न करता पोलीस तपास म्हणजे पोलीस संरक्षण देऊच शकले नाही. याबद्यल पोलीस अधिकारी यांनी खुलासा केलेला नाही. ४) नागपूर सुधार प्रन्यासने पोलीसांची मदत मागून सुध्दा कां दिली नाही हा संशयाचा विषयाबद्यल अपीलीय निर्णयात उल्लेख नाही. ५) जर नागपूर सुधार प्रन्यासच्या कामात जर कोणी अडथळा आणला तर सरकारी कामात हस्तक्षेप होतो व हा फौजदारी गुन्हा होतो. याबद्यल सुध्दा अपीलीय अधिकारीने फौजदारी दंड संहिताप्रमाणे स्पष्टता दिली नाही. ६) वरील अपील गृहमंत्रालयात केले होते. त्यांनी नागपूर पोलीस कार्यालयातून माहिती मागवून त्यावर भारतीय दंड कायद्यानुसार पोलीसाकडून केलेला तपास योग्य होता काय ? यावर पारदर्शकता करावयास पाहिजे पण ती न करता अपीलीप्रमाणे निर्णय न घेणे माहिती अधिकार कायदा २००५ याची अवहेलना आहे. याबद्यल माहिती आयुक्त यांनी कृपया स्पष्टता व आदेश द्यावा. ७) कायद्याप्रमाणे सर्व नागरिकांना समान हक्क असतो तर शासनाकडून खैरलांजी प्रकरण सी.बी.आय.कडे वळविण्यात आले तर वरील प्रकरण सी.बी.आय.कडे वर्गीकृत करण्यात शासनाची अस्पष्टता मंत्रालयाने खुलासा द्यावा याबद्यल आदेश द्यावे. ८) जर न्यायाधिशावर चप्पल फेकून मारली तर सजा होते. कारण न्यायाधिश स्वतः साक्षीदार/वादी असतो. परंतु माझ्या घरावर प्राणघातक हमलाचे प्रकरणावर आरोपी सुटतात कारण पोलीस तपास त्रुटीपूर्ण होता याबद्यल आदेश द्यावे. ९) पोलीस, पोलीस अन्वेषण शाखा, पोलीस आयुक्त कशा रितीने तपास व गुन्हा न्यायालनीन करतात जेणेकरुन तपास त्रुटीप्रमाणे व घटलेल्या गुन्हयाप्रमाणे नसतो याबद्यल आदेश द्यावे. १०) वरील प्रकरणावर माझे शारीरीक, मानसिक व आर्थिक नुकसान द्यावे.

३. सदरच्या द्वितीय अपीलाचे अनुषंगाने प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त यांनी दिनांक १८.६.२००८ रोजी खालील प्रमाणे खुलासा दाखल केलेला आहे. सादर की, विषयात नमूद द्वितीय अपीलमध्ये दिनांक १९.६.२००८ रोजी होणाऱ्या सुनावणीची नोटीस या कार्यालयास दिनांक ७.६.२००८ रोजी प्राप्त झाली. उपरोक्त अपीलच्या संदर्भात तथ्य, माहिती व खुलासा खालील प्रमाणे आहे. अपीलकर्ता श्री.विकास गणपतराव शेंडे यांनी दिनांक ४.१०.२००६ रोजीच्या अर्जाद्वारे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत शासकीय माहिती अधिकारी, गृह मंत्रालय, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांचेकडे माहिती मागितलेली होती. तो अर्ज प्राप्त झाल्याने शासकीय जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,

अजनी विभाग, नागपूर शहर यांनी अपीलकर्त्यास दिनांक २९.११.२००६ रोजी अर्जदाराने मागितलेली माहिती पुरविली होती. त्या पुरविलेल्या माहितीवर अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्याने त्यांनी दिनांक ५.१२.२००६ रोजी अपीलीय अधिकारी, गृह मंत्रालय, महाराष्ट्र राज्य यांचेकडे प्रथम अपील केले, ते प्रथम अपील संबंधित प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उपायुक्त, परिमंडळ क्र. १, नागपूर शहर यांचे कार्यालयात दिनांक २४.१.२००७ रोजी प्राप्त झाले. उपरोक्त अपील अर्जावर शासकीय जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस उपायुक्त, अजनी विभाग, नागपूर शहर यांचेकडून अर्जदारास पुरविण्यात आलेल्या माहितीच्या छायांकित प्रती त्यांचे अभिप्रायासह मागविण्यात आल्यात. तसेच अपीलकर्ता श्री.विकास शेंडे यांना पत्राद्वारे सुचित करुन दिनांक १३.२.२००७ रोजी या कार्यालयात समक्ष बोलावून त्यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तेंव्हा अपीलकर्ता याने सांगितले की, त्यांनी मागितलेली माहिती माहिती अधिकाऱ्यांकडून मिळालेली आहे. परंतु ती अपूर्ण असून चुकीची आहे. अपीलकर्त्यांने मागितलेली माहिती ज्या प्रकरणांशी संबंधित आहे त्या माहिती संबंधातील सन १९९६ पासून कार्यालयात उपलब्ध असलेले अभिलेख व नस्तीचे अवलोकन करण्यात आले. एकंदरीत माहिती संबंधित प्रकरणांची संक्षिप्त माहिती येणेप्रमाणे की, अपीलकर्ता श्री.विकास शेंडे हे पोलीस स्टेशन, अजनी हद्दीतील विनकर कॉलनी हाऊसिंग सोसायटी, नागपूर येथे ७/०४ क्रमांकच्या इमारतीमध्ये गाळयात सन १९८१ पासून राहात होते. त्यावेळेस त्यांनी महाराष्ट्र गृह निर्माण मंडळ (म्हाडा) व नागपूर सुधार प्रन्यास (एन.आय.टी.) यांचेकडे उपरोक्त कॉलनीत राहणाऱ्या गाळे धारकांनी अवैध बांधकाम केल्याबाबत तक्रार केली होती व त्या तक्रारीचे अनुषंगाने एन.आय.टी. व म्हाडा तर्फे दिनांक २५.५.१९९६ रोजी संयुक्तपणे अतिक्रमण विरोधी कारवाई होऊन काही गाळे धारकांचे अवैध असलेले बांधकाम काढण्याची कारवाई करण्यात आली. त्यामुळे त्या कॉलनीतील निवासी गाळेधारक यांच्या मनात अपीलकर्ता श्री.विकास शेंडे यांचे विरुध्द नाराजी निर्माण होऊन तेथील लोकांनी चिडून श्री.विकास शेंडे यांचे घरात घुसण्याचा प्रत्यत्न केला व खिडकीच्या काचा फोडून नुकसान केले. यासंबंधात श्री.विकास शेंडे यांनी पोलीस स्टेशन, अजनी येथे दिलेल्या तक्रारीवर दिनांक ११.७.१९९६ रोजी अज्ञात आरोपीतां विरुध्द अप.क्र.२९७/९६ कलम ३३६, ४२७ भा.द.वि. प्रमाणे गुन्हा दाखल करुन तपास करण्यात आला. परंतु तपासादरम्यान फिर्यादी श्री.विकास शेंडे यांनी कोणावरही संशय व्यक्त न केल्याने तसेच तपासात योग्य पुरावा मिळून न आल्याने दिनांक ८.११.१९९६ रोजी अ फायनल पाठविण्यात आले होते. तथापी अर्जदाराने यासंबंधात अर्ज केल्याने उपरोक्त गुन्हयाचा पुन्हा

बारकाईने तपास करुन या गुन्हयात एकूण ४ आरोपींना दिनांक १४.२.१९९८ रोजी २०:५० वाजता अटक करण्यात आली व त्यांचे विरुध्द मा.संबंधित न्यायालयात दिनांक २७.२.१९९८ रोजी दोषारोपपत्र सादर करण्यात आले. त्या खटल्याचा क्रि.केस क्रमांक ६८/९८, दिनांक २७.२.१९९८ असा होता. या खटल्याची कोर्टात रितसर सुनावणी होवून सर्व आरोपींना दिनांक २०.१०.२००५ रोजी मा.संबंधित न्यायालयाने निर्दोष बरी केले. या प्रकरणासंबंधात अपीलकर्त्याने माहिती अर्जा सोबत जोडलेल्या परिशिष्टात नमूद १६ मुद्यांवर माहिती मागितलेली होती. अपीलकर्त्याने माहिती अधिकाऱ्याकडे मागितलेली संपूर्ण माहिती अपीलकर्त्यास दिनांक २९.११.२००६ रोजी पुरविण्यात आली होती. एकंदरीत अर्जदाराने केलेली मागणी व त्यास पुरविण्यात आलेली माहिती व इतर बाबी व तथ्यांचा विचार करता अपीलकर्त्यांने केलेल्या अपील अर्जात तथ्य आढळून न आल्याने दिनांक १४.२.२००७ रोजीचे निर्णयाद्वारे अर्जदाराचे अपील फेटाळण्यात आले. त्या अपील निर्णयाची प्रत अपीलकर्त्यास दिनांक ११.४.२००७ रोजी प्राप्त झालेली आहे. उपरोक्त अपील निर्णयावर असमाधानी होऊन अपीलकर्त्यांने दिनांक १५.५.२००७ रोजी मा.माहिती आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांचेकडे द्वितीय अपील केलेले आहे. या अपीलाचे अनुषंगाने याठिकाणी हे नमूद करणे योग्य वाटते की, अपीलकर्त्याने याच घटनेसंबंधात दिनांक १९.६.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत माहिती मागितलेली होती, ती त्यास दिनांक ८.८.२००७ अन्वये माहिती अधिकाऱ्याकडून पोस्टाद्वारे (अंडर पोस्टींग सर्टिफिकेटने) एकूण १५ पाने पाठविण्यात आलेली आहे. या प्राप्त माहितीवर सुध्दा अपीलकर्त्याने दिनांक १९.८.२००७ रोजीचे अर्जाद्वारे प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उपायुक्त, परिमंडळ क्रमांक-१, नागपूर शहर यांचेकडे अपील केलेले होते. ते अपील अर्ज या कार्यालयाचे दिनांक ४.९.२००७ रोजीचे निर्णयाद्वारे निकाली काढण्यात आले, त्याची प्रत अर्जदारास दिनांक १४.९.२००७ रोजी प्राप्त झालेली आहे. याठिकाणी हे ही नमुद करावयासे वाटते की, अपीलकर्ता श्री.विकास शेंडे हे सन १९९६ पासून एकाच घटनेबाबत मा.पोलीस महासंचालक, म.रा.मुंबई, गृह मंत्रालय, महाराष्ट्र शासन, पोलीस आयुक्त, नागपूर, राष्ट्रीय मानवाधिकार आयोग, नवी दिल्ली, विशेष पोलीस महानिरीक्षक, ना.ह.स. मुंबई, मा.आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर राज्य ग्राहक मंच या विभिन्न आयोग व वरिष्ठ अधिकारी तथा शासनास वेळोवेळी अनेक तक्रार अर्ज दिलेले होते. जनता दरबार, लोकशाही दिन या दिवशी सुध्दा हजर राहून तक्रार दिलेली होती. यासर्व तक्रारींची विभिन्न स्तरावर वेळोवेळी निष्पक्षपणे व सविस्तर चौकशी झालेली असून चौकशीच्या निष्कर्षाबाबत अर्जाचे संबंधाने

...७

अर्जदार/अपिलकर्ते श्री.विकास शेंडे यांना वेळोवेळी लेखी पत्राद्वारे सुचित करण्यात आलेले आहे. परंतु त्यांचे समाधान न होता ते सोसायटी व कॉलनीत राहणाऱ्या लोकांना तसेच म्हाडा व एन.आय.टी.च्या पदाधिकाऱ्यांना आरोपी बनवून त्यांचेवर कारवाई करावी अशी अवास्तव मागणी करीत आहेत. अर्जदाराच्या तक्रारीवर हस्तक्षेपीय गुन्हा दाखल होऊन संबंधितां विरुध्द कोर्टात दोषारोपपत्र दाखल करण्यात आलेले होते. तसेच काही तक्रारीवर प्रकरणपरत्वे अहस्तक्षेपीय गुन्हे नोंदविण्यात आलेले असून संबंधितांवर प्रतिबंधक कारवाई सुध्दा करण्यात आलेली होती. परंतु अर्जदाराचे/अपीलकर्त्यांचे समाधान झालेले नाही. सन १९९६ पासून अद्यापपर्यंत अपीलकर्त्याने एकूण ३६ वेळा विभिन्न आयोग, शासन व वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांकडे तक्रारी केलेल्या आहेत, त्या तक्रारींची यादी सोबत जोडलेली आहे. एकंदरीत अपीलकर्त्यांचा अपील अर्ज तथ्यहिन व असंयुक्तिक मागणीबाबत असल्याने तो फेटाळण्यास विनंती आहे. तसेच माहिती अधिकारी यांना सुध्दा खालील प्रमाणे तोच खुलासा दाखल केलेला आहे. सादर आहे की, विषयात नमुद द्वितीय अपील मध्ये दिनांक १९.६.२००८ रोजी होणाऱ्या सुनावणीची नोटीस या कार्यालयात दिनांक ७.६.२००८ रोजी प्राप्त झाली. उपरोक्त अपीलाच्या संदर्भात तथ्य, माहिती व खुलासा खालील प्रमाणे सादर आहे. अपीलकर्ता श्री.विकास गणपतराव शेंडे, रा. वर्धा यांनी शासकीय माहिती अधिकारी, द्वारा गृहमंत्रालय, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-३२ यांचे नावानिशी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये माहिती मिळणेबाबत दिनांक ४.१०.२००६ रोजी दिलेला अर्ज सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन) पोलीस आयुक्तालय, नागपूर शहर यांचेकडून या कार्यालयास दिनांक १.११.२००६ रोजी प्राप्त झालेला होता. अर्जदार यांनी मागितलेली माहिती पोलीस स्टेशन अजनीशी संबंधित असल्याने वरिष्ठ पोलीस निरिक्षक, अजनी यांना त्वरित माहिती पाठविणेबाबत जा.क्र. १४६४/०६, दिनांक १.११.२००६ अन्वये पत्र देण्यात आले. वरिष्ठ पोलीस निरिक्षक, अजनी यांनी दिनांक १०.११.२००६ रोजी सदरहु अर्जा संबंधाने अहवाल सादर केला. परंतु सदरची माहिती अपूर्ण व त्रोटक स्वरुपाची असल्याने माहिती मुद्येसुद व कागदपत्रांसह त्वरित पाठविणेबाबत या कार्यालयाचे जा.क्र. १७१५/०६, दिनांक १०.११.२००६ रोजी वरिष्ठ पोलीस निरिक्षक, अजनी यांना पत्र देण्यांत आले. वरिष्ठ पोलीस निरिक्षक, अजनी यांनी दिनांक २०.११.२००६ रोजी अर्जदार यांनी मागितलेली मुद्येनिहाय माहिती कागदपत्रासह सादर केली. यावरुन अर्जदार श्री.विकास गणपतराव शेंडे, रा. वर्धा यांना त्यांनी मागितलेली माहिती तयार असून ती घेऊन जाणेबाबत पोष्टाद्वारे या कार्यालयाचे जा.क्र. १५४८/०६, दिनांक २१.११.२००६ रोजी अर्जदाराचे पत्त्यावर

... ८

पत्र पाठविण्यात आले. दिनांक २९.११.२००६ रोजी अर्जदार हे कार्यालयात समक्ष हजर आल्याने त्यांना माहिती देण्यात आली. एकंदरीत अर्जदार यांनी दिलेल्या अर्जासंबंधाने माहिती अशी की, अर्जदार श्री. विकास गणपतराव शेंडे हे सन १९९६ मध्ये पो.स्टे.अजनी हद्दीतील मानेवाडा रोड विनकर कॉलनी, एम.आय.जी. क्वार्टस येथे राहत होते. तेथे राहत असतांना त्यांनी विनकर कॉलनी येथील गाळे धारकांनी अवैध बांधकाम केल्याबाबत महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळ (म्हाडा) तसेच नागपूर सुधार प्रन्यास (एन.आय.टी.) यांचेकडे तक्रारी केल्या होत्या. त्या तक्रारीचे अनुषंगाने एन.आय.टी. व म्हाडा तर्फे दिनांक २५.५.१९९६ रोजी संयुक्तपणे अतिक्रमण विरोधी कारवाई होऊन काही गाळे धारकांचे अवैध असलेले बांधकाम काढण्याची कारवाई करण्यात आली. त्यामुळे त्या कॉलनीतील निवासी गाळेधारक यांच्या मनात अपीलकर्ता श्री.विकास शेंडे यांचे विरुध्द नाराजी निर्माण होऊन तेथील लोकांनी चिडून श्री.विकास शेंडे यांच्या घरात घुसण्याचा प्रयत्न केला व खिडकीच्या काचा फोडून नुकसान केले. यासंबंधात श्री.विकास शेंडे यांनी पोलीस स्टेशन, अजनी येथे दिलेल्या तक्रारीवर दिनांक ११.७.१९९६ रोजी अज्ञात आरोपीतां विरुध्द अप.क्र. २९७/०६ कलम ३३६, ४२७ भा.द.वि.प्रमाणे गुन्हा दाखल करुन तपास करण्यात आला. परंतु तपासा दरम्यान फिर्यादी श्री.विकास शेंडे यांनी कोणावरही संशय व्यक्त न केल्याने तसेच तपासात योग्य पुरावा मिळून न आल्याने दिनांक ८.११.१९९६ रोजी अ फायनल पाठविण्यात आले होते. तथापी अर्जदाराने यासंबंधात अर्ज केल्याने उपरोक्त गुन्हयाचा पुन्हा बारकाईने तपास करुन या गुन्हयात एकूण ४ आरोपीना दिनांक १४.२.१९९८ रोजी २०:५० वाजता अटक करण्यात आली व त्यांचे विरुध्द मा.संबंधित न्यायालयात दिनांक २७.२.१९९८ रोजी दोषारोपपत्र सादर करण्यात आले. त्या खटल्याचा क्रि.केस क्रमांक ६८/९८, दिनांक २७.२.१९९८ असा होता. या खटल्याची कोर्टात रितसर सुनावणी होऊन सर्व आरोपींना दिनांक २०.१०.२००५ रोजी मा.संबंधित न्यायालयाने निर्दोष बरी केले. सदर प्रकरणासंबंधात अपीलकर्त्यांने माहिती अर्जा सोबत जोडलेल्या परिशिष्टात नमुद १६ मुद्यांवर माहिती मागितलेली होती. सदरची संपूर्ण माहिती दिनांक २९.११.२००६ रोजी कागदपत्रासह प्रत्यक्ष या कार्यालयात हजर आल्याने पुरविण्यात आलेली आहे. एकंदरीत अपीलकर्ता अर्जदार श्री.विकास शेंडे हे सन १९९६ पासून उपरोक्त एकाच घटनेबाबत विभिन्न आयोग व वरिष्ठ अधिकारी तथा शासनास वेळोवेळी अनेक तक्रार अर्ज दिलेले होते. त्यासर्व तक्रारीची विभिन्न स्तरावर वेळोवेळी निष्पक्षपणे व सविस्तर चौकशी झालेली असून चौकशीच्या निष्कर्षाबाबत अर्जाचे संबंधाने अर्जदार/अपीलकर्ता श्री.विकास शेंडे यांना वेळोवेळी लेखी

... ९

पत्राद्वारे सुचित करण्यात आलेले आहे. परंतु त्यांचे समाधान न होता ते सोसायटी व कॉलनीत राहणाऱ्या लोकांना तसेच म्हाडा व एन.आय.टी.च्या पदाधिकाऱ्यांना आरोपी बनवून कारवाई करावी अशी अवास्तव मागणी करीत आहेत. अर्जदाराच्या तक्रारीवर हस्तक्षेपीय गुन्हा दाखल होऊन संबंधितांवर कोर्टात दोषारोपपत्र दाखल करण्यात आलेले होते. तसेच संबंधितांवर प्रतिबंधक कारवाई सुध्दा करण्यात आलेली होती. तरी सुध्दा अपीलकर्ता/अर्जदार यांचे समाधान झालेले नाही. एकंदरीत अपीलकर्त्यांचा अपील अर्ज तत्थहीन व असंयुक्तिक मागणीबाबत असल्याने तो फेटाळण्यास विनंती आहे. त्यावर पुन्हा अपीलकर्ता दिनांक २१.७.२००८ रोजी खुलासा दाखल केलेला दिसून येतो. मी अपीलकर्ता विकास शेंडे वरील अपीलामध्ये दाखल केलेल्या उत्तराबाबत खुलासा देत आहो. १) वरील उत्तरात पोलीस अधिकारी यांनी कबूल केले की, दस्तावेज पान नं. ७ वर श्री.शेंडे यांनी केलेल्या तक्रारीमुळे नागपूर सुधार प्रन्यास व म्हाडा नागपूर घराचे बांधकाम पाडले असा विणकर कॉलनीतील लोकांचा समज झाल्याने तेथील लोकांनी प्राणघातक हमला केला. २) दस्तावेज २७ मध्ये आरोपपत्र दिनांक २९.५.१९९६ च्या तक्रारीवरच केले. आरोपपत्राच्या त्रुटीमुळे आरोपी न्यायालयाने सोडले यात पोलीसांचा तपास व अधिकारी दोषी आहे. ३) पोलीसांनी माझ्या तक्रारीचे निवेदनाची गाथा दिली परंतु इंडियन पीनल कोड प्रमाणे कलम लावले नाही. अशा प्रकारे घडलेल्या गुन्हयात (१) मा. नारायण राणे, महसूल मंत्री यांच्या घरावरील हल्ला. (२) श्री.कुमार केतकर यांच्या घरावरील हल्ला. भारतीय दंड विधानानुसार सारख्याच गुन्हयावर तपास व लावलेल्या कलमा यामध्ये फरक कसा ? याचा सुध्दा मा.आयुक्तांनी विचार करावा. वास्तविक पोलीस यंत्रणेला गुन्हयाचे स्वरुप पूर्णतः माहिती असून शासकीय गैरव्यवहार उघडकीस न आणण्याचा व त्यांना संरक्षण देण्याचा अकायदेशीर प्रयत्न आहे. माहितीचा अधिकार २००५ च्या कलम ४ नुसार पोलीस कार्यालयाची व मंत्रालयाची कारवाई नाही. महाराष्ट्र शासन यांच्या परिपत्रकाप्रमाणे पारदर्शकता नाही. पोलीसाकडून मुलभूत अधिकाराचे संरक्षण नाही. भारतीय दंड विधानानुसार गुन्हेगारावर गुन्हयाप्रमाणे तक्रारीप्रमाणे कलम लावले नाही. त्यामुळे १९९६ पासून आजपर्यंत होणारे माझे/माझ्या कुटुंबाचे नुकसान/मानसिक/शारीरीक त्रास याबद्दल माझे कधीच पूर्ण न होणारे नुकसानीस पोलीसांचा अकर्तव्यदक्ष कारभार/तसेच मंत्रालयाचा/पोलीस महासंचालकाचा सूचना व निर्देश न देणे कारणीभूत आहे. त्यामुळे कलम ४ नुसार मंत्रालयाने सुध्दा माहितीच्या अधिकार कायद्याची अवहेलना केली आहे हे निर्विवाद सत्य आहे. माहितीचा अधिकार २००५ च्या कलम १८ ब नुसार नुकसान भरपाई देण्याचा

अधिकार असून त्यानुसार माझे ५० लाख रुपयांचे नुकसान/मुलभूत अधिकार तसेच मला व माझ्या कुटुंबास संरक्षण द्यावे व गुन्हयाप्रमाणे गुन्हेगारावर गुन्हा दाखल करण्याचा तसेच निवेदनात मागितलेली माहिती कलम ४ नुसार देण्याचे आदेश द्यावे. प्रार्थना कायद्यानुसार आदेश देण्याबद्यल अग्रेषित.

४. अपीलकर्ता यांच्या माहितीच्या अर्जातील उपस्थित केलेल्या १६ मुद्यांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपीलकर्ता यांनी विचारलेल्या माहितीचे संदर्भामध्ये १९९६ पासून ते आज पावेतो प्रत्येक घटनेच्या संदर्भामध्ये कारण विचारलेले आहेत. तसेच गुन्हेगारी खटला चालवावा अशी राज्य माहिती आयोगाने आदेश द्यावे अशी विनंती केलेली आहे. उत्तरवादी यांनी दाखल केलेल्या खुलाश्यामध्ये १९९६ पासूनचा घटनाक्रम व अपीलकर्ता यांना वेळोवेळी मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये तारखेनिहाय खुलासा केलेला आहे. त्याचप्रमाणे अपीलकर्ता यांना आतापर्यंत त्या एकाच घटनेच्या संदर्भामध्ये किती व कोणाकडे अर्ज केले होते याबद्यलचा अहवाल सुध्दा सादर केलेला आहे. त्याबद्यलची माहिती सुध्दा त्यांना दिनांक १४.२.२००७ रोजी उपलब्ध करुन दिलेली आहे. राज्य माहिती आयोगाकडेही अपीलकर्ता यांनी दाखल केलेल्या खुलाश्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपीलकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीचे विडंबन केलेले आहे. त्यांना त्या तरतुदीची कोणतीही माहिती करुन घेण्याची आवश्यकता दिसत नाही. आज पर्यंत अपीलकर्ता यांनी निरनिराळया प्राधिकरणाकडे माहिती मागितली होती त्या सर्वांची अपीले राज्य माहिती आयोगाकडे दाखल झाली ती व त्यांच्या निर्णय झालेले आहेत यावरुन एकाच प्रकरणाच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता हे अनेक प्राधिकरणास वेठीस धरत आहे असे दिसून येते. प्रत्येक अर्जामध्ये, प्रत्येक अपीलामध्ये, प्रत्येक खुलाश्यामध्ये ते विश्लेषण करुन माहिती मागत असतात. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २ (च) प्रमाणे "माहिती" या संज्ञेची व्याख्या केलेली आहे. माहिती याचा अर्थ सार्वजनिक प्राधिकरणामध्ये ज्या साहित्याचे स्वरुपात उदा.:- अभिलेख, दस्तऐवज, कागदपत्रे, टिप्पणी, परिपत्रके इत्यादी स्वरुपात उपलब्ध असलेल्या माहितीची छायांकित प्रती घेणे असा माहितीचा अधिकार आहे. ही बाब अपीलकर्ता यांना राज्य माहिती आयोगाने सुध्दा वारंवार समजवून सांगितली आहे. तरीसुध्दा त्यांचे निरर्थक अर्ज करण्याची सवय जात नाही. अशा रितीने अनेक प्राधिकरणे व राज्य माहिती आयोगाचा वेळ वाया घालवित असतात. त्यांनी आता पर्यंत केलेल्या तक्रारीच्या संदर्भामध्ये ज्या ज्या प्राधिकरणाने त्यांना न्याय

... ११

दिला नाही अशी त्यांची समजूत आहे त्या त्या प्राधिकरणा विरुध्द त्यांनी मा.न्यायालयामध्ये तक्रार दाखल करणे हा सर्वांत चांगला न्याय मिळवून घेण्याचा मार्ग आहे. एकूणच दाखल झालेला खुलासा व उपलब्ध झालेली माहितीं याचे अवलोकन केले असता अपीलकर्ता यांनी वर नमुद केल्याप्रमाणे वेळोवेळी संपूर्ण माहिती तसेच वेळोवेळी त्यांचे संपूर्ण अर्जाची उत्तरे त्यांना दिलेली दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांच्या द्वितीय अपीलातील कोणतीही विनंती ही मान्य करता येत नसल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ४.१०.२००६ च्या अर्जाप्रमाणे दिनांक ५.१२.२००६ च्या प्रथम अपीलाप्रमाणे दिनांक १४.२.२००७ अपीलाच्या निर्णयाप्रमाणे व त्यांच्या अनेक प्राधिकरणाकडे अनेक अर्जाप्रमाणे वेळोवेळी माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे त्यांच्या द्वितीय अपीलातील मेमोसोबत केलेली विनंती मान्य करता येत नसल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- २१.७.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १६५१/२००७.

श्री. दामोधर किसन राऊत,
रा. पातुर (पितांबरवाडी),
ता. पातुर, जि. अकोला. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अप्पर जिल्हाधिकारी,
अकोला.

श्री. डी. के. इंगळे,
जनमाहिती अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,
ता. बाळापूर, जि. अकोला. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २१.७.२००८)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १८.४.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २१.७.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३.११.२००६ रोजी पत्र क्र. प्रस्तू.०२/का.वि./३४५/२००६ उपविभागीय अधिकारी, बाळापूर हयांचे कार्यालय, बाळापूर दिनांक २२.२.२००६ नुसार त्वरित माहिती मिळणेबाबत. वरील विषयांकित पत्रामधील आदेशानुसार रा.मा.क्र. ३६, बा.पातूर/२७/८७-८८ च्या प्रकरणामधील आदेशाची प्रमाणित नक्कल प्राप्त होताच आपणास देण्यात येईल अशी माहिती अशी माहिती मिळाली होती. आज जेमतेम ८ महिन्याचा कालावधी होऊनही मला नक्कल मिळाली नाही. तरी नियमानुसार विलंब होत असून त्वरित नक्कल मिळावी ही विनंती. सदरची माहिती व्यक्तिशः किंवा टपालाद्वारे घेणार असे शासकीय माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, महसूल विभाग, बाळापूर यांना मागितलेली दिसून येते. माहितीच्या

... २

अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ९.११.२००६ रोजी उपविभागीय अधिकारी तथा माहिती अधिकारी, बाळापूर यांनी प्रस्तृतकार-१ यांना सदर अर्जावर नियमाप्रमाणे कार्यवाही करुन अर्जदारास यथोचित उत्तर देण्यांत यावे व दिलेल्या पत्राची प्रत संबंधित नस्ती लावण्यास प्रस्तृतकार-२ यांचेकडे देण्यात यावी तसेच पत्राची प्रतिलिपी अपीलकर्ता यांना दिलेली दिसून येते. त्याप्रमाणे दिनांक ८.१२.२००६ रोजी उपविभागीय अधिकारी, बाळापूर यांनी "आपले अर्जाची पहाणी केले असता आपण आदेश पारीत केल्याचा दिनांक व आदेश पारीत करणारे अधिकारी यांचे नाव दिलेले नाही. या कार्यालयाचे सन १९८७-८८ चे वर्गवारीची पहाणी केली असता सदर प्रकरण हे या वर्गवारीमध्ये पंजीबध्द झालेले नाही. करिता आपणास विषयांकित माहिती पुरविता येणार नाही करिता आपला अर्ज नस्ती करण्यात येत आहे." असे कळविलेले दिसते. सदरच्या उत्तराने अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक १९.१.२००७ रोजी अप्पर जिल्हाधिकारी, अकोला यांच्याकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २२.२.२००६ रोजी देण्यात आला असून "रा.मा.क्र. एन.ए.पी. ३६/बा.पातूर/२७/८७-८८ च्या प्रकरणाचा शोध घेणे सुरु आहे. सदर माहिती तुर्त देणे शक्य होणार नाही. माहिती प्राप्त होताच आपणास कळविण्यात येईल." असे अपीलकर्ता यांना कळविलेले दिसून येते व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. सदरच्या अपीलाचे संदर्भामध्ये अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती उपलब्ध होण्याच्या दृष्टिने माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध कां होत नाही असे विचारले असता नस्तीचा शोध घेता नस्ती पंजीबध्द झाली नसल्यामुळे त्यांना माहिती उपलब्ध करुन देता आली नाही असे सांगितले. सदरच्या नस्तीचा शोध घेण्याकरिता उपविभागीय अधिकारी, बाळापूर यांनी दिनांक ३०.४.२००७ रोजी सुध्दा तहसीलदार, पातूर यांना पत्र दिलेले दिसून येते. तहसीलदार, पातूर यांनी दिनांक ९.६.२००८ रोजी सदर प्रकरण अभिलेखागारामध्ये उपलब्ध नाही. सन १९८७-८८ चे वर्गवारी रजिष्टरमध्ये प्रकरणाची नोंद आहे. तसेच नोंदी समोर एस.डी.ओ., बाळापूर असे लिहिलेले आहे असे कळविल्याचे दिसून येते. दिनांक १७.६.२००८ रोजी सुध्दा तहसीलदार, पातूर यांनी उपविभागीय अधिकारी, बाळापूर यांना मौजे पातूर येथील एनएपी ३६/बा.पातूर/२/८७-८८ सदर प्रकरणातील आदेशाची नक्कल मिळणेबाबत श्री.दामोदर किसन राऊत यांनी अर्ज दिला असता हया प्रकरणात

मा.अप्पर जिल्हाधिकारी, अकोला यांनी सदर माहिती अर्जदारास प्रकरणाची पडताळणी करुन १५ दिवसात पुरविणेबाबत निर्देश दिले आहेत. परंतु सदर पत्राचे अनुषंगाने सदर प्रकरणाचा शोध घेतला असता सदर प्रकरण हया कार्यालयात उपलब्ध नसल्याबाबत अभिलेखागार लिपिक यांनी सदर प्रकरण अभिलेखागारात जमा नसल्याचे कळविले आहे. तसेच प्रस्तुतकार नंबर १ यांचे प्रभारामध्ये सदर प्रकरण दिलेले नाही. त्यामुळे अर्जदारास माहितीच्या अधिकाराखाली तत्कालीन तहसीलदार यांनी माहिती दिल्याचे निदर्शनास आले नाही. तसेच अर्जदाराचा माहितीचे अधिकाराखाली अर्जदाराचा मुळ अर्ज सुध्दा कार्यालयात उपलब्ध नसल्याचे शोध घेतला असता आढळला नाही. त्यामुळे हया कार्यालयात माहितीचे अधिकाराखालील अर्ज व सदर प्रकरण उपलब्ध नाही करिता माहितीकरिता सविनय सादर केलेले दिसून येते व त्यामुळे दिनांक १८.६.२००८ रोजी उपविभागीय अधिकारी, बाळापूर, तहसीलदार, बाळापूर, तलाठी व तालुका निरिक्षक अभिलेख यांचे स्तरावर ३० दिवसांत शोध घेऊन त्याप्रमाणे अहवाल सादर करावा असे आयोगाने आदेश दिलेले आहेत. त्याप्रमाणे उपविभागीय अधिकारी यांनी दिनांक २०.६.२००८ रोजी तलाठी, बागायत पातूर, अधिक्षक भूमी अभिलेख, अकोला, तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, पातूर, अभिलेखागार, जिल्हा अभिलेख, जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला, तहसीलदार, पातूर यांना सदरच्या प्रकरणाचा शोध घेण्याकरिता पत्र दिलेले दिसून येते. वरील सर्व नमुद केलेल्या अधिकाऱ्यांनी सदरच्या प्रकरणी त्यांच्या त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नाही असे कळविलेले आहे. वास्तविक सदरचे अकृषकाचे प्रकरण हे कायम स्वरुपी अभिलेख आहे ते नष्ट करता येत नाही. परंतु सदरच्या नस्तीची उपलब्ध नोंद मिळून येत नाही असे त्यावरुन दिसून येते. अपीलकर्ता यांनी महाराष्ट्र माहितीचा अधिकार, २००२ प्रमाणे सुध्दा दिनांक ६.८.२००४ रोजी तीच माहिती मागण्याकरिता अर्ज केलेला दिसून येतो व त्यावेळेला सुध्दा नक्कल नविस यांनी अपीलकर्ता यांना आपण नक्कल मागितलेले प्रकरण हया कार्यालयात उपलब्ध नसल्यामुळे आपणास नक्कल पुरविता येत नाही. करिता उपविभागीय अधिकारी, बाळापूर यांचे कार्यालयात संपर्क साधावा असे कळविलेले दिसून येते व यावरुनच अपीलकर्ता यांचे सदरच्या प्रकरणी हे त्याना पूर्वी शोध घेतला असल्यावर सुध्दा उपलब्ध झाले नाही व आज सुध्दा सर्व कार्यालयामध्ये उपविभागीय अधिकारी, बाळापूर यांनी शोध घेतल्यावर मिळून आलेले दिसून येत नाही. प्रकरण सन १९८७-८८ या कालावधीतील आहे व त्यामुळे प्रकरण कोणत्या वर्षी सादर झाले नाही हे आज निश्चित करता येत नसल्यामुळे निश्चित अधिकाऱ्यास जबाबदार धरता येत नाही. परंतु ज्याअर्थी बाळापूर पातूर येथील भूमापन

क्रमांक ११/१ चे अवलोकन केले असता शेरे कोष्टकेत एन.ए.पी./३६/बा.पा./२७/८७-८८ प्रमाणे दुकाना करिता ०.०१ आर जमिन अकृषक करण्यात आले त्यावर रुपये २०/- अकृषक कर बसविण्यात आला. मात्र सन १९८७-८८ चे वर्गवारी रजिस्टरमध्ये नोंद असल्याने त्यासमोर S.D.O. बाळापूर असे लिहिले असल्याने प्रकरण होते हे निश्चित आहे व यावरुन निश्चितच अकृषक निर्णय हा झाला असावा हा निष्कर्ष काढावा लागतो व अपीलकर्ता हे रुपये २०/- चा अकृषक कर भरणा करीत आले आहे असे त्यांचे म्हणणे खरे आहे व नोंदी खऱ्या आहेत असा हा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. परंतु वर नमुद केल्याप्रमाणे सदर नस्ती उपलब्ध होत नसल्यामुळे त्यावेळेत असलेल्या कोणत्या अधिकाऱ्यांस जबाबदार धरावे असे निश्चित होत नसल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांनी दिनांक ३.११.२००६ रोजी मागितलेली माहिती ही सदरची नस्ती सन १९८७-८८ या कालावधीतील असल्यामुळे व ती आज उपविभागीय अधिकारी, बाळापूर, तहसीलदार, पातूर, प्रस्तृतकार, तलाठी, पातूर, अधिक्षक भूमी अभिलेख, अकोला, तालुका निरिक्षक, भूमि अभिलेख, पातूर तसेच अभिलेखागार, जिल्हा अभिलेख, जिल्हाधिकारी कार्यालय अकोला यांचे कार्यालयात शोध घेऊनही उपलब्ध होत नसल्यामुळे अपीलकर्ता यांना सदरची मागितलेली माहिती उपलब्ध करुन देता येत नाही त्याकरिता त्यांचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**दिनांक :- २१.७.२००८**

**राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १८०३/२००७.**

श्री. सुनिल के. अभिचंदानी,
१४२, रेसीडेन्सी रोड, सदर,
नागपूर - ४४० ००१. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एन. के. हिरेखण,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
पोलीस उपआयुक्त,
वाहतुक विभाग, नागपूर शहर,
नागपूर.

श्री. अजय रामटेके,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा,
अतिरिक्त आयुक्त,
नागपूर महानगरपालिका, नागपूर.

श्री. नासीर खान,
जनमाहिती अधिकारी तथा
वाहतुक अभियंता,
नागपूर महानगरपालिका, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २२.७.२००८)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २४.५.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २२.७.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२.	अपीलकर्ता यांनी दिनांक २६.२.२००७ रोजी वाहतुक अभियंता तथा माहिती अधिकारी, महानगरपालिका, नागपूर यांच्याकडे १) सदर मेश्राम चौक रुपम कार्नर जवळचा नो पार्कीग बोर्ड कुठे गायब

... २



आहे ? २) सदर मेश्राम चौक मधील ट्रॉफीक सिग्नल ७ महिन्यापासून बंद कां आहे ? ३) दिनांक २७.१२.२००६ व दिनांक २.१.२००७ च्या निवेदनावर कोणती कारवाई केली ? ४) जयस्तंभ चौक रेल्वे स्टेशन जवळ अस्ताव्यस्थ ऑटोरिक्षा उभे ठेवल्यामुळे वाहतुक नियंत्रणावर बाधा होते. त्यावर वाहतुक नियंत्रण ठेवण्यासाठी कारवाई का करीत नाही ? सोबत (१) निवेदनाची झेरॉक्स प्रत. (२) वर्तमानपत्राची कात्रण प्रत जोडलेली आहे. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २१.३.२००७ रोजी वाहतुक अभियंता, नागपूर महानगरपालिका, नागपूर यांनी अपीलकर्ता यांना १) सदर मेश्राम चौक, रुपम कार्नर जवळ गायब झालेला बोर्ड कोणत्या संदर्भात होता ही माहिती आपल्या अर्जानुसार बोर्ड गायब झाल्यामुळे देणे शक्य नाही. २) शहरातील कोणते वाहतुक सिग्नल सुरु ठेवावे किंवा बंद ठेवावे, हे ऑपरेशन पोलीस वाहतुक विभागातर्फे करण्यात येते. ३) दिनांक २७.१२.२००६ चे अर्जाचे निवेदन संदर्भीय अर्जासोबत जोडण्यात आलेले नाही. दिनांक २.१.२००७ चे निवेदन मा.सहाय्यक पोलीस आयुक्त, वाहतुक नागपूर यांना लिहिण्यात आल्यामुळे केलेली कार्यवाही वाहतुक पोलीस विभागाशी संबंधित आहे. ४) हा विषय पोलीस वाहतुक विभागाच्या कार्यक्षेत्रात येतो. असे अपीलकर्ता यांना कळविलेले दिसून येते. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी अपीलीय अधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त, महानगरपालिका, नागपूर यांच्याकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये निर्णय दिनांक २९.९.२००७ रोजी देण्यात आलेला दिसून येतो. "वाहतुक अभियंता यांनी दिलेल्या माहितीनुसार वाहतुक पोलीसांनी सूचविल्याप्रमाणे सदर ठिकाणी नो पार्कीगचा बोर्ड लावण्यांत आला असून सदर सिग्नल सुध्दा सुरु केलेलो आहे. वाहतुक सिग्नल सुस्थितीत ठेवणे मे. केल्ट्रान कंपनीचे काम आहे. सिग्नल सुरु ठेवणे किंवा बंद ठेवणे ही बाब पोलीस वाहतुक विभाग यांचे कार्यक्षेत्रात असल्यामुळे त्यांना याबाबत वाहतुक अभियंता यांनी पत्र क्र. वा.अ. २००७/१०७, दिनांक १७.८.२००७ नुसार कळविलेले आहे. माहितीच्या अधिकारामध्ये एखादया प्रकरणा संबंधी उपलब्ध असलेली माहिती मागविता येते. मात्र त्यामध्ये एखादी कार्यवाही करण्यासाठी कार्यकारी स्वरुपाचे आदेश पारित करणे अपेक्षित नाही. तथापि या प्रकरणांत विभागाने अपीलार्थीनी विचारणा केल्याप्रमाणे वाहतुक सिग्नलसंबंधी कार्यवाही केलेली असल्यामुळे प्रस्तुत अपील खारीज करणे योग्य होईल.

त्यामुळे अपीलार्थीस आवश्यक माहिती प्राप्त झाली असल्यामुळे हे अपील निकाली काढलेले दिसून येते. सदरच्या आदेशाने अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील

... ३



दाखल केलेले दिसून येते. द्वितीय अपीलामध्ये वाहतुक अभियंता यांनी दिलेले उत्तर हे बेजबाबदारपणाचे आहे असे नमुद करुन शास्ती लादण्यास विनंती करण्यात आली आहे.

३. अपीलकर्ता यांच्या दिनांक २६.२.२००७ च्या वरीलप्रमाणे मागितलेल्या माहितीचे संबंधाने अवलोकन केले असता असे दिसून येते की, मागितलेली माहिती ही प्रश्नार्थक स्वरुपाची आहे. प्रश्न सुध्दा दोन प्रकारचे असतात एखाद्या तक्रारीवर किंवा एखाद्या निवेदनावर काय कार्यवाही झाली त्याबाबत कार्यवाहीची टिप्पणी किंवा पत्र व्यवहाराच्या छायांकिंत प्रती उपलब्ध करुन देणे. जनमाहिती अधिकारी यांचे अभिप्राय येतील अशा प्रकारचे अभिप्रायात्मक प्रश्न हे दुसऱ्या प्रकारचे असतात व अशा प्रकारचे प्रश्न हे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २(च) मधील "माहिती" या संज्ञेच्या व्याख्येत येत नाही. माहिती याचा अर्थ सार्वजनिक प्राधिकरणामध्ये ज्या साहित्याचे स्वरुपात उदा. :- अभिलेख, दस्तऐवज, कागदपत्रे, टिप्पणी, परिपत्रके इत्यादी स्वरुपात उपलब्ध असलेल्या कागदपत्रांची छायांकित प्रती उपलब्ध करुन घेणे असा माहितीचा अधिकार आहे. अपीलकर्ता यांच्या अर्जातील मुद्या क्रमांक ३ मध्ये दिनांक २७.१२.२००६ व दिनांक २.१.२००७ च्या निवेदनावर कोणती कार्यवाही केली असे विचारले. सदर मुद्या माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे आहे. परंतु निवेदन हे वाहतुक अभियंता यांच्याकडे केलेले नसल्यामुळे त्याबाबतची प्रत सुध्दा अर्जासोबत जोडलेले नसल्यामुळे त्याबाबतचे उत्तर हे वाहतुक अभियंता देऊ शकत नाही असे दिसते. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, त्यांनी दिनांक २६.२.२००७ रोजी सहाय्यक पोलीस आयुक्त यांच्याकडे सुध्दा तीच माहिती मागण्यासाठी अर्ज केला होता व त्याप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे व त्यांचे त्याबाबत समाधान सुध्दा झाले आहे व त्याप्रमाणे दिनांक १२.४.२००७ रोजी श्री.अमितेश कुमार, पोलीस उपआयुक्त, वाहतुक, नागपूर शहर यांनी जे अपीलकर्ता यांना उत्तर दिलेले आहे ते उत्तर स्वयंस्पष्ट आहे व त्याबाबत अपीलकर्ता यांचे समाधान सुध्दा झाले आहे असे त्यांनी सांगितले व त्यावरुनच वाहतुक अभियंता यांनी उत्तर दिलेले आहे. त्या उत्तराचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपीलकर्ता यांच्या प्रश्नाचे संदर्भातच ते उत्तर दिलेले आहे. तसेच प्रथम अपीलाचे उत्तर देतांना

वस्तुस्थिती व मागितलेल्या माहितीचा विचार करुन उत्तर दिलेले असल्यामुळे सदरचा निर्णय सुध्दा योग्य आहे. अपीलकर्ता यांचा उद्येश हे अतिशय चांगले असले तरी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या अर्जाच्या

... ४



मुद्यातून कोणत्याही प्रकारची कार्यवाही करुन मागता येत नाही व त्यामुळेच अपीलकर्ता यांस वाहतुक अभियंता तथा जनमाहिती अधिकारी किंवा प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या निर्णयाने समाधान झालेले दिसून येत नाही. परंतु वर नमुद केल्याप्रमाणे सहाय्यक पोलीस आयुक्त, वाहतुक विभाग, नागपूर शहर यांचेकडून उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचा उद्येश पूर्ण झालेला आहे असे दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांच्या दिनांक २६.२.२००७ रोजी वाहतुक अभियंता तथा माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २१.३.२००७ रोजी उपलब्ध झालेली माहिती ही विहित मुदतीत उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- २२.७.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १८०१/२००७.**

श्री. सुनिल के. अभिचंदानी,
१४२, रेसीडेन्सी रोड, सदर,
नागपूर - ४४० ००१. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. अजय रामटेके,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा,
उपआयुक्त,
नागपूर महानगरपालिका, नागपूर.

श्री. डी. एस. मेहर,
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक संचालक,
नगर रचना,
नागपूर महानगरपालिका, नागपूर. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २२.७.२००८)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १४.५.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २२.७.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १४.१२.२००६ रोजी अशफाक खान, सदर बाजार, मेश्राम चौक, रेसीडेन्सी रोड, सदर येथील अनधिकृत बांधकाम पाडण्याचे मा.उपनिगम आयुक्त यांचे आदेश दिनांक २४.७.१९९६ अन्वये आहेत. परंतु आपण अनधिकृत बांधकाम १० वर्षे झाले तरी का पाडले नाही ? सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १२.१.२००७ रोजी संदर्भाधिन अर्जान्वये आपण मागितलेली माहिती हा अभिलेखाचा भाग नाही. त्यामुळे आपणांस माहिती देणे शक्य नाही.

... २

रेसिडेन्सी रोड, सदर येथील अनधिकृत बांधकामावर कार्यवाही कां करण्यांत आली नाही. याबाबत आपण महानगरपालिकेच्या संबंधित विभागीय कार्यालयाशी संपर्क साधावा. असे सहाय्यक संचालक (प्र.) नगर रचना, महानगरपालिका नागपूर यांच्याकडे सही नसलेल्या पत्राप्रमाणे अपीलकर्ता यांना कळविण्यात आलेले दिसून येते. सदरच्या पत्रामुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ७.२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २९.५.२००७ रोजी देण्यात आलेला असून "माहितीचा अधिकार अधिनियमा अंतर्गत एखाद्या प्रकरणी काय कारवाई करण्यांत आली याबाबत माहिती मागविता येते. परंतु कारवाई कां करण्यांत आली नाही किंवा केव्हा करण्यांत येणार आहे. यासाठी माहिती देण्यांकरिता माहिती अधिकाऱ्यांना बाध्य करता येणार नाही. तसेच माहिती अधिकाऱ्यांनी संबंधित झोनकडून माहिती घेऊन अनाधिकृत बांधकामासंबंधी केलेल्या कार्यवाहीचे संबंधाने अपिलार्थींना १५ दिवसांचे आंत स्पष्टपणे वस्तुस्थितीदर्शक उत्तर पाठवावे. तसेच यापुढे उत्तर पाठवितांना पत्रावर स्वाक्षरी आहे किंवा नाही याची खात्री करुन विहित मुदतीचे आंत उत्तर पाठविण्याची दक्षता घ्यावी व अनुपालन अहवाल सादर करावा असे निर्देश देऊन अपील निकाली काढण्यात आले आहे. सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांच्या दिनांक १४.१२.२००६ च्या अर्जान्वये विचारलेली माहिती ती जरी प्रश्नार्थक स्वरुपात असल्यामुळे दिनांक २४.७.१९९६ च्या उपनिगम आयुक्त यांच्या आदेशावर कार्यवाही काय झाली आहे अशा प्रकारची माहिती त्यांनी मागितली आहे व त्यामुळे झालेल्या कार्यवाहीच्या संदर्भामध्ये कागदपत्राची छायांकित प्रत उपलब्ध करुन देणे हे अपेक्षित आहे. परंतु अपीलकर्ता यांना उत्तर पाठवितांना एकतर दिनांक १२.१.२००७ च्या पत्रावर तत्कालीन सहाय्यक संचालक (प्र.) नगर रचना, महानगरपालिका, नागपूर यांनी सही केलेली नाही. तसेच माहिती मागण्याचा विचार न करता अभिलेखाचा भाग नाही असे उत्तर दिले हे अतिशय बेजबाबदार पणे त्यांचा अर्जास हाताळला गेला आहे असाच निष्कर्ष काढावा लागतो व माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ केलेली आहे असाही निष्कर्ष काढावा लागतो. प्रथम अपीलात सुध्दा माहिती उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय दिलेला असून ती माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येत नाही व त्यामुळे जे जे अधिकारी व कर्मचारी संबंधित नस्तीच्या संदर्भामध्ये जबाबदार आहेत ते सर्व दोषी आढळून येतात व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

... ३

## <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून त्यांच्या दिनांक १४.१२.२००६ च्या अर्जाप्रमाणे तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या दिनांक २९.५.२००७ च्या निर्णयाप्रमाणे हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत अपीलकर्ता यांना माहिती विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२) संबंधित जनमाहिती अधिकारी तसेच इतर अधिकारी व कर्मचारी सदरची नस्ती उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भामध्ये ज्यांचे ज्यांचे सहाय्य घेतले आहे असे सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे संबंधी चौकशी करुन जबाबदारी निश्चित करण्यात यावी व त्या सर्वांचे विरुध्द रुपये २५,०००/- शास्ती अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे लादण्यात येत आहे.

३) सदरच्या शास्तीची अंमलबजावणी आयुक्त, नागपूर महानगरपालिका, नागपूर यांनी करावयाची आहे.

४) सदरच्या निर्णयाची एक प्रत आयुक्त, नागपूर महानगरपालिका, नागपूर यांना स्वतंत्रपणे रजिस्टर पोष्टाने पुढील कार्यवाहीकरिता पाठविण्यात यावी.

५) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- २२.७.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १८९४/२००७.

श्री. मनोहर ग्यानिराम उईके,
मु. जांभळी, पो. ता. सालेकसा,
जि. गोंदिया. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. अनुप शुक्ला,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा,
प्रभारी खंड विकास अधिकारी,
पंचायत समिती, सालेकसा,
जिल्हा गोंदिया.

श्री. दिलीप लक्ष्मण शेंडे,
जनमाहिती अधिकारी तथा
तत्कालीन सचिव,
ग्रामपंचायत सालेकसा,
ता.सालेकसा, जि. गोंदिया.

श्री. एस. एन. हुमणे,
जनमाहिती अधिकारी तथा
सचिव,
ग्रामपंचायत सालेकसा,
ता.सालेकसा, जि. गोंदिया. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २८.७.२००८)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २९.१.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २८.७.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता यांच्या तर्फे त्यांच्या पत्नी सौ.सुनंदा उईके हजर असून त्यांनी मुदतीचा अर्ज केलेला आहे. परंतु मागितलेल्या माहितीचे स्वरुप तपासल्यावर असे

दिसून येते की, अपीलाची सुनावणी घेतल्यावर अपीलकर्ता यांच्या पत्नीने स्वतः माहिती सांगितल्यामुळे अपीलाची सुनावणी ही पुढे घेण्यात येवून निर्णय देण्यात येत आहे. उत्तरवादी हजर आहेत व तत्कालीन सचिव तथा जनमाहिती अधिकारी हे सुध्दा उपस्थित आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २५.९.२००६ रोजी सचिव, ग्रामपंचायत, सालेकसा यांच्याकडे माहिती अधिकारी म्हणून खालील प्रमाणे १९ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. १) मौजा जांभळी येथील आदिवासी समाज भवन मध्ये आज पर्यंत खर्ची झालेल्या व्यवहारात कुणाला किती रुपये दिले, किती रुपये बाकी आहेत, कोणकोणत्या काम केले, कामाला २ वर्षे वेळ कां लागला, कोणत्या ठेकेदाराला ठेका दिले, ठेकेदाराला आता पर्यंत किती रुपये दिले, संपूर्ण माहिती बँक पासबुकाचे झेरॉक्स सत्यप्रतीसह माहिती देण्याची कृपा करावी ही विनंती. २) ग्रामपंचायत सालेकसाचे ११ सदस्यांपैकी किती सदस्यांचे घरी संडास आहे, किती सदस्यांचे घरी संडास नाहीत, ग्रामपंचायतचे टॅक्स किती सदरस्यांवर थकित बाकी आहे, सदरस्यांना टॅक्स मागणीकरिता किती वेळा नोटीस दिली, आपल्या कार्यकालात किती ग्रामसभा घेतले व किती मासिक सभा घेतले याची कृपया माहिती देण्याची कृपा करावी ही विनंती. ३) ग्रामसभा घेण्यापूर्वी कोणत्या कोतवालाच्या माध्यमातून किती वेळा दिवंडी दिली, कोणकोणत्या गावी ग्रामसभा घेतले, मासिक बैठकीत मुंबई ग्राम पंचायत अधिनियम १९५९ चे क.१७६(२), खंड (७) चे एका सभेची कार्यरिती मधील नियम ४० प्रमाणे सरपंचाच्या परवानगी घेतल्यावर बसण्याची मुबा आहे काय. कृपया माहिती देण्यात यावे ही विनंती. ४) सरपंचच्या मार्गदर्शनानुसार ग्राम पंचायतचे कार्य व खास सभा घेतली पाहिजे किंवा उपसरपंचच्या मार्गदर्शनात खास सभा घेतली पाहिजे. कृपया माहिती देण्यात यावे ही विनंती. ५) दिनांक ६.५.२००६ ला आपण उपसरपंचचे नोटीस सरपंचला खास सभा दिनांक ७.५.२००६ रोज रविवारला ठिक ११:०० वाजता घेतले त्याची ठराव सत्यप्रती देण्याची कृपा करावी ही विनंती, तसेच किती सदस्य हजर होते याची उपस्थिती रजिस्टरची सत्यप्रती देण्याची कृपा करावी. ६) सालेकसा ग्रामपंचायत मध्ये किती समित्या गाव पातळीवर व किती समित्या ग्राम पंचायत स्तरावर स्थापित केले, त्या समित्यांमध्ये पदाधिकारी व सदस्यांचे नावासह सत्यप्रती देण्यात यावे. ७) ग्राम पंचायत सालेकसा हे ग्रामपंचायत राज प्रमाणे चालत आहे की, पंचायत राज प्रमाणे चालत आहे, कृपया माहिती

देण्यात यावे. ८) सन २००५-२००६ चा अंदाजपत्रक मंजूर केले त्याची सत्यप्रती व सन २००६-२००७ करिता मंजूर करण्यात आलेला अंदाजपत्रक देण्याची कृपा करावी ही विनंती. ९) बाळ जन्मल्यावर ग्रामपंचायत कार्यालयात जन्म नोंद रजिस्टरवर नाव नोंदविण्याची कार्य पध्दती कशी आहे. बाळ दत्तक घेणाऱ्याला त्या बाळाचे वडील व आईचे नांव कसे नोंदविण्यात येतो, आपले कानूनी कार्यवाईची व्यवस्था कशी आहे. कृपया माहिती देण्याची कृपा करावी ही विनंती. १०) दलितवस्ती सुधार योजनेचा व्यवहार खंड विकास अधिकारी व सचिव या दोघांचे संयुक्त सहिनिशी करण्यात येते किंवा सचिवांचा वैयक्तिक खात्यात करण्यात येते कृपया माहिती देण्यात यावे. जरी सचिवांचे वैयक्तिक खाते मधूनच करण्यात येत आहे तर सचिवांचे वैयक्तिक खाते असल्याचा शासनाचा परिपत्रक देण्यात यावे ही विनंती. ११) सचिव हे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया यांचे प्रतिनिधी असून त्यावर नियंत्रण खंड विकास अधिकारी यांचा असतो. परंतु सचिव हे बरोबर काम करतात किंवा नाही याचा देखरेख कोणी करावा, कोणाचे काम करतात, बीडीओ यांना कशी खात्री होते की सचिवाचे कार्य बरोबर आहे. कृपया माहिती देण्यात यावे. १२) ग्रामपंचायतची मासिक सभा किंवा ग्रामसभा पारदर्शी असावा की अपारदर्शी असावा, मासिक सभेत ग्राम पंचायत मध्ये आम नागरिकांना बसन्याची परवानगी आहे किंवा नाही, मासिक सभा सर्व लोकांसाठी जे नागरीक मासिक सभेत उपस्थित राहू इच्छितात त्यांना बसन्याची परवानगी आहे किंवा नाही, कृपया माहिती देण्याची कृपा करावी. १३) सरपंच किंवा सदस्यांना बैठकीचे उपस्थिती भत्ता देण्यात आली आहे काय, सरपंचला नियमानुसार किती मानधन देत आहात व दिले आहेत, सरपंचला ग्रामपंचायत कार्याकरिता वरिष्ठ कार्यालयात जाण्यायेण्या करिता तसेच भत्त्याची व्यवस्था किती केली आहे व दिले आहेत, आजपर्यंत आपण किती मासिक व ग्रामसभा घेतले आहात, त्यात कोणकोणत्या विषयावर चर्चा करण्यात आली, किती विषयावर बहुमत प्राप्त झाले किती विषयावर बहुमत अप्राप्त आहे, यात मुरुमटोला येथील हनुमानमंदिर जवळ सिमेंट रोड सुरु करण्यात आला असून कोणत्या बैठकीत कोणाच्या अध्यक्षतेखाली ठराव मंजूर केले. कृपया माहिती देण्यात यावे. तसेच हे बांधकाम कोणत्या योजनेत सुरु करण्यात येत आहे. कृपया माहिती देण्यात यावे. १४) बालकसरा येथील प्राथमिक शाळेचा कंपाऊंड तसेच जांभडी येथील आदिवासी समाज भवन व मुरुमटोला येथील सिमेंट रोड या बांधकामाचे ठेका कोणत्या ठेकेदारांना दिले कृपया माहिती देण्यात यावे. १५) सालेकसा ग्रामपंचायत क्षेत्रात आपल्या

कार्यकालात किती बांधकाम पूर्ण केले व किती अर्धवट आहेत यावर कुणांकुणांला चेक किंवा रक्कम दिले ठेकेदार कोणकोण होते, यात किती ग्रामपंचायत सदस्यांना प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रित्या चेक किंवा नगद रुपये दिले कृपया नगद असल्यास रसीद व चेक असल्यास चेक नंबर व दिनांक तसेच बँकेचे नावासह सत्यप्रती माहिती देण्यात यावे ही विनंती. १६) दिनांक ४.८.२००५ ते दिनांक २०.९.२००६ पर्यंत घेतलेले ग्राम सभा व मासिक सभाचे ठरावाची माहिती सत्यप्रतीत देण्याची कृपा करावी ही विनंती. १७) सालेकसा ग्रामपंचायतच्या वतीने मागील सत्र २००५-२००६ मध्ये कोणकोणते काम करण्यात आले व या नवीन सत्रात म्हणजे २००६-२००७ मध्ये कोणकोणते काम करण्यात येणार आहेत. कृपया माहिती देण्यात यावी. १८) सालेकसा ग्रामपंचायत मध्ये १०० दिवस रोजगार प्राप्तीसाठी किती अर्ज मागविले, मागील वर्षी किती लोकांना या योजनेत काम दिले या वर्षी किती लोकांना काम देण्याचे नियोजन केले कृपया माहिती देण्यात यावी. १९) कोणतीही सभा बोलविण्यापूर्वी सभा बोलविण्याची कार्य पध्दती कशी आहे. (१) सभा बोलविण्यापूर्वी सरपंचला टिपणी सादर करता, (२) उपसरपंचला टिपणी सादर करता, (३) सदस्यांना विचारता, (४) बीडीओ यांना विचारता, (५) स्वतः मर्जीअनुसार मिटींग घेता, (६) मिटींग घेण्यास सदस्यांनी सांगाव, (७) मिटींग घेण्यास उपसरपंचानी सांगाव, (८) मिटींग घेण्याकरिता सरपंचनी सांगावा, (९) मिटींग घेण्याकरिता बीडीओनी सांगावा, (१०) सरपंच हे आपल्या मर्जीअनुसार मिटींग बोलवावा, (११) किंवा सचिवनी वेळोवेळी सरपंचला शासनाचे परिपत्रकानुसार टिपणी सादर करायला हवा, (१२) सरपंचला शासनाचे सर्व कार्य प्रमाणे सभासंबंधी घ्यावा तो कृपया माहिती देण्यात यावी ही विनंती. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ३.११.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचे संदर्भात अपीलकर्ता यांना दिनांक २०.११.२००६ रोजी पत्राद्वारे दिनांक ४.१२.२००६ ला ११:१५ वाजता माझे कक्षात सुनावणीस हजर रहावे असे कळविलेले दिसून येते. परंतु प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता हे सुनावणीस हजर नव्हते व त्यामुळे पुढील निर्णय झालेला दिसून येत नाही व अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहेत.

३. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने माहिती कां उपलब्ध करुन दिली नाही असे तत्कालीन सचिव तथा जनमाहिती अधिकारी यांना विचारले असता त्यांनी असे सांगितले की, त्यांना सदरचा अर्ज हो त्यांच्याकडे प्राप्त

झाला नव्हता व त्यामुळे त्यांना त्याबद्यल काहीही माहिती नव्हतें व म्हणून माहिती उपलब्ध करुन देता आली नाही. त्यावर अपीलकर्ता यांच्या तर्फे सदरच्या अर्जाची नोंद ग्रामपंचायत मध्ये झाली आहे असे आयोगाचे निदर्शनास आणले मात्र त्याबाबत तत्कालीन माहिती अधिकारी यांना त्याबद्यल काहीही माहिती नाही असे त्यांनी सांगितले. परंतु आयोगा पुढे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी माहिती अधिकारी यांची कागदपत्रे म्हणून दिनांक २६.९.२००६ रोजी श्री. डि. एल. शेंडे तत्कालीन ग्रामसेवक यांची सही असलेले १९ मुद्यांच्या संदर्भात उत्तराचे पत्र अपीलकर्ता यांना संबोधित केलेले दिसून येते. तसेच दिनांक २६.९.२००६ रोजी श्री. डि. एल. शेंडे, ग्रामसेवक म्हणून अपीलकर्ता यांना दिनांक २५.९.२००६ चे अर्जाचे अनुषंगाने आपण मागितलेली १ ते १९ मुद्यांची माहिती तयार करण्यात आली आहे. आपण ५००/- रुपये भरुन माहिती कार्यालयीन वेळेत येऊन घेऊन जावे असे पत्र दिलेले दिसून येते. परंतु सदरचे पत्र हे अपीलकर्ता यांना मिळालेले नाही असे त्यांचे म्हणणे आहे. पुन्हा अपीलकर्ता यांचा अर्ज हा मिळालेला नाही असे सुरुवातीलाच तत्कालीन माहिती अधिकारी यांनी सांगितले. मात्र वर नमुद केल्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी सदरच्या माहितीच्या संदर्भामध्ये पत्र व माहिती तयार आहे असे दिसून येते त्यावर त्यांनी स्वतःची सही आहे असे मान्य केले. यावरुन श्री. डि. एल. शेंडे, ग्राम सचिव यांनी आयोगाची सुध्दा दिशाभूल करण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. अपीलकर्ता यांची पत्नी यांनी सुध्दा त्या स्वतः सरपंच असतांना व श्री. डी. एल. शेंडे हे ग्रामसचिव असतांना त्यांना ते कोणतीही माहिती देत नव्हते व कोणतेही सहकार्य करीत नव्हते असे सांगितले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा श्री. डी. एल. शेंडे, यांचेबद्यल हे कंत्राटी ग्रामसेवक असून काम करीत नाही व त्याकरिता त्यांना पंचायत समितीमध्ये कामावर घेण्यात आले आहे असे सांगितले. परंतु वस्तुस्थितीप्रमाणे तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून ते दोषी आढळून येतात हा निष्कर्ष काढावा लागतो व त्यामुळे अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे ते शास्तीस पात्र आहेत. प्रथम अपीलाचा निर्णय हा दोन्ही पक्षकारांच्या उपस्थिती देणे आवश्यक असते. परंतु अपीलकर्ता हजर नाही असे जे कारण दिलेले आहे त्याकरिता त्याबद्यलची नोंद मात्र कुठेही आढळून येत नाही व कारणमिमांसा दिलेला निर्णय हा दिसून येत नाही. त्याकरिता तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी यांना ताकीद देणे संयुक्तिक राहील. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

... ६

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून त्यांच्या दिनांक २५.९.२००६ च्या अर्जातील १९ मुद्यांच्या संदर्भामध्ये अभिप्रायात्मक मुद्दे वगळून छायांकित प्रतीच्या स्वरुपामध्ये विनामुल्य माहिती हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत उपलब्ध करुन देण्यात यावी व अपीलकर्ता यांची किंवा त्यांच्या पत्नीची पोच घेण्यात यावी.

२) अपीलकर्ता यांच्या दिनांक २५.९.२००६ च्या अर्जाप्रमाणे ३० दिवसांचे आंत माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे तत्कालीन जनमाहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, सालेकसा हे दोषी आढळून येत असल्यामुळे त्यांचे विरुध्द रुपये १००००/- ची शास्ती लादण्याम येत असून सदरची शास्तीची वसुली ही प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्यांच्या दर महिन्याचे वेतनातून वसूल करुन "००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)" या लेखाशिर्षामध्ये जमा करावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**दिनांक :- २८.७.२००८**

HIREKHAN/BHUJI/४६५-४७०/२८.७.२००८

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १८९७/२००७.

श्री. देवमन सखाराम तायडे,
मु. निलकंठ नगर, चिखली रोड,
ता. खामगांव, जि. बुलढाणा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा,
सहाय्यक धर्मदाय आयुक्त,
जि. बुलढाणा.

श्री. सुधाकर रामचंद्र अजबे
जनमाहिती अधिकारी तथा
सचिव, टिळक राष्ट्रीय विद्यालय,
खामगांव, जि. बुलढाणा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २८.७.२००८)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १५.१.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २८.७.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या तर्फे श्री.धोत्रे, लघुलेखक हे हजर आहेत. माहिती अधिकारी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ९.११.२००६ रोजी सचिव, टिळक राष्ट्रीय विद्यालय, खामगांव, जि.बुलढाणा यांच्याकडे राज्य शासकीय माहिती अधिकारी म्हणून विश्वस्त मंडळाच्या मिटींगबाबत "माझ्या निलंबनाच्या विश्वस्त मंडळाच्या ठरावाची संपूर्ण माहितीची नक्कल व विश्वस्त मंडळाच्या नावाची नोंदणीकृत यादी मिळावी. तसेच अपीलीय अधिकाऱ्यांचे नांव व पत्ता. माहिती स्वतः घेण्यास बोलाविलेल्या तारखेस येणार. अर्जदाराचे पत्त्यामध्ये दुरध्वनी क्रमांक २५९४२४ दिलेला दिसून येतो. सदरच्या अर्जाप्रमाणे विहित

मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांनी दिनांक १२.१२.२००६ रोजी अपीलकर्ता यांनी धर्मदाय आयुक्त कार्यालय, बुलढाणा यांच्याकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २.१.२००७ रोजी देण्यात आला असून अपील मंजूर करण्यात आलेले दिसून येते. त्यामध्ये सामनेवाला अध्यक्ष, टिळक राष्ट्रीय विद्यालय, खामगांव यांना सूचित करण्यात येते की, त्यांचे दप्तरी उपलब्ध असलेली माहिती ताबडतोब अपीलकार यांना पुरविण्यात यावी. अपीलकार यांना सूचित करण्यात येते की, नियमानुसार आवश्यक असलेली फी त्यांनी सामनेवाला यांचेकडे भरावी. अशा प्रकारचा आदेश देण्यात आलेला दिसून येतो. त्यानंतर सुध्दा अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ९.११.२००६ च्या अर्जान्वये मागितलेल्या निलंबनाच्या विश्वस्त मंडळाच्या ठरावाची नक्कल ही त्यांना दिनांक २०.११.२००६ रोजी दिलेल्या आरोपपत्रात दिला आहे असा खुलासा संस्थेचे सचिव तथा माहिती अधिकारी यांनी सहाय्यक धर्मदाय आयुक्त, बुलढाणा यांच्याकडे केलेला होता. तरीसुध्दा माहिती उपलब्ध करुन देण्यास तयार आहे असे सचिव तथा माहिती अधिकारी यांनी सांगितले व त्याकरिता अपीलकर्ता यांना बोलाविले होते परंतु ते आले नाही असे त्यांचे म्हणणे आहे. त्यावर अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना माहिती अधिकारी यांनी बोलाविले नाही. अपीलकर्ता यांचे म्हणणे संयुक्तिक वाटते. कारण माहिती उपलब्ध करुन देण्यास बोलाविले असते तर आरोपपत्रामध्ये विश्वस्त मंडळाच्या ठरावाची नक्कल दिलेली आहे असा खुलासा करण्याची आवश्यकता नव्हती. प्रथम अपीलाचे निर्णयात सुध्दा माहिती उपलब्ध करुन द्यावी परंतु फी भरुन उपलब्ध करुन द्यावी अशा प्रकारचा निर्णय दिलेला आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम न प्रमाणे माहिती जर विहित मुदतीत उपलब्ध करुन दिली नसेल तर ती विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी अशी तरतुद आहे. तरीसुध्दा विहित मुदतीच्या नंतर प्रथम अपील दाखल झाल्यावर सुध्दा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी फी भरुन माहिती उपलब्ध करुन द्यावी हे आदेश कोणत्या आधारावर दिले हे कळावयास मार्ग नाही. त्याबद्यलचे निर्णयामध्ये कोणत्याही प्रकारचे विवेचन दिसून येत नाही. आरोप पत्रामध्ये विश्वस्त मंडळाच्या ठरावाची नक्कल उपलब्ध करुन दिलेली आहे ही बाब

अपीलकर्ता यांना मान्य आहे. परंतु त्यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना इतिवृत्ताचे रजिस्टर मधील सर्व उपस्थितांच्या सहीत ठरावाची नक्कल अपेक्षित आहे. आरोप पत्रासोबत फक्त सुचक व अनुमोदक यांनी दिलेला ठराव ऐवढेच नमुद केलेले आहे. उपस्थित असलेल्या सर्व सदस्यांची नावे पण त्यात नांव नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही हा निष्कर्ष काढावा लागतो. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, सदरची माहिती उपलब्ध करुन दिली असती तर त्यांना शालेय न्यायाधिकरणाकडे कागदपत्रे दाखल करता आली असती व ती दाखल न केल्यामुळे सदरचा निर्णय त्यांचे विरुध्द गेलेला आहे व त्यामुळे त्यांना त्यांचे जे नुकसान झाले आहे त्याबद्यलची नुकसान भरपाई मिळावी अशी त्यांची मागणी आहे. द्वितीय अपील मेमोमध्ये उच्च न्यायालयातून निलंबनाला स्थगिती आणू शकलो नाही. माझे आजपर्यंतचे आर्थिक नुकसान अंदाजे ६०,०००/- रुपयांचे झाले आहे आणि पुढे नुकसानीचे पर्व सुरुच राहणार आहे. कारण माहे नोंव्हेंबर २००६, डिसेंबर २००६ आणि जानेवारी २००७ चा पगार अद्याप झाला नाही व इतरही विषयी त्यांना नुकसानीचे संदर्भ केलेले दिसून येते त्यामुळे अपीलकर्ता यांना त्यांच्या निलंबनाच्या विश्वस्त मंडळाच्या ठरावाची संपूर्ण माहितीची नक्कल व विश्वस्त मंडळाच्या नावाची नोंदणीकृत यादी ही उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. जनमाहिती अधिकारी तथा सचिव यांचे म्हणणे असे आहे की, विश्वस्त मंडळाच्या ठरावाच्या माहितीची नक्कल याचा अर्थच त्यांनी आरोपपत्रासोबत पुरविण्यात आलेली नक्कल असा होतो. परंतु अपीलकर्ता यांनी इतिवृत्ताचे रजिस्टरमधील सूंपर्ण इतिवृत्ताचा अहवाल असलेल्या सर्व सदस्यांची सही असलेली माहिती अपेक्षित आहे. त्यांना त्या माहितीची आवश्यकता आहे त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

... ४

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ९.११.२००६ च्या अर्जातील त्यांच्या निलंबनाच्या विश्वस्त मंडळाच्या ठरावाची संपूर्ण माहितीची नक्कल इतिवृत्ताच्या रजिस्टरमधील विश्वस्त मंडळाच्या इतिवृत्ताची उपस्थित असलेल्या सर्व सदस्यांच्या सहया सहीत विश्वस्त मंडळाच्या नावाची नोंदणीकृत यादी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत विनामुल्य रजिस्टर पोष्टाने अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) जनमाहिती अधिकारी तथा सचिव टिळक राष्ट्रीय विद्यालय, खामगांव यांनी अपीलकर्ता यांच्या दिनांक ९.११.२००६ च्या अर्जातील मागितलेल्या माहितीच्या प्रमाणे माहिती त्यांना अधिनियमाचे कलम ७(१) प्रमाणे विहित मुदतीत उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे अधिनियमाचे कलम २० प्रमाणे ते दोषी आढळून येत असल्यामुळे त्यांचे विरुध्द रुपये १०,०००/- शास्ती लादण्यात येत आहे. सदरच्या शास्तीची रक्कम त्यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आंत "००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)" या लेखाशिर्षामध्ये जमा करावी.

३) अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ९.११.२००६ च्या अर्जाप्रमाणे विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नसल्यामुळे त्यांना मा.उच्च न्यायालयामध्ये तसेच शालेय न्यायाधिकरणामध्ये कागदपत्रे दाखल करता आली नसल्यामुळे रुपये ५,०००/- ची नुकसान भरपाई संस्थेने हा निर्णय झाल्यापासून द्यावी.

४) सदरच्या निर्णयाची एक प्रत सहाय्यक धर्मदाय आयुक्त, बुलढाणा विभाग, बुलढाणा यांच्याकडे स्वतंत्रपणे पोष्टाने पाठविण्यात यावी.

५) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**दिनांक :- २८.७.२००८**

HIREKHAN/BHUJI/४७१-४७४/२८.७.२००८

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १८१९/२००७.

सौ. मलेका तरन्नुम रिजवान खान,
वार्ड क्रमांक १६, (नविन) मक्का मस्जिद जवळ,
लक्ष्मीनगर, जुने शहर, अकोला - ४४४ ००२. ..... **अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

डॉ. जी. पी. राणे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा,
जिल्हा उपायुक्त, पशुसंवर्धन,
जि. अकोला.

डॉ. निता गोडबोले,
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक आयुक्त, पशुसंवर्धन
विभागीय रोग अन्वेषण प्रयोगशाळा,
जि. अकोला. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २९.७.२००८)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २५.५.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २९.७.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ती व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ती यांनी दिनांक २८.२.२००७ रोजी सहाय्यक आयुक्त, पशुसंवर्धन (गुरे व स्तनदाह) विभागीय रोग अन्वेषण प्रयोगशाळा, अकोला यांच्याकडे शासकीय माहिती अधिकारी म्हणून सन १९९२ ते आजपर्यंत (२८.२.२००७) पर्यंत खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. १) रिजवान खान, परिचर, यांचे कालबध्द पदोन्नती प्रस्ताव गोपनीय अहवालासह आपण पाठविणार किंवा कसे ? माहिती अधिकारा अंतर्गत प्रादेशिक सहआयुक्त, अमरावती यांनी कळविले की, कालबध्द पदोन्नती प्रस्ताव गोपनीय अहवालासह

... २

अद्यापपर्यंत प्राप्त झालेला नाही असे कळविले आहे. २) प्रादेशिक सहआयुक्त, प.सं. अमरावती यांना वार्षिक वेतनवाढ बाबत माहिती मागविली असता रिजवान खान, परिचर यांची सन २००२ पासून त्यांच्या कार्यालयाकडून वार्षिक वेतनवाढ रोखण्ययात आली नाही असे कळविले. आपल्या कार्यालयाने सन २००२ पासून वार्षिक वेतनवाढ कां रोखली किंवा कसे माहिती द्यावी. ३) खान यांचे सेवापट जन्मतारखेचे पडताळणीसाठी मुळ कागदपत्रासह कोणत्या कार्यालयास पाठविले किंवा कसे. पाठविलेल्या पत्रांची सत्यप्रत पाठवावी. ४) खान यांचे कोणत्या वर्षाचे पासून वार्षिक वेतनवाढ रोखण्यात आले. कोणत्या नियमा अंतर्गत रोखण्यात आले ? ५) रजा मंजूरी प्रलंबित आहे किंवा कसे ? ६) खान परिचर हे लिंगी (वाई) पंचायत समिती, दिग्रस येथे बदलून गेल्यावर अंतीम वेतन प्रमाणपत्र केव्हा पाठविले त्यांचे क्रमांक व दिनांक द्यावा. तत्काळ/उशिरा पाठविले सविस्तर माहिती द्यावी. ७) खान आपले येथे कार्यरत असतांना सेवा पुस्तकाची दुय्यम प्रत मिळणेबाबत किती वेळा अर्ज केले त्याचे दिनांक, सन सविस्तर माहिती द्यावी. दुय्यम प्रत पुरविण्यात आली काय ? न देण्याचे कारणे दयावे. ८) खान यांनी गृह कर्ज खात्याकडून मिळणेबाबत प्रादेशिक कार्यालयास अर्ज केले काय कधी केले ? अर्ज मंजूर झाले काय ? ९) खान यांनी पदोन्नती मिळणेबाबत खात्याकडे अर्ज केले काय ? कोणकोणत्या पदासाठी अर्ज केले ? अर्ज खात्याकडे पाठविले ? १०) प्रयोगशाळा सहाय्यक पदावर पदोन्नती देणेबाबत चुतर्थश्रेणी कर्मचारी ज्यांनी कमीत कमी ३ वर्षे प्रयोगशाळा मध्ये काम केले अशी माहिती खात्याने कधी कधी मागितली त्याची सत्यप्रती दयावी. आपल्या कार्यालयाने माहिती कशी दिली त्याचीही सत्यप्रती दयावी. ११) माझ्या माहिती प्रमाणे माझे पती श्री. रिजवान खान, परिचर प्रयोशाळा सहाय्यक पदासाठी पात्र होते त्यांना पदोन्नती पासून डावलण्यात आले तेंव्हा माहिती अचूक दयावी. १२) आपल्या लिपिकाने हस्तपोस्ट टपाल घेतली साहेबाला दाखविल्याशिवाय घेत नाही. अशी अट काय ? माहिती द्यावी. यापुढे ताकीद देण्यात येणार किंवा कसे टपाल घेणे बाबत ? सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २.४.२००७ रोजी अपील दाखल केले. प्रथम अपीलाचे अनुषंगाने दिनांक १५.५.२००७ रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांनी दिनांक २८.२.२००७ रोजी अर्ज दाखल केला सहपत्र अ मधील अर्ज हा जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात प्राप्त झालेला नाही असे जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे. त्याकरिता त्यांनी आवक नोंदवहीची तपासणी केलेली आहे व तसेच आवक नोंदवही सुध्दा आयोगाचे निदर्शनास आणली व त्यात अर्जाप्रमाणे म्हणणे आहे याबद्यलची नोंद दिसून येत नाही व अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांनी सदरचा अर्ज हा यु.पी.सी.ने पाठविलेला आहे. परंतु त्याबद्यलचे पोस्टाचे प्रमाणपत्र त्यांनी दाखल केलेले नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांच्या विलंबाचे मुद्यांच्या संदर्भात विचार करता येत नाही. प्रथम अपीलाचे अनुषंगाने प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिनांक २६.४.२००७ रोजी अपीलकर्ता यांनी यापुर्वी कोणत्या माहिती अधिकाऱ्यांकडे अर्ज सादर केला होता त्याची प्रत या कार्यालयाकडे द्यावी. संबंधित माहिती अधिकाऱ्यांकडून कोणतीही कार्यवाही न झाल्यास अपीलीय अधिकाऱ्याकडे दाखल करणे क्रमप्राप्त असताना आपण सरळ तक्रार अपीलीय अधिकाऱ्याकडे केल्याचे दिसून येते. त्यामुळे आपले अर्ज स्विकारता येणार नाही. तरी आपण आपला अर्ज संबंधित माहिती अधिकाऱ्याकडे सादर करावा असे कळविलेले दिसून येते. सदरच्या पत्राची प्रतिलिपी सहाय्यक आयुक्त, पशुसंवर्धन विभागीय रोग अन्वेषण प्रयोगशाळा, अकोला यांना दिलेली दिसून येते. त्याप्रमाणे पुन्हा दिनांक ११.४.२००७ रोजी जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन, अकोला यांनी सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन यांना सदरच्या अपीलाचे संदर्भामध्ये हे पत्र भेटताच दोन दिवसात सदरच्या प्रकरणात अहवाल या कार्यालयास सादर करावा असेही कळविलेले दिसून येते. त्याप्रमाणे दिनांक २४.४.२००७ रोजी सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन (गुरु व स्तनदाह) विभागीय रोग अन्वेषण प्रयोगशाळा, अकोला यांनी जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, अकोला यांना अपीलकर्ता यांच्या १२ मुद्यांच्या संदर्भामध्ये अहवाल सादर केलेला दिसून येतो व त्याप्रमाणे दिनांक १५.५.२००७ रोजी राज्य जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते व त्याबाबत अपीलकर्ता यांनी माहिती उपलब्ध झाली आहे. परंतु मुद्या क्रमांक १, ४ व ६ च्या संदर्भामध्ये त्यांना अपूर्ण माहिती उपलब्ध झाली आहे ती त्यांना पूर्ण माहिती मिळावी व त्याकरिता त्यांनी सदरचे अपील दाखल केलेले आहे. मुद्या क्रमांक १, ४ व ६ चे संदर्भात जी अपूर्ण माहिती अपीलकर्ता यांना उपलब्ध झाली आहे असे त्यांचे म्हणणे आहे त्याकरिता त्यांनी जनमाहिती अधिकारी यांच्याकडे त्याबाबतचा लेखी खुलासा करणे संयुक्तिक राहील व त्याप्रमाणे छायांकित प्रतीच्या स्वरुपात माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

... ४

## **<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ३ दिवसाचे आंत अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी यांच्याकडे मुद्या क्रमांक १, ४ व ६ चे संदर्भामध्ये खुलासा केल्यावर जनमाहिती अधिकारी यांनी ७ दिवसांचे आंत अपीलकर्ता यांना विनामुल्य माहिती उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**दिनांक :- २९.७.२००८**

HIREKHAN/BHUJI/४७५-४७८/२९.७.२००८

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १८२१/२००७.

डॉ.सैफिद्दीन अहमद,
रहिम मार्केट, १ ला माळा,
वाशिम स्टँड, अकोला - ४४४ ००२. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा,
सचिव,
होमोपॅथीक मेडिकल कॉलेज,
अकोट रोड, जि. अकोला.

जनमाहिती अधिकारी तथा
होमोपॅथीक मेडिकल कॉलेज,
अकोट रोड, जि. अकोला. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २९.७.२००८)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १९.४.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २९.७.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत व उत्तरवादी विना अनुमतीने गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २६.२.२००७ रोजी माहिती अधिकारी होमोपॅथीक मेडिकल कॉलेज,अकोट रोड, जि. अकोला यांच्याकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. I) Certified copy of Service Book of Dr. Saifuddin Ahmad. II) Certified copy of Appointment letter of Dr. S. U. Tiwari as approved Principal. III) Certified copy of order of Management by which Dr. S. U. Tiwari issued suspension order and charge-sheet to Dr. Saifuddin Ahmad by the competent authority/Homoeopathic Education

... २

Society, regd.no. F१ in Homoeopathic Medical College, Akot Road, Akola. IV) Certified copy of appointment letter of Advocate K. S. Goenka as enquiry officer (E.O.) of enquiry no. ०१/२००४ by the competent authority/Homoeopathic Education Society, regd. no. F१ in Homoeopathic Medical College, Akot Road, Akola. V) Certified copy of appointment letter of Shri. S. V. Dharasukar as Presenting officer (P.O.) of enquiry no. ०१/२००४ by the competent authority/ Homoeopathic Education Society, regd. no. F१ in Homoeopathic Medical College, Akot Road, Akola. VI) What are the reasons for non payment of full suspension allowance from june, २००४ till today that is at the rate of ४०२७८/- though the Maharashtra University of Health Science directed the Management dated २०.१०.२००६ and time again copies of the same. VII) A cheque no. २७७०७१, rupees ३२६९५/- & dated २४.१०.२००६ handed over to me on १४.१२.२००६, please supply the information under what heads above amount is paid. सदरची माहिती पोष्टाने घेणार असे नमुद केलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक २९.३.२००७ रोजी संस्थेचे सचिव, डॉ. डि. एस. चिंचोळकर यांचेकडे प्रथम अपीलीय अधिकारी म्हणून प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचे संदर्भात सुध्दा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी निर्णय दिलेला नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. द्वितीय अपीलाचे सुनावणीकरिता राज्य माहिती आयोग, खंडपीठ, नागपूर कार्यालयामधील दिनांक ४.६.२००८ रोजी कागदपत्रे दाखल करण्याकरिता व दिनांक २०.६.२००८ ची तारीख देण्यात आली होती. परंतु प्रथम अपीलीय अधिकारी किंवा जनमाहिती अधिकारी यांनी आयोगाचे कार्यालयात कोणतेही कागदपत्रे दाखल केलेली नाही. त्यानंतर सुनावणीच्या तारखेकरिता दिनांक २४.६.२००८ रोजी अपीलकर्ता व उत्तरवादी यांना पत्रे निर्गमित केले होते. त्यानुसार अपीलकर्ता हे हजर आहेत. परंतु त्यानुसार उत्तरवादी गैरहजर आहेत.

४. अपीलकर्ता यांनी होमोपॅथीक मेडिकल कॉलेज, होमोपॅथीक एज्युकेशन सोसायटी, अकोट रोड, जि. अकोला यांना शासनाकडून अनुदान मिळत होते व तसेच शासनाकडून ९९ वर्षाच्या करारावर भाडे तत्वावर जमीन मिळालेली असल्यामुळे सदरची संस्था व कॉलेज माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २ (घ) मधील सार्वजनिक प्राधिकरण या व्याख्येत येत असल्यामुळे सदरच्या अधिनियमाच्या तरतुदी महाविद्यालयास लागू आहेत असे त्यांनी सांगितले. असे असल्यास सदरच्या महाविद्यालयाने जनमाहिती अधिकारी यांची नियुक्ती करावयास पाहिजे. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांची नियुक्ती करावयास पाहिजे. परंतु तसे न करता अधिनियमाचे तरतुदीप्रमाणे सार्वजनिक प्राधिकारी यांचे विरुध्द आयोगास कारवाई करता येते. तसेच अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे महाविद्यालयाचे जनमाहिती अधिकारी किंवा जबाबदार अधिकारी हे अधिनियमाचे कलम २० प्रमाणे शास्तीस पात्र आहेत व त्यामुळे त्यांचे विरुध्द शास्ती लादणे हे आवश्यक दिसून येत आहे. परंतु कलम २०(१) प्रमाणे शास्ती लादण्याचे पूर्वी संबंधित जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेणे बंधनकारक असल्यामुळे त्यांचा खुलासा मागविणे हे संयुक्तिक राहिल. तसेच अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणे हे सुध्दा आवश्यक असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून त्यांच्या दिनांक २८.२.२००७ च्या अर्जाप्रमाणे हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसाचे आंत छायांकित प्रतीच्या स्वरुपात विनामुल्य माहिती उपलब्ध करुन द्यावी. सदरची माहिती ३० दिवसाचे आंत उपलब्ध करुन न दिल्यास संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य किंवा जनमाहिती अधिकारी यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे रुपये २५०००/- ची शास्ती कां लादू नये याबद्यलचा खुलासा आयोगाकडे हा निर्णय मिळाल्यापासून २० दिवसांचे आंत सादर करावा अन्यथा शास्ती कायम होईल.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**दिनांक :- २९.७.२००८**

HIREKHAN/BHUJI/४७९-४८१/२९.७.२००८

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १८२५/२००७.

श्री. दिनकर किसन नाफडे,
मु. पो. दसरखेड,
तालुका मलकापूर,
जिल्हा बुलढाणा - ४४३ १०१. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा,
सचिव,
श्रीराम शिक्षण संस्था, कौलखेडा,
जि. अकोला.

श्री. गजानन चौधरी,
जनमाहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक,
श्रीराम विद्यालय, कौलखेडा,
खेताननगर, जि. अकोला. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३०.७.२००८)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २६.४.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३०.७.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व माहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री. वामन गोविंदराव ओहोळ हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १७.११.२००६ रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्रीराम विद्यालय यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. १) मा.शाळा व्यवस्थापनाने, मा.मुख्याध्यापकांनी, मा.शाळा न्यायाधिकरणात तसेच मा.उच्च न्यायालयात सादर केलेल्या माहितीची सत्य असत्यता पडताळणीसाठी माहिती प्रपत्रे मिळणेबाबत. २) माहिती आपण दिलेल्या सत्र १९८३-८४ पासून जून

... २

१० महिन्यापर्यंतच्या शिक्षकांच्या हजेरी पत्रकातील तसेच १९८३-८४ पासून सत्र १९८९-९० पर्यंतच्या सेवाजेष्ठता यादयांमधील माहितीप्रमाणे श्री. एस. एम. देशमुख, श्री. ए. डी. गव्हाळे, सौ. पी. एम. जडी, श्री. आर. एस. खेडकर, यांच्या मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका म्हणून सहया असलेले सत्र १९८३-८४ पासून सत्र १९९०-९१ पर्यंतचे आपल्या शाळेतील शिक्षक भरतीचे रोष्टर/बिंदु नामावली. ३) श्री.गजानन ओंकारराव चौधरी यांच्या इयत्ता दहावी, बारावी, बी.ए. परीक्षेच्या गुणपत्रिका आणि सत्र १९८३-८४ पासून सत्र १९८९-९० पर्यंतचे नेमणूक हूकूम. वरील सर्व प्रपत्रांच्या शक्यतो आपणाशिवाय इतरांनी साक्षांकित केलेल्या प्रती पाठविलेल्या प्रतींच्या उल्लेखासह कव्हरींग लेटर सोबत पाठवाव्यात. सदर माहिती नोंदणीकृत डाकेने घेणार असे नमुद केलेले आहे. झेरॉक्स खर्च अधिक डाक खर्चासाठी रुपये १२०/- ची मनीऑर्डर पाठवित आहे असे नमुद केलेले आहे. तसेच टिपमध्ये उपरोक्त पैकी जी प्रपत्रे/कागदपत्रे आपण देण्यास असमर्थ असाल त्याची कारण मिमांसा मुदतीत लेखी कळवून, बाकी प्रमाणित प्रती मुदतीत द्याव्यात, आवश्यक खर्च मी आताच भरण्यास तयार आहे. पत्र आपणास लेखी दयावे म्हणजे त्वरित रकमेचा भरणा करु शकेल असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक ५.१२.२००६ रोजी रजिष्टर पोस्टाने माहिती पाठविली होती. त्यात कोरे कागदपत्रे प्राप्त झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १६.१.२००७ रोजी संस्थेचे सचिव, श्रीराम शिक्षण संस्था, खेताननगर, अकोला यांच्याकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचे अनुषंगाने दिनांक ३.१.२००७ रोजी सद्या निवडणूकीची गडबड चालू आहे त्यामुळे वेळ मिळत नाही. शाळेतील कर्मचारी आजारी असल्यामुळे विलंब होत आहे. तरी आपणास हवी असलेल्या माहितीबाबत कार्यवाही करुन या महिन्याच्या शेवटी कळविण्यात येईल. यापूर्वी आपण पुष्कळवेळा माहिती मागितलेली आहे ती दिलेली आहे. असे सचिव तथा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कळविलेले दिसून येते. त्यानंतर दिनांक १९.२.२००७ रोजी संदर्भ क्रमांक २ चे पत्रावर तारीख चूकीने पडलेली होती. त्याबद्यल क्षमस्व, सध्या आम्हाला न्यायालयाचे कामामुळे पत्र देण्यास विलंब होत आहे. वेळ मिळाल्या बरोबर आपल्या प्रकरणावर सुनावणी घेऊन पुढील कार्यवाही करण्यात येईल असे कळविण्यात आल्याचे दिसते. दिनांक ८.३.२००७ रोजी मुख्याध्यापक तसेच अपीलकर्ता यांना अपीलकर्ता यांच्या दिनांक १६.१.२००७ च्या अर्जानुसार या कार्यालयाकडे अपील अर्ज केला आहे. त्यानुसार दिनांक ३०.३.२००७ मंगळवारला श्री.नाफडे यांचे प्रकरणी

सुनावणी संस्थेचे कार्यालय द्वारा श्री मोहोड यांचे घर, श्रीराम मंदिराजवळ, खेताननगर, कौलखेड, अकोला येथे ठेवली आहे. तेंव्हा या प्रकरणी आपणाकडे असलेली सर्व कागदपत्रे घेऊन दिनांक २०.३.२००७ ला सकाळी ११:०० वाजता सुनावणीसाठी जातीने हजर राहावे. अन्यथा एकतर्फी निर्णय घेण्यात येईल असे कळविलेले दिसते. दिनांक २९.३.२००७ रोजी अपीलकर्ता यांना संदर्भीय पत्र क्रमांक २ नुसार आपणास दिनांक २०.३.२००७ ला आपल्या अपील अर्जाच्या सुनावणीसाठी बोलाविण्यात आले होते. मुख्याध्यापक, श्रीराम विद्यालय, खेताननगर, अकोला यांनी सुनावणीच्या वेळी आपल्या दिनांक १७.११.२००६ च्या अर्जानुसार सर्व कागदपत्रे आपणास रजिष्टर पोष्टाने पोचपावतीसह पाठविल्याचे पूरावे सादर केलेत. तसेच शाळेचे वरिष्ठ लिपिक, श्री. अ. रा. सावरकर यांनी स्वतः सर्व दस्तावेज रजिष्टर पोष्टाने पाठविल्याचे कबूल केले. यासर्व पूराव्यावरुन तसेच याप्रसंगी आपली बाजू मांडण्यासाठी आपणास संधी दिली असतांनाही आपण कोणतीही सुचना न देता गैरहजर राहीलात यावरुन हेच सिध्द होते की, आपण फक्त शाळेला बदनाम व त्रास देण्याच्या दृष्टीने उपरोक्त अपील केले आहे करिता आपले अपील निकाली काढण्यात येत आहे. असे कळविलेले दिसून येते. तसेच आपले दिनांक २०.३.२००७ चे पत्र मिळाले असेही दिसून येते. त्यावर अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.३.२००७ रोजी आपल्या दिनांक ८.३.२००७ च्या पत्रानुसार मी दिनांक २०.३.२००७ ला सकाळी ठिक ११:०० वाजता खेताननगर, कौलखेड, अकोला स्थित श्री. मोहोड यांचे राहते घरात असलेल्या आपल्या संस्थेच्या कार्यालयासमोर सुनावणीसाठी हजर झालो असता आपल्या संस्थेच्या कार्यालयाला कुलूप होते, आपले संस्थेचे कार्यालय बंद होते. त्यामुळे सुनावणी होऊ शकली नाही. तरी आपण सुनावणीसाठी कां गैरहजर राहिलात याबाबत योग्य खुलासा दयावा व पुढील कार्यवाही करावी असे कळविलेले दिसून येते व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगाकडे खुलासा दाखल केला आहे. सदरच्या खुलाश्यामध्ये अपीलकर्ता यांना कोरेकागद पाठविले नसून मागितलेली माहिती प्रपत्रे पाठविण्यात आली होती. तसेच प्रथम अपीलाची सुनावणीस संस्थेच्या कार्यालयात दिवसभर हजर होतो. कुलुप असण्याचे कारणच नाही कारण त्यांचे राहात्या घरातच कार्यालय आहे व घरांत नेहमीच कुटुंबातील अनेक सदस्यांपैकी कुणी तरी घरी असतोच. परंतु अपीलकर्ता हजर झाले नाही असा खुलासा दाखल केलेला आहे. तसेच आजही माहिती उपलब्ध करुन

देण्यास तयार आहे असे त्यांनी त्यांच्या खुलाश्यामध्ये केलेले आहे. दिनांक ५.१२.२००६ रोजी मुख्याध्यापक यांनी अपीलकर्ता यांना पाठविलेल्या पत्राच्या छायांकित प्रती दाखल केलेल्या दिसून येतात. संदर्भ दिनांक १७.११.२००६ , दिनांक ४.१.२००६, दिनांक २६.४.२००७ चा पत्र व्यवहार दिसून येतो. "आपण केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ नुसार माहिती मागितली आले. यापैकी बहुतेक सर्वच माहिती आपणास यापूर्वी पाठविण्यात आली असून सुध्दा आपण माहिती अधिकाराचा गैरवापर करुन माझा मानसिक छळ करत आहात असे असूनही केवळ सहानुभूतीपूर्वक विचार करुन शाळेच्या परिरक्षेत असलेली सर्व कागदपत्रे आपणास पुन्हा पाठविण्यात येत आहे" असे कळविलेले दिसून येते. तसेच मा.उच्च न्यायालय, नागपूर बेंच, नागपूर यांच्याकडे दाखल केलेले याचिका क्र. ३०४२/१९९४ याचिकाकर्ता श्री.दिनकर किसन नाफडे विरुध्द श्रीराम शिक्षण संस्थेच्या निर्णयाची प्रत दाखल केलेली आहे. सदरच्या निर्णयामध्ये अपीलकर्ता यांनी शालेय न्यायाधिकरणाचे विरुध्द असलेली याचिका खारिज केलेली दिसून येते. अपीलकर्ता यांनी सुध्दा राज्य माहिती आयोगाकडे खालील प्रमाणे कागदपत्रे दाखल केलेली दिसून येतात. मा.शिक्षण उपसंचालक, अमरावती विभाग, अमरावती यांनी अपीलकर्ता यांना दिनांक १६.३.२००८ रोजी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ यांचा दिनांक ३.३.२००८ च्या पत्राच्या संदर्भात उपलब्ध करुन दिलेल्या माहितीचे छायाकिंत प्रत दाखल केलेली आहे. त्यानंतर शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, अकोला यांनी दिनांक ६.७.१९९१ रोजी मुख्याध्यापक, श्रीराम विद्यालय, कौलखेड, अकोला यांना श्री. गजानन ओंकारराव चौधरी, सहाय्यक शिक्षक यांच्या संदर्भात दिलेल्या आदेशाची प्रत सादर केलेली दिसून येते. यानंतर महाराष्ट्र शासन जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र, अकोला याच्या दिनांक ३१.२.२००६ च्या पत्राची प्रत दाखल केली. दिनांक ६.२.२००६ च्या विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, अकोला यांनी अपीलकर्ता त्यांच्या दिनांक २७.१.२००६ च्या अर्जातील मागितलेली माहिती बद्यल पत्राची छायांकिंत प्रत दाखल केलेली आहे. दिनांक ७.३.२००६ रोजी सुधाकरराव नाईक कला, विज्ञान व उमाशंकर खेतान वाणिज्य महाविद्यालय, अकोला यांनी अपीलकर्ता यांनी इतरही अनेक कागदपत्रे दाखल केलेली आहेत. परंतु सदरच्या कागदपत्राच्या संदर्भामध्ये कोणत्याही प्रकारचा विचार हा राज्य माहिती आयोगास करता येत नाही. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ प्रमाणे माहिती उपलब्ध करुन देणे एवढाच मर्यादित उद्येश हा अधिनियमात आहे व त्यामुळे

अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती त्यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे. त्याकरिता अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे जरी जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे असेल व त्याकरिता वस्तुस्थिती त्यांनी १००/- रुपयांच्या सत्यप्रतिज्ञानत्रावर सादर केली असली तरी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक असल्यामुळे व जनमाहिती अधिकारी यांची तशी तयारी असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दिनांक १७.११.२००६ च्या अर्जाप्रमाणे मुद्येनिहाय मागितलेल्या माहितीची छायांकित प्रतीच्या स्वरुपात विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी व त्याबद्यलची पोच घेण्यात यावी.

२) अपीलकर्ता यांना जनमाहिती अधिकारी यांनी माहितीच्या खर्चाचे भरणा रुपये १२०/- ही परत करावे. सदरची कार्यवाही ही हा निर्णय मिळाल्यापासून ३ दिवसाचे आंत करावी अन्यथा जनमाहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहतील.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**दिनांक :- ३०.७.२००८**

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १८२८/२००७.

श्री. सदाशिव भगवान महाले,
मु. पो. कळंबा महाली,
ता. जि. वाशिम. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा,
उपविभागीय अधिकारी,
जि. वाशिम.

श्री. एस. पी. वायाळ,
जनमाहिती अधिकारी तथा
तहसीलदार,
वाशिम. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३०.७.२००८)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २६.४.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३०.७.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व माहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी विना अनुमतीने गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ४.१२.२००६ रोजी शासकीय जनमाहिती अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी, वाशिम यांच्या कार्यालयामध्ये लोकशाही दिन दिनांक १.२.२००६ रोजीच्या अर्जदाराचे तक्रारीबाबत माहिती मिळणेबाबत. माहितीचा कालावधी दिनांक ३.७.२००६ ते दिनांक १.९.२००६ असा आहे. माहितीचे वर्णन अर्जदाराचे दिनांक ३.७.२००६ रोजी मुसळधार पाऊस झाला. त्यामुळे नदीला आलेल्या महापुरामुळे अर्जदाराचे घराचे अतोनात नुकसान झाले आहे. त्याबद्यल अर्जदारास शासनाच्या निकषाप्रमाणे आर्थिक सहाय्य तहसील कार्यालय, वाशिम कडून देण्यात आले नाही म्हणून अर्जदाराने तहसीलदार, वाशिम यांना

... २

दिनांक १०.७.२००६ रोजी विनंती अर्ज केला तरी सहाय्य दिले नाही. त्यामुळे अर्जदाराने लोकशाही दिनी दिनांक १.९.२००६ रोजी तक्रार दिली त्यामध्ये जिल्हाधिकारी यांनी तहसीलदार, वाशिम यांना उत्तर देण्याचे आदेश दिले. अद्याप तहसीलदार, वाशिम यांनी उत्तरही दिले नाही व आर्थिक सहाय्यही दिले नाही. म्हणून तहसील कार्यालयातर्फे झालेल्या कार्यवाहीचा व उत्तराची माहिती अर्जदारास देण्यात यावी. माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. परंतु सदरचा अर्ज हा जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये दिल्याची पोच दिसून येत नाही. मात्र अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक ३१.१.२००७ रोजी आयुक्त, अमरावती (महसूल विभाग) यांच्याकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. त्याप्रमाणे दिनांक १५.३.२००७ रोजी उपविभागीय अधिकारी यांचे कार्यालयात उपस्थित राहावे असे अपीलकर्ता यांना कळविल्याचे दिसून येते. परंतु दिनांक २६.३.२००७ रोजी अपीलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत माहिती अधिकारी तथा तहसीलदार, वाशिम यांचे कार्यालयाकडे माहितीचा अधिकार अंतर्गत अर्ज न केल्यामुळे अपीलीय अधिकारी यांनी त्यांची अपील खारीज करुन त्याबाबत झालेला निर्णय अपीलार्थी यांना दिनांक २६.३.२००७ रोजी कळविला होता असे दिसून येते व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांनी त्यांच्या द्वितीय अपील मेमोमध्ये राज्य जनमाहिती अधिकाऱ्यांचा तपशिल म्हणून मा.जिल्हाधिकारी, वाशिम, मा. तहसीलदार, वाशिम असा तपशिल दिलेला आहे. तसेच मा. जिल्हाधिकारी, वाशिम यांना तहसीलदार, वाशिम यांनी लोकशाही दिन दिनांक ५.१२.२००६ तसेच माहितीचा अधिकाराचा अर्ज, त्यामध्ये तहसीलदार, वाशिम यांनी कोणतीही जबाब अर्जदाराच्या अर्जावरुन न दिल्यामुळे व पुरग्रस्त म्हणून अर्जदारास डावलल्याबद्यल. तसेच तहसीलदार यांनी मा.जिल्हाधिकारी यांना कोणतीही माहिती न पुरविल्याबद्यल व तसेच जिल्हाधिकारी, वाशिम यांनी लोकशाही दिनातील अर्जदाराच्या अर्जावर व माहितीचे अधिकारातील अर्जावर कोणताही आदेश न दिल्यामुळे व आयुक्त, अमरावती यांनी अपीलात कोणताही निर्णय न दिल्यामुळे अपीलार्थी हे अपील दाखल करीत आहे असे नमुद केलेले आहे. अपीलकर्ता यांची थोडक्यात माहिती अशी आहे की, मुसळधार पावसाने अर्जदाराचे घरातील जिवनावश्यक वस्तु, अन्नधान्य, शेतीपयोगी अवजारे व बांधकाम करण्याचे साहित्य पुरात वाहून गेले व अन्नधान्याचे नुकसान झाले. नुकसानीचा अहवाल

... ३

तलाठी कळंबा महाली यांनी तहसीलदार, वाशिम यांना सादर केला. अपीलार्थीचे शेजारी लोकांना तहसीलदार, वाशिम यांनी पुरग्रस्त निधीतून अनुदान वाटप केले. परंतु अपीलार्थीस अनुदान वाटप केले नाही व त्यामुळेच अपीलकर्ता यांनी लोकशाही दिनात तक्रार अर्ज सादर करुन त्यासोबत माहितीचा अर्ज हा जिल्हाधिकारी, वाशिम यांना दिला व त्यामुळे सदरच्या अर्जाचे संदर्भामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६ प्रमाणे अर्ज दिलेला आहे त्याची नोंद जिल्हाधिकारी कार्यालयात झालेली दिसून येत नाही. सदरचा अर्ज हा तहसीलदार यांना उद्येशून नसल्यामुळे तहसील कार्यालयात त्याची नोंद झालेली दिसून येत नाही व सदरचा अर्ज हा अनुत्तरीत राहिला आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) प्रमाणे अर्ज हा रितसर जिल्हाधिकारी कार्यालयात द्यावयाचा असतो. लोकशाही दिनात अशा प्रकारचा अर्ज दिल्यास त्याची दखल घेतली जाईल असे नाही व त्यामुळेच अपीलकर्ता यांनी विभागीय आयुक्त, अमरावती यांच्याकडे अपील केल्यानंतर विभागीय आयुक्त हे सुध्दा अपीलीय अधिकारी नसल्यामुळे ते उपविभागीय अधिकारी यांचेकडे हस्तांतरण करण्यात आलेला दिसतो. कोणतेही अपील हे माहितीचा अर्ज हा जनमाहिती अधिकारी यांच्याकडे केल्यानंतरच करता येते व त्यामुळेच तहसीलदार तथा जनमाहिती अधिकारी यांच्याकडे कोणताच अर्ज केलेला नसल्यामुळे उपविभागीय अधिकारी यांचेकडे वर नमुद केल्याप्रमाणे निर्णय दिलेला दिसून येतो. अपीलकर्ता यांची माहिती ही तहसील कार्यालयात असल्यामुळे त्यांनी जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार यांच्याकडे अर्ज केला असता तर त्यांना त्यांची नुकसान भरपाईच्या संदर्भामध्ये काय कार्यवाही झाली ही माहिती मिळाली असती. राज्य माहिती आयोगाकडे सुध्दा दाखल केलेल्या द्वितीय अपीलात वर नमुद केल्याप्रमाणे त्यांचेच म्हणणे आहे की, माहिती अधिकाराचा अर्ज हा त्यांनी लोकशाही दिनात दिला होता व तो जिल्हाधिकारी यांच्याकडे दिला व त्यामुळे राज्य माहिती आयोगास सुध्दा माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता कोणत्याही अधिकाऱ्यास आदेश देता येत नाही. असे असले तरी त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या प्रतीच्या संदर्भामध्ये जरी ते जिल्हाधिकारी यांना संबोधून असले तरी तहसीलदार, वाशिम यांनी त्यांच्या दिनांक ४.१२.२००६ च्या अर्जाप्रमाणे माहिती ही शासन निर्णयाची प्रत उपलब्ध करुन देणे हे संयुक्तिक राहील.

... ४

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांना नैसर्गिक आपत्तीच्या संदर्भामध्ये सन २००६ मधील शासन निर्णयाची प्रत हा निर्णय मिळाल्या पासून ३ दिवसांचे आंत विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- ३०.७.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/४८७-४९०/३०.७.२००८

**राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १८२९/२००७.**

श्री. प्रभाकर बलराम जाधव,
प्लॉट नं. ५, दत्त कॉलोनी,
गोरक्षण रोड, पो. गांधीनगर,
अकोला - ४४४ ००४. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. सी. एस. डहाळकर,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा,
अतिरिक्त जिल्हाधिकारी,
नागपूर.

श्री. सुधाकर कुळमेथे,
जनमाहिती अधिकारी तथा
प्र. भुसंपादन अधिकारी,
नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३१.७.२००८)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २३.५.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३१.७.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता विना अनुमतीने गैरहजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १५.१.२००७ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा भुसंपादन अधिकारी, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर यांच्याकडे भुसंपादना विषयी अर्जाच्या सहपत्रात मागितलेली माहिती खालील प्रमाणे दिसून येते. डॉ.श्रीमती प्रभाताई सपकाळ, अध्यक्ष, कृषक महिला को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी, नागपूर (रजि.नं. एनजीपी/एचएसजी/९२०/१९८०) यांनी नागपूर हद्यीतील मौजा हजारी पहाड, पटवारी हलका

... २

३६(१-२.३) ११.६ एकर मध्ये त्यांची मालकी असल्याने ले आऊट टाकला होता व त्यातील प्लॉट विकले. तसेच त्यांचे या ले-आऊटचे जागेपैकी कांही जागा रिंग रोड करिता वि.भूसंपादन अधिकारी, नागपूर यांनी १९९३ साली जागा संपादित केली होती व शासनाने त्यांना काम्पेनसेशन दिले होते. यासंबंधी खालील मुद्यांवर माहितीचा अधिकार कायदा, २००५ खाली माहिती तात्काळ देण्यात यावी. (१) किती जागा संपादित करण्यात आली होती ? (२) संपादित केल्याने किती प्लॉट बाधीत झाले होते त्यांचे नंबर व एरिया देण्यात यावा. (३) संपादित केलेल्या जागेचे किती किती कॉम्पेनसेशन प्रत्येक प्लॉट धारकास मंजूर करण्यात आले. (४) संपादित केलेल्या जागेचे प्लॉट धारकांना पैसे कश्या पध्दतीने अदा करण्यात आले. रोख अगर चेकने अगर सोसायटी मार्फत पेड करण्यात आले. (५) ले-आऊट नकाशा सोसायटीने आपलेकडे भूसंपादन करतांना दिला होता त्याची एक नक्कल द्यावी. (६) सोसायटी अध्यक्षांनी सहकार अधिकाऱ्यांचे चौकशी दरम्यान असेही तोंडी सांगितल्याचे समजते की, संपूर्ण अभिन्यासाची जागाच संपादित करण्यात आली. हे खरे आहे काय ? (७) भुसंपादन अधिकारी, नागपूर यांनी जागा संपादित केली असल्यास त्या आदेशाची सत्यप्रत देण्यात यावी. (८) १९९३ साली भूअर्जन (भूसंपादन) अधिकारी कोण होते ? सदरच्या शुल्कापोटी रुपये ५०/- चा क्रॉसचेक जोडलेला आहे. तसेच माहिती रजिस्टर पोष्टाने मिळावी असे नमुद केलेले दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक २०.२.२००७ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा उप जिल्हाधिकारी, नागपूर यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ४.४.२००७ रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांच्या दिनांक २९.१.२००७ रोजीच्या सदर अर्जावरील मुद्दे क्रमांक १ ते ८ पर्यंत मुद्येनिहाय उत्तर त्यांना कळवावे. जे मुद्दे त्यांच्या विभागाशी संबंधीत नसतील ते मुद्दे ज्या विभागाशी संबंधीत असतील त्या विभागास रितसर पत्रव्यवहार करुन त्या मुद्यांवरील माहिती अपीलार्थींना कळविण्याकरिता पत्रव्यवहार करण्यात यावा व त्याची एक प्रत अपीलार्थींना पुरविण्यात यावी. अपीलार्थींना सर्व मुद्यांवरील माहिती, माहिती अधिकारी निःशुल्क देतील. माहिती अधिकारी यांनी सदर अपीलातील आदेशाची अंमलबजावणी ही आदेशाच्या दिनांकापासून ३० दिवसाचे आंत करावी असा निर्णय दिलेला आहे असे दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नसल्यामुळे त्यांनी सदरचे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते. द्वितीय अपील मेमोसोबत सहपत्रामध्ये त्यांनी त्यांचे म्हणणे खालील प्रमाणे दिलेले आहे. दिनांक

१५.१.२००७ रोजी आम्ही लेंड अक्वीजीशन ऑफीसर (LAO), नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर यांचे केंद्र शासनाचे माहिती अधिकार अधिनियम, २००५ अन्वये सहपत्र अ (नियम ३) (प्रत जोडली आहे) प्रमाणे अर्जातील कॉलम ३(३) प्रमाणे पाहिजे असलेल्या माहितीचा तपशील (सत्यप्रत जोडली आहे) देऊन माहिती मागितली होती. परंतु दिनांक २०.२.२००७ पर्यंत भूसंपादन अधिकारी, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर कडून काहीच प्रतिसाद न मिळाल्याने दिनांक २०.२.२००७ रोजी आम्ही जोडपत्र ब नियम ५(१) भरुन माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ प्रमाणे उपजिल्हाधिकारी, नागपूर यांचे पहिले अपील सादर केले होते. (प्रत जोडली आहे) मा.अतिरिक्त जिल्हाधिकारी श्री.डहाळकर यांनी आम्हास दिनांक २०.३.२००७ चे पत्र पाठवून अपील प्रकरणी सुनावणीस दिनांक ३०.३.२००७ ला त्यांचे कार्यालयात हजर राहण्यास आदेश पाठविले त्यावर आम्ही दिनांक ३०.३.२००७ रोजी मान्यवरांचे कार्यालयात दुपारी ३:०० वाजता हजर राहिलो (पत्राची प्रत जोडली आहे). परंतु भूसंपादन अधिकारी, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर हे उपस्थित नव्हते. अतिरिक्त जिल्हाधिकारी महोदय यांनी भुसंपादन अधिकारी, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर यांचे कार्यालयातील सिनियर क्लार्क श्री. कोठेकर यांना फोन करुन बोलावून घेऊन सुनावणी केली. तेंव्हा श्री.कोठेकर यांनी सदरची माहिती B & C खात्याकडून मिळेल असे सांगितले. यावर अपीलीय अधिकारी अतिरिक्त जिल्हाधिकारी यांनी श्री. कोठेकर यांना तोंडी आदेश देऊन मागितलेली माहिती देण्यास बजाविले. तसेच दिनांक ४.४.२००७ रोजी आम्ही जिल्हाधिकारी, नागपूर यांनी दिनांक ३०.३.२००७ चे सुनावणीवर RTI अपील क्रमांक १५/२००७ प्रमाणे लिखित आदेश पारित करुन भूसंपादन अधिकारी, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर यांना मागितलेली माहिती देणे आवश्यक होते असे नमूद करुन मुद्येसुद माहिती ३० दिवसात निःशुल्क देण्यास असे आदेश दिले. यानंतरही आम्ही वि.भूसंपादन अधिकारी, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर व अतिरिक्त जिल्हाधिकारी (अपीलीय अधिकारी) याच संबंधी दिनांक ४.४.२००७, दिनांक २६.४.२००७, दिनांक २.५.२००७ व दिनांक २६.४.२००७ प्रमाणे पत्र व्यवहार केला त्याच्याही प्रती जोडल्या आहेत. परंतु आम्हांस भूसंपादन अधिकारी, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर माहिती पाठविली नाही. अतिरिक्त जिल्हाधिकारी, नागपूर (अपीलीय अधिकारी) यांचे आदेशाचे पालन करता आम्हांस त्यांनी त्यांचे पत्र क्र. वि.भू.अ./ना.सु.प्र./का.वि.-१९/२००७ (प्रत जोडली आहे) दिनांक २६.४.२००७ प्रमाणे कळविले की, हजारीपहाड, नागपूर सर्वे नं. २७, २८, २९, ३३, ३४, ३५ व

... ४

३६ (१-२-३) ही जागा सार्वजनिक बांधकाम विभागाने संपादित केली असून हयाबद्यलची माहिती कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, लेडीज क्लब समोर, सिव्हील लाईन, नागपूर यांचे कडून घेण्यास सुचना केल्या. त्यानुसार आम्ही कार्यकारी अभियंता यांचेकडे दिलेल्या पत्त्यावर दिनांक २.५.२००७ रोजी पत्र (प्रत जोडली आहे) पाठवून माहितीची मागणी केली. परंतु आमचे हे पत्र लिफाफ्यासह दिनांक २१.५.२००७ रोजी परत पोष्टामार्फत करण्यात आले. लिफाफ्याची झेरॉक्स प्रत अवलोकनार्थ जोडली आहे. लिफाफ्यावर "सही डिवीजन का पत्ता नही होने से सबब वापस" म्हणून शेरा होता. आम्ही पाठविलेला लिफाफा फाडण्यात येऊन त्यातील पत्र वाचून नंतर लिफाफ्यात ठेवून स्टेपल करुन परत केल्याचे दिसून येते. कार्यकारी अभियंता कार्यालयातील कारकून महोदयाचे काम असावे कारण परत करण्याकरिता आमचा पत्ता आवश्यक होता. कारण आम्ही लिफाफ्यावर पाठविणाराचा पत्ता टाकला नव्हता. तो लिफाफा फाडून त्यांनी मिळविला. असे करण्या ऐवजी त्यांनी संबंधीत कार्यालयाकडे पाठवून आम्हास पत्राची प्रत देऊन आम्हास तिकडे पाठपुरावा करण्यास सांगणे उचित ठरले असते. अशा प्रकारे त्यांनी टाळाटाळ करण्याचे प्रयत्न केले. सदरचा लिफाफा आम्हास दिनांक २१.५.२००७ रोजी मिळाला. या आधी दोन दिवसापूर्वीच म्हणजे दिनांक १८.५.२००७ रोजी आम्हांस श्री. श. गो. तळणीकर, सहाय्यक मुख्य अभियंता (रस्ते) बांधकाम संकूल, सिव्हील लाईन, नागपूर यांचे पत्र क्र. का/प्र.आ./१६७८, दिनांक २६.४.२००७ चे मिळाले. पत्राची प्रत जोडली आहे. पत्रात त्यांनी ही माहिती त्यांचे कार्यालयात उपलब्ध नसून सदरची माहिती कार्यकारी अभियंता, जागतिक बँक प्रकल्प, सिव्हील लाईन, नागपूर यांचेकडे मिळू शकेल असे कळविले. त्यांनी त्यांचे पत्राची प्रत कार्यकारी अभियंता यांना ही पाठविली आहे. अजून पर्यंत म्हणजे दिनांक २३.५.२००७ पर्यंत त्यांचेकडून माहिती अगर काही पत्रही नाही. अशा प्रकारे माहिती अधिकार अधिनियम, २००५ प्रमाणे माहिती देण्यास वि.भूसंपादन अधिकारी, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर व सार्वजनिक बांधकाम विभागाकडून टाळाटाळ व टोलवा टोलवी करण्यात येत असल्याचे स्पष्ट दिसते. याबद्यल अतिरिक्त जिल्हाधिकारी (यातील अपीलीय अधिकारी) नागपूर यांचे कायदेशीर आदेशाची विशेष भूसंपादन अधिकारी, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर व त्यांचे वरिष्ठ लिपिक श्री. कोठेकर यांनी उघड उघड अवहेलना केली आहे. वि.भूसंपादन अधिकारी, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर यांनी ही सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता, नागपूर यांचा पत्ताही चुकीचा देऊन आमची दिशाभूल

केली आहे. त्यामुळे वर नमुद प्रमाणे आमचे पत्र व लिफाफा दिनांक २.५.२००७ चा परत पाठविण्यात आला. यापूर्वीही वि.भूसंपादन अधिकारी, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर यांनी त्यांचे पत्र क्रमांक क.वि.भू.सं.अ./ना.सु.प्र./का.वि./१८/२००७, दिनांक २१.३.२००७ मध्येही सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पत्ता दिला नव्हता. (प्रत जोडली आहे) आज चार महिन्याचे वर होऊनही आम्हास माहिती मिळाली नाही. यात कांही तरी संशयास्पद असल्याचे दिसून येते. प्रार्थना :- १) तरी आपले कडे नम्र विनंती आहे की, आवश्यक मागितलेली माहिती आम्हांस विना विलंब पुरविण्यास संबंधित अधिकारी यांना आदेश देण्यात यावी. २) वि. भूसंपादन अधिकारी, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर व त्यांचे वरिष्ठ लिपिक श्री.कोठेकर आणि कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, लेडीज क्लब समोर, सिव्हील लाईन, नागपूर यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ व १९ प्रमाणे दंडात्मक कार्यवाही होणेस विनंती आहे.

३. अपीलकर्ता यांच्या दिनांक २९.१.२००७ च्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २१.३.२००७ रोजी विशेष भूसंपादन अधिकारी, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर यांनी सर्व्हे क्रमांक २७, २८, २९, ३३, ३४, ३५ व ३६ (१, २, ३) मौजा हजारीपहाड येथील जमीन रिंगरोड करिता अधिग्रहीत करण्यात आलेली आहे. रिंगरोड करिता संपादीत करण्याचे प्रकरण इमारत व बांधकाम विभाग, (पी.डब्ल्यू.डी.विभाग) नागपूर, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे हाताळली जातात. तेंव्हा विषयांकित प्रकरणी माहिती संबंधित विभागाशी संपर्क साधून प्राप्त करता येईल. आपण पाठविलेला धनादेश या पत्रासोबत आपणाकडे परत पाठविण्यात येत आहे असे कळविलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय झाल्यानंतर अपीलकर्ता यांनी दिनांक २६.४.२००७ रोजी विशेष भूसंपादन अधिकारी, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग, नागपूर यांचेकडून माहिती प्राप्त करुन घेता येईल असे अपीलकर्ता यांना कळवून कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, लेडीज क्लब समोर, सिव्हील लाईन, नागपूर यांना सदरच्या पत्राची प्रतिलिपी देऊन पुढील कार्यवाहीसाठी अपीलीय अधिकारी तथा अतिरिक्त जिल्हाधिकारी यांच्या आदेशानुसार देण्यांत यावे. सोबत आदेशाची प्रत आपल्या माहितीकरिता या पत्रासोबत पाठविण्यात येत आहे असे कळविण्यात आलेले दिसून येते. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी दिनांक २.५.२००७ रोजी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, लेडीज क्लब

समोर, सिव्हील लाईन, नागपूर यांचेकडे एक अर्ज करुन आर.टी.आय. मधील अपील क्रमांक १५/२००७ अपीलीय अधिकारी तथा अतिरिक्त जिल्हाधिकारी, नागपूर व विशेष भूसंपादन अधिकारी, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर यांच्या दिनांक २६.४.२००७ च्या पत्राचा संदर्भ देऊन माहिती उपलब्ध करुन देण्यास विनंती केलेली दिसून येते. परंतु सदरचे पत्र सही डिव्हीजन का पत्ता नही होनेसे सबब वापस असे दिनांक ७.५.२००७ रोजी परत आले आहे. असे लिहून दिलेले दिसून येते. तसेच दिनांक २६.४.२००७ रोजी श. गो. तळणीकर, सहाय्यक मुख्य अभियंता (रस्ते) यांनी अपीलकर्ता यांना आपण अर्जात नमुद केलेली माहिती या कार्यालयाच्या अभिलेख्यावर उपलब्ध नाही. तथापी सदर माहिती कार्यकारी अभियंता, जागतिक बँक प्रकल्प विभाग, सिव्हील लाईन, नागपूर यांचेकडून प्राप्त होऊ शकेल असे कळवून सदरच्या पत्राची प्रतिलिपी कार्यकारी अभियंता, जागतिक बँक प्रकल्प विभाग, नागपूर यांना माहितीकरिता अग्रेषित केलेले दिसून येते. तसेच अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांचे आदेशाची अंमलबजावणी झाली नाही म्हणून त्यांना कळविले होते. त्याकरिता कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक-१ यांनी सदर माहिती अपीलार्थीस देण्याकरिता १५ दिवसाचा अवधी देण्यात यावा अशी विनंती दिनांक ३१.५.२००७ रोजी या कार्यालयास केली असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी खुलाश्यात म्हटले आहे. त्यानंतर दिनांक १९.६.२००८ रोजी अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे खालील प्रमाणे खुलासा दाखल केलेला आहे. विशेष भूसंपादन अधिकारी, नागपूर यांचे सुचनेवरुन हेड कॉपीईस जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर यांनी आम्हास ६००/- रुपये शुल्क देऊन दिनांक २५.५.२००७ चे पत्राप्रमाणे आम्हास दिनांक ३०.५.२००७ रोजी मागितलेली माहिती रजिस्टर पोष्टाने मिळाली. ६००/- रुपये शुल्कापैकी हेडकॉपीस्ट यांनी रुपये ३७५/- घेऊन रुपये २२५/- पत्रा सोबत परत केले. माहितीने आमचे समाधान झाले आहे. पण द्वितीय अपीलात आम्ही नमूद केले प्रमाणे माहिती देण्यास बरीच टाळाटाळ केली आहे. तसेच माहिती नि:शुल्क देण्याचे आदेश दिले होते त्याचे पालन करण्यात आले नाही. याबद्यलही आपले लक्ष वेधण्यात येत आहे. माहिती संबंधित अधिकाऱ्यांनी वेळेवर न दिल्याने व शुल्क आकारले त्याबद्यल योग्य कारवाई व्हावी ही विनंती करुन आम्ही सदरचे अपील निकाली काढण्यात यावी अशी विनंती करतो असे म्हटले आहे. अपीलकर्ता यांना उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान झाले आहे असे नमुद केले असले तरी वेळेवर माहिती उपलब्ध झाली नाही त्याबाबत विचार केल्यास माहिती ही जूनी

असल्यामुळे व एका विभागाकडून दुसऱ्या विभागाकडे कार्यवाहीचे अधिकार असल्यामुळे सदरची माहिती उपलब्ध होण्यासाठी विलंब होणे साहजिकच आहे. मात्र प्रथम अपीलीय अधिकारी यांनी निःशुल्क माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले असल्यामुळे अपीलकर्ता यांचेकडून रुपये ३७५/- ची केलेली आकारणी ही परत केल्यास प्रथम अपीलाच्या आदेशाचे पालन केल्या सारखे होईल व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या निर्णयाप्रमाणे निःशुल्क माहिती देण्याचे आदेश असल्याने अपीलकर्ता यांचेकडून माहितीच्या खर्चाकरिता भरणा करुन घेतलेले रुपये ३७५/- त्यांना हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसाचे आंत परत करण्यात यावे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- ३१.७.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/४९१-४९७/३१.७.२००८

**राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १८३२/२००७.**

श्री. शांतीराव भगवान सदांशिव,
शासकीय दुध योजना कर्मचारी निवासस्थान,
दुध डेअरी, अकोला. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा,
उपआयुक्त (प्रशासन)
आयुक्त दुग्धव्यवसाय विकास यांचे कार्यालय,
प्रशासकीय इमारत अब्दुल गफार खान मार्ग,
वरळी, मुंबई - २८.

श्री. योगेश ढाकणे,
जनमाहिती अधिकारी तथा
प्रादेशिक दुग्ध व्यवसाय विकास अधिकारी,
शासकीय दुध योजना, सेमिनरी हिल्स, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३१.७.२००८)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २०.४.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३१.७.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २६.१०.२००६ रोजी शासकीय सार्वजनिक माहिती अधिकारी तथा प्रादेशिक दुग्धशाळा विकास अधिकारी, नागपूर विभाग, नागपूर यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. माहितीचा विषय विजतंत्री पदाच्या पदोन्नती विषयी झालेल्या अन्यायाबाबत व तफावतीबाबत. माहितीचा कालावधी सन १९८१ व सन १९८३ असा दिलेला आहे. माहितीचे वर्णन मुद्या क्रमांक १ :- १) श्री. बी. वाय. पाटील, विजतंत्री यांची पदोन्नती वरिष्ठ विजतंत्री पदाची आदेशाची सत्यप्रत. २) श्री. बी. वाय.

... २

पाटील, वरिष्ठ विजतंत्री यांचे सहाय्यक प्रभारक पदोन्नतीचे आदेशाची सत्यप्रत देण्यात यावी. ३) श्री. बी. वाय. पाटील यांना वरिष्ठ विजतंत्री व सहाय्यक प्रभारक हि पदोन्नती कोणत्या आधारे दिली त्या नियमाची व अभिलेखाची सत्यप्रती देण्यात याव्या. ४) श्री. बी. वाय. पाटील यांना देण्यात आलेल्या एका पाठोपाठ पदोन्नत्या मधील अंतर काळ कोणत्या नियमानुसार आहे. त्या नियमांची सत्यप्रत व संबंधित अभिलेखाची सत्यप्रत देण्यात यावी. ५) श्री. बी. वाय. पाटील हे विजतंत्री विभागात कार्यरत असता त्यांना सहाय्यक प्रभारक यांत्रिक हे पद कोणत्या नियमानुसार दिले त्या नियमाची सत्यप्रत व संबंधित नस्तीतील अभिलेखाची सत्यप्रत देण्यात यावी. ६) श्री. एस. बी. सदांशिव, विजतंत्री हे सेवा जेष्ठतेत वरिष्ठ असून सुध्दा श्री. बी. वाय. पाटील हयांना पदोन्नती कोणत्या आधारे दिली त्या नियमांची सत्यप्रत व त्यासंबंधीत नस्तीतील (फाईलमधील) अभिलेख्याची सत्यप्रत देण्यात यावी. मुद्दा क्रमांक २ :- १) श्री. ओ. आर. शर्मा, विजतंत्री हयांचे वरिष्ठ विजतंत्री पदोन्नती आदेशाची सत्यप्रत देण्यात यावी. २) श्री. शर्मा हयांना वरिष्ठ विजतंत्री पदोन्नती कोणत्या नियमाप्रमाणे दिली नियमाची सत्यप्रत देण्यात यावी. ३) श्री. शर्मा हयांचे वरिष्ठ विजतंत्री बाबतचे नस्तीतील संपूर्ण अभिलेख्याची सत्यप्रत देण्यात यावी. ४) श्री. एस. बी. सदांशिव हे शर्मा यांना सेवा जेष्ठतेत वरिष्ठ असून सुध्दा ओ. आर. शर्मा यांना कोणत्या आधारे पदोन्नती दिली त्या नियमाची सत्यप्रत देण्यात यावी. मुद्दा क्रमांक ३ :- १) श्री. पी. एस. श्रीराव, विजतंत्री हयांची वरिष्ठ विजतंत्री पदोन्नती आदेशाची सत्यप्रत देण्यात यावी. २) श्री. पी. एस. श्रीराव हयांना वरिष्ठ विजतंत्री पदोन्नती कोणत्या नियमाप्रमाणे दिली नियमाची सत्यप्रत देण्यात यावी. ३) श्री. पी. एस. श्रीराव हयांचे वरिष्ठ विजतंत्री बाबतचे नस्तीतील संपूर्ण अभिलेख्याची सत्यप्रत देण्यात यावी. ४) श्री. एस. बी. सदांशिव हे श्रीराव यांना सेवा जेष्ठतेत वरिष्ठ असून सुध्दा श्री. पी. एस. श्रीराव यांना कोणत्या आधारे पदोन्नती दिली त्या नियमाची सत्यप्रत देण्यात यावी. मुद्दा क्रमांक ४ :- १) श्री. व्ही. के. गुलदेवकर हयांचे वरिष्ठ विजतंत्री पदोन्नती आदेशाची सत्यप्रत देण्यात यावी. २) श्री. गुलदेवकर यांना वरिष्ठ विजतंत्री पदोन्नती कोणत्या नियमाप्रमाणे दिली नियमांची सत्यप्रत देण्यात यावी. ३) श्री. गुलदेंवकर हयांचे वरिष्ठ विजतंत्री पदोन्नती बाबतचे नस्तीतील संपूर्ण अभिलेख्याची सत्यप्रत देण्यात यावी. ४) श्री. एस. बी. सदांशिव हे अनुसुचित जातीतील असून (एस.सी.) सेवा जेष्ठतेत वरिष्ठ आहेत असे असता त्यांना डावलून श्री. गुलदेवकर यांना कोणत्या आधारे पदोन्नती देण्यात आली त्या नियमाची सत्यप्रत देण्यात यावी. मुद्दा

क्रमांक ५ :- १) श्री. आर. आर. अघमकर, विजतंत्री हे संबंधित सर्वांना सेवा जेष्ठतेत वरिष्ठ असून त्यांना पदोन्नती उशिरा देण्यात आली त्या पदोन्नतीबाबतचे नियमांची सत्यप्रत व अभिलेख्याची नस्तीतील सत्यप्रत. २) श्री. अघमकर यांचे वरिष्ठ विजतंत्री आदेशाची सत्यप्रत देण्यात यावी. मुद्या क्रमांक ६ :- अभियांत्रिकी विभागातील विजतंत्री पदाची १) सन १९८०, २) सन १९८१, ३) सन १९८२ व १९८३ सालाची सेवा जेष्ठता यादीची सत्यप्रती देण्यात याव्या. मुद्या क्रमांक ७ :- १) सन १९८० ते १९८१ व २) सन १९८२ ते १९८३ विजतंत्री गटाची बिंदु नामावलीची (रोस्टर) सत्यप्रत देण्यात यावी. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असेही नमुद केलेले दिसून येते. सदरच्या अर्जाचे प्रमाणे दिनांक १८.११.२००६ रोजी प्रादेशिक दुग्धशाळा विकास अधिकारी, नागपूर विभाग, नागपूर यांनी अपीलकर्ता यांना रचना व कार्यपध्दतीनुसार खात्याचे परिपत्रक क्र. आदुवि-१४/१९००/र व का/१८०, दिनांक १९.७.१९८५ अन्वये नेमणूका, बदल्या, बढती याबाबतचा पत्रव्यवहार व आदेश इत्यादी ५ वर्षापर्यंत जतन ठेवण्याचे आदेश आहेत. त्यामुळे मागणी केलेल्या दस्तऐवज २३ ते २५ वर्षापूर्वीचा असल्याने या कार्यालयात सध्या उपलब्ध नाही असे कळविलेले दिसून येते. त्यावर प्रथम अपील दिनांक १५.१२.२००६ रोजी दाखल केले होते असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दाखल केलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते. अपीलकर्ता यांनी प्रथम अपील मेमो सोबत आयोगाकडे दाखल केलेला नाही. मात्र प्रथम अपीलाचा आदेश दाखल केलेला आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २०.२.२००७ रोजी देण्यात आलेला असून अर्जदाराने मागणी केलेल्या माहितीपैकी पुन्हा शोध घेवून जेवढी माहिती उपलब्ध होऊ शकेल तेवढी माहिती महिनाभरात त्यांना देण्यात यावी असे आदेश दिलेले असल्यामुळे दिनांक २२.३.२००७ रोजी माहिती अधिकारी तथा प्रादेशिक दुग्धशाळा विकास अधिकारी, नागपूर विभाग, नागपूर यांनी अपीलकर्ता यांना त्यांच्या अर्जातील मुद्या क्रमांक ४ व ६ मध्ये मागणी केल्यानुसार माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. मात्र इतर मुद्यांच्या संदर्भात माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येत नाही. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. द्वितीय अपील मेमोमध्ये अपूर्ण माहिती दिली असे अपील करण्याचे कारण दिलेले आहे.

३. अपीलकर्ता यांच्या दिनांक २६.१०.२००६ च्या अर्जात वर नमुद केल्याप्रमाणे तसेच मुद्यांमध्ये त्यांनी माहिती मागितलेली दिसून येते. त्यापैकी कोणत्या मुद्यांची माहिती ही उपलब्ध नाही असे जनमाहिती अधिकारी

यांनी दिनांक १८.११.२००६ रोजी कळविले असून सुध्दा प्रथम अपीलातील निर्णय आदेशाप्रमाणे कार्यालयातील जुन्या दस्तऐवजांचा शोध घेतला असता अर्जातील मुद्या क्रमांक ४ ची मागणी केली असता श्री. आर. आर. अघमकर, वरिष्ठ विजतंत्री यांच्या आदेशाची सत्यप्रत तसेच मुद्या क्रमांक ७ ची मागणी केल्यानुसार दिनांक ११.१२.१९८० चे पत्रान्वये प्रसिध्द केलेली दिनांक १.४.१९७९ ची विजतंत्री या पदाची प्रारुप जेष्ठता सुचीची झेरॉक्स प्रत उपलब्ध झाली आहे याचा अर्थ संबंधित जनमाहिती अधिकारी यांनी अर्जदाराचा अर्ज आल्यानंतर माहिती उपलब्ध करुन देण्याचे दृष्टिने कोणत्याही प्रकारचे प्रयत्न केलेले दिसून येत नाहीत. मात्र प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आदेश करताच शोध घेऊन काही माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. म्हणजेच माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ केलेली दिसून येते. प्रथम अपीलाचे संदर्भात सुध्दा जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांना हजर राहावयाची आवश्यकता दिसून येत नाही असे प्रथम अपीलीय अधिकारी यांना कळविलेले दिसून येते व यावरुन संबंधित जनमाहिती अधिकारी यांना अपीलकर्ता यांस माहिती उपलब्ध करुन द्यावयाची नव्हती असा निष्कर्ष काढावा लागतो. माहिती जुनी असली तरी ती प्रामाणिकपणे शोधून ती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केल्यास जेवढी माहिती उपलब्ध होईल त्यावरुन माहिती उपलब्ध करुन देण्याची टाळाटाळ केलेली आहे असे म्हणता येत नाही. प्रामाणिक प्रयत्न केला आहे असे दिसून आले पाहिजे. परंतु सदरच्या प्रकरणामध्ये संबंधित जनमाहिती अधिकारी यांनी ३० दिवसाचे आंत माहिती उपलब्ध करुन देण्याचा कोणताही प्रयत्न केलेला नाही व त्यामुळे अधिनियमाचे कलम २० प्रमाणे ते दोषी आढळून येतात. अधिनियमाचे कलम २० प्रमाणे माहिती ३० दिवसापर्यंत उपलब्ध करुन न दिल्यास त्यानंतर प्रत्येक दिवसाचे विलंबास रुपये २५०/- शास्ती आहे व ती जास्तीत जास्त रुपये २५०००/- शास्ती आहे. परंतु ही शास्ती लादण्याचेपूर्वी जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेणे आवश्यक आहे. आज संबंधित जनमाहिती अधिकारी हे हजर नाहीत. विद्यमान जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. त्यांना विचारले असता संबंधित तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांची बदली झाली आहे व त्यामुळे ते आयोगापुढे हजर झाले नाही. त्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाही करण्याची शिफारस करणे आवश्यक राहील. तसेच अपीलकर्ता यांना विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी त्यांना मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये आणखी जी माहिती उपलब्ध होत असेल ती माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील व त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून त्यांचा दिनांक २६.१०.२००६ च्या अर्जात मागितलेल्या माहितीचा शोध घेऊन जी माहिती उपलब्ध असेल ती माहिती हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसाचे आंत रजिस्टर पोष्टाने विनामुल्य मुद्ये निहाय उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांना अधिनियमाचे कलम ७(१) प्रमाणे ३० दिवसांचे आंत माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे कलम २०(२) प्रमाणे ते दोषी आढळून येत असल्यामुळे त्यांचे विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

३) सदरच्या निणर्याची एक प्रत उपायुक्त (प्रशासन) दुग्ध व्यवसाय विकास विभाग, प्रशासकीय इमारत, अब्दूल गफारखान मार्ग, वरळी सीफेस, मुंबई - ४०० ०१८ यांचेकडे स्वतंत्रपणे पोष्टाने पाठविण्यात यावी.

४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- ३१.७.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/४९८-५०२/३१.७.२००८